सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
सोलापूर
बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक १०३ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

ई-पीक पाहणीसाठी तलाठी भाऊसाहेबांची मदत घ्या

आरडीसी मनिषा कुंभार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

ई-पीक पाहणी म्हणजे शेतकऱ्यांनी आपल्या शेतातल्या पिकांची नोंद ऑनलाईन पद्धतीने सातबारा उताऱ्यावर करणे. महाराष्ट्र सरकारने गेल्या चार वर्षांपासून हा उपक्रम राबवला आहे. या उपक्रमासाठी गेल्या एक-दोन वर्षात शेतकरी बांधवांचा चांगला प्रतिसादही लाभला. यंदा मात्र शेतकरी बांधवांचे ई-पीक पाहणी करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून आल्यावर जिल्ह्यातील तलाठ्यांना सर्व शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी करून घेण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी काढल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी आज (दि. १८) दिली.

तशी तर ही प्रक्रिया अत्यंत सोपी आहे. मात्र काहीवेळा सर्व्हर प्राब्लेममुळे शेतकरी वैतागून हा ई-पीक पाहणी करायचे सोडून देतात. यामुळे शेतकरी बांधवांना मिळणारा पीकविमा व इतर काही योजनांचा लाभ होत नाही. यामुळे शक्यतो शेतकरी बांधवांनीही आपल्या पिकांच्या नोंदी, झाडांच्या नोंदी व चालू पड / खाली पडलेल्या क्षेत्राच्या अक्षांस आणि रेखांशास नोंदविण्याची गरज आहे.

ई-पीक पाहणीसाठी अनेक शेतकऱ्यांना अडचणी येत असतात आणि त्याचं निराकरण करण्यासाठी शेतकरी बांधव अनेक ठिकाणी वारंवार फेऱ्या मारत असतात किंवा अनेक प्रॉब्लेम त्यांना सोडवता येत नाहीत. त्यामुळेच या ई-पीक पाहणीसाठी तलाठी भाऊसाहेबांना आता कामाला लावले आहे.

शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीच्या आधीच पीक पाहणीची नोंद करून घेणे गरजेचे असते. ई पीक पाहणी केली नाही तर पीक विमा, नुकसान मदत, हमीभाव खरेदी, पीक कर्ज या लाभापासून शेतकरी वंचित राहू शकतात. त्यामुळं ई पीक पाहणी नोंदणी करणं आवश्यक आहे.

ई-पीक पाहणी कशी करायची?

महाराष्ट्र शासनाकडून गेल्या ३ ते ४ वर्षापासून ई पीक पाहणी हा उपक्रम राबवण्यात येतो आहे. या उपक्रमाद्वारे शेतकरी स्वतः त्यांच्या शेतातून शेतातल्या पिकांची नोंद ही सातबारा उताऱ्यावरती करू शकणार आहेत, यालाच ई-पीक पाहणी म्हटले गेलेले आहे. याचाच अर्थ आता ज्या शेतकऱ्यांनी जे पीक लावलेला आहे त्या पिकाची नोंद ही सातबारा वर करण्यासाठी उपक्रम शासनाकडून राबवण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या पिकांची नोंद ही सहजरित्या करता येते. ई-पीक विमा असेल किंवा अन्य शासनाच्या योजना असतील किंवा लाभ असेल हा सहजरीत्या या ठिकाणी मिळवता येतो.

क्राईम वृत्त...

हगलूर येथे तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

हगलूर (ता. उत्तर सोलापूर) येथे तरूणाने राहत्या घरी लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. अक्षय हरिदास केत (वय २७, रा. हगलूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी राहत्या घरातील पत्र्याच्या लोखंडी अँगलला अक्षय याने नॉयलॉनच्या दोरीने अज्ञात कारणावरून गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी त्यास खाली उतरवून उपचारासाठी बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अक्षय इमडे यांनी अक्षय यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

पत्ते खेळायचे नाही म्हणून एकास मारहाण

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

यत्नाळ (ता. दक्षिण सोलापूर) येथे विठ्ठल मंदीराजवळ पत्ते खेळायचे नाही म्हणून एकास मारहाण करण्यात आली. राजशेखर पुंडलिक उंबराणी (वय ४०, रा. यत्नाळ) असे जखमीचे नाव आहे. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी यत्नाळ गावातील विठ्ठल मंदीराजवळ राजशेख उंबराणी यास पत्ते खेळायचे नाहीत म्हणून काशिनाथ पाटील, लक्ष्मण पाटील या दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यामुळे उंबराणी याच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

पोलिस ठाण्यात अर्ज दिल्याच्या कारणावरून तरूणीस मारहाण

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

पोलिस ठाण्यात अर्ज का दिला म्हणून तरूणीस मारहाण करण्यात आली. सोनाली ज्योतीराम आयवळे (वय २५, रा. बावी, ता. माढा) असे जखमी तरूणीचे नाव आहे. १७ फेब्रुवारी रोजी राहत्या घराजवळ सोनाली हिस तुम्ही आमच्याविरुध्द पोलिस ठाण्याला अर्ज का दिला असे म्हणून तानाजी मोरे, सतीश मोरे व इतर दोन जणांनी मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये सोनालीच्या सर्वांगास मार लागल्याने तिला उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

घरगुती वादातून पती-पत्नीकडून महिलेस मारहाण

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

घरगुती वादातून पती-पत्नीने महिलेस मारहाण करण्यात आली. रोहिणी सोमेश्वर वाघमारे (वय ३६,रा. टेंभुर्णी, ता. माढा) असे जखमी महिलेचे नाव आहे. १४ फेब्रुवारी रोजी दुपारी टेंभुर्णी येथील भवानी नगर येथे राहत्या घरी असताना घरगुती वादातून गणेश ढगे व त्याची पत्नी यांनी मिळून रोहिणी वाघमारे यांना कोयत्याने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये रोहिणी वाघमारे यांच्या डोक्यास मार लागून जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी पती सोमेश्वर यांनी १७ फेब्रुवारी रोजी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयता दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

बोरामणी येथे महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

अज्ञात कारणावरून बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) येथे महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली. मधुबाला विष्णु क्षिरसागर (य ५८, रा. लाल मारूती मंदीर, बोरामणी) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. १८ फेब्रुवारी रेजी सकाळी सातच्या पूर्वी मधुबाला क्षिरसागर यांनी राहत्या घरी लाकडी वाशाला नॉयलॉन दोरीने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानांतर नातेवाईकांनी मधुबाला यांना खाली उतरवून सोलापूर तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक फैय्याज बागवान बेशुध्दावस्थेत सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

फसवणूक झाल्याने तरूणाचा विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

फसवणुक झाल्याने तरूणाने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. सुनिल दत्तात्रय केळकर (वय ३१, रा. शिवानंद नगर, सुत मिल, अक्कलकोट रोड, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी राहत्या घरी ट्रकमध्ये व्यवहारात फसवणुक झाल्याने सुनिल यांनी अज्ञात विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे सुनिल यांस त्रास होऊ लागल्याने त्यांना उपचारासाठी आई शैला केळकर यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आली.

वारद चाळीत तरूणास मारहाण

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

शहरातील वारद चाळीमध्ये अज्ञत कारणावरून दोघांनी प्लॉस्टीक पाईपने तरूणास मारहाण करून जखमी केले. राहुल विठ्ठल मॅकल (वय ३६, रा. वारद चाळ, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी वारद चाळ येथे अज्ञात कारणावरून वासुदेव राजू येरनाळ, रवि येरनाळ व इतर दोघांनी मिळून प्लास्टीक पाईपने राहुल यास मारहाण करून जखमी केले. राहुल यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

भेट वस्तू देण्यासाठी अल्पवयीन मुलीचा पाठलाग

दोघां विरूध्द पोलिसात तक्रार

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

पाठलाग करून भेट वस्तू देण्याचा प्रयत्न करून अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी दोघां विरूध्द पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ३० जानेवारी ते १७ फेब्रुवारी दरम्यान घडला.

याबाबत दिलेल्या तक्रारीवरून करण धर्मा जाधव व अर्जुन धर्मा जाधव (रा. सोलापूर) विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तक्रारदार यांची मुलगी शहर परिसरातील महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. तिला भेट वस्तू देण्यासाठी यातील आरोपी करण याने तिचा पाठलाग केला. याबाबत पिडीतेच्या नातेवाईकांनी पोलिसात तक्रार दिल्याने चिडलेल्या अर्जुन याने तक्रारदार यांना पोलिसात तक्रार दिली म्हणून शिवीगाळ करून बघून घेण्याची धमकी दिली. या गुन्ह्याचा तपास पोलीस करत आहेत.

जिल्ह्यात ९ स्पॉटवर वाळू डेपो होणार सुरू

पर्यावरण खात्याकडून मिळाली मंजुरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

सोलापूर जिल्ह्यातील ९ ठिकाणी वाळू डेपो सुरू करून सर्वसामान्यांकरिता वाळू उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडून मंजुरी मिळाली असल्याची माहिती महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली.

जिल्हा प्रशासनाकडून एकूण १३ ठिकाणच्या वाळू डेपोस मंजुरी देण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्यात आला होता. यात भिमा नदीकाठच्या ९ अमृत ठिकाणी वाळू डेपो सुरु करण्यास पर्यावरण विभागाची मान्यता देण्यात आली आहे.

पर्यावरण विभागाच्या मान्यतेनुसार अक्कलकोट तालुक्यातील खानापूर, देवीकवठे, दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे, लवंगी, माढा तालुक्यातील आलेगाव टाकळी, टेंभुर्णी, पंढरपूर तालुक्यातील आरी, मंगळवेढा तालुक्यातील मिरी, ताडोरे या ठिकाणच्या वाळू डेपोस मान्यता देण्यात आली आहे. या सर्व ठिकाणच्या वाळू उपशासाठी प्रशासनाकडून निविदा काढण्यात येणार आहेत. तर अक्कलकोट तालुक्यातील कुडल, दक्षिण सोलापूर तालुक्यातील बाळगी, माढा तालुक्यातील मानेगाव, पंढरपूर तालुक्यातील नांदोरे या ठिकाणच्या प्रस्तावास पर्यावरण विभागाकडून मंजुरी अद्याप देण्यात आली नाही. या प्रस्तावास मंजुरी मिळाली तर याठिकाणीही वाळू डेपो सुरु करण्यात येणार आहे.

राज्य शासनाने मागील वर्षापासून सर्वसामान्यांना घर बांधण्यासाठी चार ब्रास वाळू केवळ सातशे रुपये दरात देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेनुसार वाळू मिळण्यासाठी ऑनलाईन नोंदणी केलेल्या कुटुंबांना वाळू देण्यात येणार असल्याचीही माहिती उपजिल्हाधिकारी नाटेकर यांनी दिली.

॥ जो जे वांछिल तो ते लाहो ॥

मनोरमा परिवार अंतर्गत

सोलापूर जिल्हा मनोरमा सखी महिला नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर

अंकुर रोपवाटीकेसमोर कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९९ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

सौ. येरगुंटे स्वाती सिद्राम
चेअरमन (मो.७९७२६४९८७१)

सौ. जयश्री भोरे
व्यवस्थापिका (मो. ९९२१९११०१०)

अक्कलकोट येथील शिवकालीन दुर्मिळ शस्त्रांचे संवर्धन करा

संभाजी ब्रिगेडची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

जिल्ह्यातील अक्कलकोट येथील महाराजा फत्तेसिंह महल येथील शस्त्रागारातील दुर्मिळ शिवकालीन शस्त्रांची व्यवस्थित संवर्धन व संरक्षण राखण्यात यावी या मागणीचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्राचे शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, दक्षिण तालुका अध्यक्ष शेखर चौगुले, लखन पारसे, अरविंद शेळके, सचिन गायकवाड उपस्थित होते.

अक्कलकोट शहर ही ऐतिहासिक नगरी आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज आणि त्यांचे पूत्र छत्रपती शाहू महाराज यांच्या विचाराने राजा फत्तेसिंह महाराज भोसले यांनी या शहरातून राज्यकारभार केला. राजा फत्तेसिंह महाराज यांनी देशभर शौर्य गाजवले. मराठा साम्राज्याचा विस्तार करण्यात मोलाची भूमिका बजावली. अक्कलकोट शहरात फत्तेसिंह महल अजूनही दिमाखात उभा आहे. परंतु, या महालामधील पुरातन शस्त्रांचे चांगल्या पध्दतीने संवर्धन होत नसल्याचे दिसून येते. काही दुर्मिळ शस्त्रे चोरीस जाण्याची शक्यता नाकारता येत नाही तर काही जुने शस्त्रांची स्थिती अत्यंत खराब झालेली तुटफूट झालेली दिसून येते.

मंत्री, आमदारांच्या सुरक्षेत कपात शिवसेनेच्या आमदारांची नाराजी...

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

शिवसेनेतील फुटीनंतर एकनाथ शिंदे यांच्यासोबत बाहेर पडलेल्या सर्व ४० आमदारांना वाय प्लस दर्जाची सुरक्षा देण्यात आली होती. मात्र आता गृह विभागाने मंत्र्यांसह आमदारांची सुरक्षा कमी करण्याचा निर्णय सोमवारपासून लागू केला आहे. यात सर्वच पक्षांच्या आमदारांचा समावेश असला, तरी शिवसेनेच्या आमदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे उघड नाराजी व्यक्त केली.

राज्यातील व्हीआयपी सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला असून ज्या नेत्यांच्या जीवाला धोका नाही, त्यांच्या सुरक्षेमध्ये कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेससह शिवसेनेच्या आमदारांचा समावेश आहे. भाजप नेते, माजी मंत्री रविंद्र चव्हाण, माजी मंत्री सुरेश खाडे, प्रताप चिखलीकर यांच्यासह अनेक मंत्री आणि आमदारांच्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये कपात केली आहे. या निर्णयाचा शिवसेनेच्या आमदारांना सर्वाधिक फटका बसणार आहे.

नव्या नियमानुसार अशी सुरक्षा

- या आधी शिंदे यांच्यासोबत आलेल्या आमदारांच्या पुढे-मागे पोलिसांच्या गाड्यांचा ताफा असे. तसेच या आमदारांच्या घराबाहेरही पोलिस सुरक्षा तैनात असायची. या सर्व सुरक्षेत कपात
- आमदारांच्या मागे-पुढे असणाऱ्या पोलिस गाड्या कमी
- घराबाहेरील पोलिसांची संख्याही कमी होणार
- शिंदे यांच्या आमदारांसोबत आता एकच सुरक्षारक्षक.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in for following works.
Tender No:- SE/EHV/O&M/Circle/Pune/T-113/2024-25 **RFX No.** 7000034406 **Subject:-** RE-E-tender for procurement of 33 kV Tertiary Bushings of 400 kV ICTs at various 400 kV Dns under EHV O&M Circle Pune & under EHV O&M Circle Solapur
Tender Amount: - Rs,14,49,110/-/- **EMD:-** Rs. 14,491.10
Tender Fees:- Rs.500/- + GST).
Download of tender documents: - from dtd. 17.02.2025 to dtd-03.03.2025 upto 11:00 hrs.
Bid Opening: - Dtd. 03.03.2025 after 11:00 hrs (Tech) Dtd. 04.03.2025 after 11:00 hrs (Price) **For further details visit our website http://mahatransco.in and open above RFX for downloading tender document, schedules, and annexure.es Further, please note that, in case, if above tender will be refloated, it will be published on our website viz. www.mahatransco.in**

Sd/-
Superintending Engineer
EHV O&M Circle, Pune .

जाहीर प्रगटन

तमाम लोकांना विशेषतः कसबे यावली ता. बार्शी जि. सोलापूर येथील जनतेस या प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, यावली ता. बार्शी जि. सोलापूर येथील जमीन गट नं. २६९/२ क्षेत्र ०० हे. ७० आर पैकी क्षेत्र ०० हे. ३० आर इतके क्षेत्र श्री. राजकुमार महादेव आळगड्डे, रा. तडवळे ता. बार्शी जि. सोलापूर यांनी सदर मिळकत आमचे पक्षकार सौ. माधुरी सौदागर कोकाटे रा. उंदरगांव ता. माढा जि. सोलापूर यांना कायमस्वरूपी विकी करण्यासाठी बोलणी केलेली असून विद्यमान मालकांनी आमचे पक्षकाराकडून इसार घेतलेला असून सदरची पेपर नोटीस प्रसिध्दी करण्यास अनूमती दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी असल्याचा व स्वतंत्र मालकी कब्जेवहिवाटीची असल्याचा भरोसा विद्यमान मालकांनी आमचे पक्षकारास दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध जसे करार, मदार, गहाण, तारण, दान, बक्षीस, साठेखत, लिज, लिन, चोळी, बांगडी, ईसारपावती, कुलमुख्यारपत्र, बक्षीसपत्र, खरेदी, वारसाहक्क, हिस्सेदार, कुळ वगैरे असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन सात दिवसाच्या आत आमचे खालील पत्त्यावर लेखी हरकत देवून त्याबाबत कागदोपत्रानिशी खात्री पटवून द्यावी अन्यथा सदरची जमीन निर्वेध व निजोखमी आहे असे समजून व ज्या कोणाचा हक्क, हितसंबंध असेल तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिलेला आहे, असे समजुन आमचे पक्षकार भविष्यात खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यांनतर कोणाचीही कसलीही तकार बालणार नाही.

मिळकतीचे परिशिष्ट मौजे. यावली ता. बार्शी जि. सोलापूर येथील जमीन गट नं. २६९/२ क्षेत्र ०० हे. ७० आर पैकी क्षेत्र ०० हे. ३० आर असून ज्याची चर्तुर्सिमा पुढील प्रमाणे - पुर्वेस नदी., पश्चिमेस लिहून देणार यांची उर्वरीत जमीन, दक्षिणेस गट नं. २७०. उत्तरेस गजानन महादेव आळगड्डे यांची जमीन. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. दिनांक १८/०२/२०२५

सही/-
तर्फे,
ॲड. आशा दत्तात्रय गोसावी
जिल्हा व सत्र न्यायालय,
धाराशिव मो.नं. ९८५०६३७८११

सही/-
जाहिर प्रगटन देणार
सौ. माधुरी सौदागर कोकाटे
रा. उंदरगांव ता. माढा जि. सोलापूर

मध्य रेल्वे

सोलापूर विभाग
निविदा सूचना

DRM (W)'s, मध्य रेल्वे, सोलापूर यांनी खपवश्रर च्या अध्यक्षांच्या वतीने खालील कामासाठी नामांकित फर्म/कॉन्ट्रॅक्टर यांच्याकडून ई-निविदा मागवल्या आहेत. ई-निविदा सूचना क्रमांकः 01-2025-SrDENCo, दिनांकः 17.02.2025. कामाचे नावः निर्मिती रुंदीचे मानकीकरण- 43.80 Tkm (DEN/T/SUR उप-विभाग अंतर्गत WDS-DUD विभाग) (पुन्हा-आमंत्रण). कामाची अंदाजे किंमतः रु. 14,17,67,972.63. बयाणा पैसेः रु. 8,58,800/-. काम पूर्ण होण्याचा कालावधीः 12 महिने. देखभाल पेरलोडः शून्य. निविदा फॉर्मची किंमतः NIl. www.ireps.gov.in वर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळः 27.02.2025 15:00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळः 27.02.2025 15:30 नंतर. वेबसाइट तपशीलः www.ireps.gov.in टीपः संभाव्य निविदाकारांना सूचित केले जाते की त्यांनी या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुध्दीकरण लक्षात घेण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट द्यावीः www.ireps.gov.in

डीआरएम (कार्य),
मध्य रेल्वे, सोलापूर

AK/Sur-49

आपल्या जनावरांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा

मध्य रेल्वे

सोलापूर विभाग
निविदा सूचना

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी प्रतिष्ठित फर्म/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवतात. क्र. क्रमांकः १. निविदा सूचना क्रमांकः 02-2025-SrDENCo, दिनांकः 17.02.2025. कामाचे नावः सोलापूर विभागातील Sr.DEN(C)/SUR अंतर्गत यार्डमधील ड्रेन सुधारणा काम आणि यार्ड सुधारणा/अपग्रेडेशन CTR(P), TRR(P), TSR(P), CTR(S), TBR मॅन्युअली आणि TBR T/out Sr.DEN(C)/SUR अधिकार क्षेत्र अंतर्गत Sr.DEN(C)/SUR अधिकार क्षेत्र (TURD/SURD) अंतर्गत कामांसाठी. सोलापूर विभागातील डीडी-वाडी विभागात यार्ड सुधारणा/अपग्रेडेशन कामे आणि CTR(P)/TSR(P) काम. कामाची अंदाजे किंमतः 31,85,70,241.03. बयाणा पैसेः 17,42,900/-. काम पूर्ण होण्याचा कालावधीः 12 महिने. देखभाल कालावधीः शून्य. क्र. क्रमांकः 2. निविदा सूचना क्रमांकः 03-2025-SrDENCo, दिनांकः 17.02.2025 कामाचे नावः CTR(P), TRR(P), TSR(P), CTR(S), TBR मॅन्युअली आणि TBR T/out Sr.DEN (S) SUR अधिकारक्षेत्रांतर्गत यार्ड सुधारणा/अपग्रेडेशन कामे घथत कार्यशाळेत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ट्रॅक काम आणि DD-WV मधील CTR(P)/TSR(P) विभागातील काम. कामाची अंदाजे किंमतः 30,08,63,629.40. सर्वात कमी पैसेः 16,54,300/-. काम पूर्ण होण्याचा कालावधीः 12 महिने. देखभाल कालावधीः शून्य. www.ireps.gov.in या वेबसाइटवर उद्धृत निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीखः 07.03.2025 15:00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीखः 07.03.2025 15:30 वाजता. या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुध्दीकरण लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाकारांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटवर वारंवार भेट देण्याचा सल्ला दिला जातो. वेबसाइटः www.ireps.gov.in.

DRM (कार्य),
मध्य रेल्वे, सोलापूर

AK/Sur-50

आपल्या जनावरांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा

जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं.०८/२०२५

अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात

भौरम्मा गुरुनिंगप्पा गंदगे वगैरे-४ -- अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही -- सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं. १ भौरम्मा गुरुलिंगप्पा गंदगे, २. प्रियंका अशोक बेळकोड, ३. गुरुबाळप्पा गुरुनिंगप्पा गंदगे, ४. प्रिती सुरेश नरके यांनी अक्कलकोट येथील दिवाणी न्यायालयात मयत गुरुनिंगप्पा गुरुबाळप्पा गंदगे यांचे पश्चात वारसा प्रमाणात्र त्यांना मे. कोर्टाकडून मिळणेसाठी दिवाणी किरकोळ अर्ज नं.०८/२०२५ चा दाखल केला आहे.

त्याअर्थी त्याबाबत वरील अर्जदार हे मयत गुरुनिंगण्या गुरुबाळप्पा गंदगे यांचे वारस आहेत अथवा कसे याबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा नेमलेल्या तारखेस दिनांक २५/०३/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केले दिनांक - १८/०२/२०२५

सही/-
लिपीक

शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक दिवाणी
न्यायालय, क.स्तर अक्कलकोट

जाहीर समन्स/नोटीस

टेनन्सी किरकोळ अर्ज नं. ०७/२०२३
संगणक क्रमांक ४२६/२०२३
पुढील नेमलेली तारिख ०२/०४/२०२५

सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकार क्र. १ साहेब, यांचे न्यायालयात

श्री. महादेव देवस्थान ट्रस्ट, उपळे दुमाला, ता. बार्शी -- अर्जदार
विरुध्द
श्री. बाबुराव रंगनाथ नेवाळे, वगैरे -- सामनेवाला

प्रति,

५) वृषाली संजय बिडवे, ६) शितल सुरेश तडसरे, ८) स्मिता योगेश विरकर, तिघे रा. १३०३, कश्यपी प्लॉट, रिंग रोड, आप्पासाहेब कश्यपी स्मृती उदयान जवळ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर ९) श्री. सुनिल रामेश्वर नेवाळे, १०) श्री. अनिल रामेश्वर नेवाळे, ११) श्रीमती पधीनी रामेश्वर नेवाळे, तिघे रा. शिवतेज बंगला, शिवतेज नगर, जुने आर.टी.ओ. ऑफीसच्या पाठीमागे, सेक्टर नं. १८, चिंचवड, पुणे ४११ ०१९

ज्याअर्थी, अर्जदार यांनी हल्लीचा अर्ज सामनेवाला यांचे विरुध्द मा. उपविभागीय अधिकारी साहेब, सोलापूर यांचेकडे टेनन्सी किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जावर सुनावणीकामी मे. कोटनि वेळोवेळी सामनेवाला नं. ५, ६ व ८ ते ११ यांचे विरुध्द त्यांचे पत्त्यावरती समन्स/नोटीसा रजि. पोस्टाने काढलेल्या आहेत. सदर अर्जाचे समन्स/नोटीस घेवून संबंधित पोस्टमन सरनाम्यात दिलेल्या नमुद पत्त्यावर बजावणीकरिता गेले असता, सदर पत्त्यावर समन्स नोटीस बजावणी होत नाही, झाली नाही. तुम्ही जाणीवपूर्वक समन्स/नोटीसची बजावणी हेतुपुरस्सर टाळाटाळ करीत आहात. तुम्हास सदर अर्जाचे समन्स/नोटीस बजावणी होणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे.

त्याअर्थी, या जाहीर समन्स/नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण सदर अर्जाचेकामी हे जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत अथवा पुढील नेमलेली ता. ०२/०४/२०२५ रोजी स्वतः अथवा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवुन मुदतीत आपले म्हणणे लेखी स्वरुपात मा. न्यायालयात सादर करावे. मुदतीत आपण हजर होवुन आपले म्हणणे दिले नाही तर, आपणांस सदर समन्स/नोटीस बजावणी होवुनही आपणांस काहीही सांगायचे नाही, असे समजुन मा. न्यायालय सदरकामी पुढील यथायोग्य हुकुम आदेश पारीत करतील/होतील, याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे सही-शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. १२/०२/२०२५

शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक,
उपविभागीय अधिकारी, सोलापुर
सोलापूर क्र.१, सोलापूर

सोलापुर येथील मे. उपविभागीय अधिकारी क्र-१ यांचे कोर्टात

आर.टी. एस. अपोल क्र. ४०१ २०२२

प्रशांत शामराव पैकेकर --- अपीलदार
विरुध्द
बाळासाहेब विश्वनाथ जाधव वगैरे --- रेस्पॉन्डंट

प्रति,

१) वाळासाहेब विश्वनाथ जाधव २) शरद विश्वनाथ जाधव ३) लता रमेश जाधव ४) सर्जेराव रमेश जाधव ५) गणेश रमेश जाधव रा. रेस्पॉन्डंट १ ते ५ एकविराई गल्ली, कसबा पेठ वाशी ६) सत्यभामा कोंडीबा जाधव रा. शाळा नं १४ शेजारी सुभाष नगर वाशी ७) शिवगंगा दुर्गाप्पा चव्हाण, ८) राम दुर्गाप्पा चव्हाण, ९) भुजंगराव आप्पासाहेब चव्हाण, १०) सिध्देश्वर गोविद चव्हाण रा. रेस्पॉन्डंट नं. ७ ते १० चोरमोले प्लॉट, बाशी ता. वाशी जि. सोलापूर, ११) वसीम वाबासाहेव शेख रा. गाडेगाव रोड, वाशी ता. वाशी, जि. सोलापूर.

ज्याअर्थी, अर्जदार यांनी हल्लीचा अर्ज रेस्पॉन्डंट यांचे विरूध्द मा. उपविभागीय अधिकारी साहेब सोलापूर यांचेकडे आरटीसएस अपिल दाखल केलेले आहे. सदर अर्जावर सुनावणीकामी मे. कोर्टाने वेळोवेळी रेस्पॉन्डंट नं १ ते ११ यांचेविरूध्द त्यांचे पत्त्यावरती समन्स नोटीसा रजि पोस्टाने काढलेल्या आहेत, सदर अर्जाची समन्स नोटीस घेवून संबंधीत पोस्टमन सरनाम्यात दिलेल्या नमूद पत्त्यावर बजावणी करीता गेलेले असता सदर पत्त्यावर समन्स नोटीस बजावणी होत नाही, झाली नाही. तुम्ही जाणीवपूर्वक समन्स नोटीसीची बजावणी हेतूपुरस्सर टाळाटाळ करीत आहात तुम्हाला सदर अर्जाचे समन्स/नोटीस बजावणी होणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे

त्याअर्थी, या जाहिर समन्स नोटीसद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण सदर अर्जाकामी हे जाहिर समन्स नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमलली ता. ०२/०४/२०२५ रोजी स्वतः अथवा माहितगार वकिलांमार्फत हजर होऊन मुदतीत आपले म्हणणे लेखी स्वरूपात मा न्यायालयात सादर करावे मुदतीत आपण हजर होऊन आपले म्हणणे दिले नाही तर, आपणांस सदर समन्स/नोटीस बजावणी होऊनही आपणांस काही सांगायचे नाही असे समजून मा. न्यायालय सदरकामी पुढील यथायोग्य हुकूम आदेश पारीत करतील होतील, याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहिर समन्स आमचे सहिनिशी व मे कोर्टाचे सही-शिक्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. १४/०२/२०२५.

शिक्का

सही/-
उप-विभागीय अधिकारी
सोलापूर क्र.१, सोलापूर

CMYK

सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

ड्रोनच्या सहाय्याने काढण्यात आलेले अप्रतिम छायाचित्र.

हजारो महिलांनी गायला शिवबाचा पाळणा

सोलापूर : मंगळवारी मध्यरात्री १२ वाजता हजारो जिजाऊंनी शिवबाचा पाळणा गायल्याच्या अभूतपूर्व सोहळ्याने उपस्थित शिवप्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फेडले. याची देही... याची डोळा.... हा क्षण अनेक मावळ्यांनी आपल्या मोबाईलमध्ये टिपला. मध्यरात्री ठीक १२ वाजता वीरमाता, वीरपत्नी, वीरकन्यांच्या हस्ते पाळणा झुलवत आणि हजारो जिजाऊंनी पाळणा म्हणत शिवभक्तांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी शेकडो पदाधिकाऱ्यांनी चांगले नियोजन केले होते. त्यामुळे मंगळवारी रात्री १० वाजल्यापासुन ते मध्यरात्रीपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज चौक शिवभक्तांनी शिवमय झाला होता. वीर पत्नी वर्षा श्रीहरी लटके, देवकी रत्नाकर हडपद, रेखा शावरेपा नावी, रत्नाबाई बाबुराव चांदोडे, आणि सुषमा दत्तात्रेय माने या वीर पत्नींच्या हस्ते शिवरायांची पूजा करून पाळण्याचा कार्यक्रम पार पडला. श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष सी.ए. सुशील बंदपट्टे यांनी सोहळ्याचे नेटके आयोजन केल्याचे दिसून आले.

72198 21111 | BAJAJ SECURE

*नियम आणि अटी लागू. *N160 वेरिएंट्ससाठी एक्स-शोरुम किंमत महाराष्ट्र. बजाज ऑटोने पूर्व सूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. आपल्या सेगमेंटमध्ये. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सने प्रोफेशनल सुपरविजन अंतर्गत नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून वेगळ्या जागी केली आहेत. ह्या साहसाचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्सवर आणि विशिष्ट राज्यांमध्ये उपलब्ध. अधिक माहिती बजाज डीलरकडून मिळवा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून दिली जाते आणि त्यांच्या नियम व अटींच्या अधीन असते.

Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.
Authorised Service Centre: Mangalwedha 9890214155, **Marwade** 9028703555, **Akkalkot** 9011556800, **Karkamb** 7057447777, **Vairag** 8308006007, **Sangola** 8888109109, **Karmala** 8888984084, **Kandar** 9673005524, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060, **Akluj** 7756999799, **Temburni** 9552679777, **Natepute** 9850738876, **Mohol** 8830070701.

अग्रलेख...

सॅम पित्रोदांची मुक्ताफळे

सत्यनारायण गंगाराम पित्रोदा उपाख्य सॅम पित्रोदा. हे महाशय ओव्हरसीज काँग्रेसचे नेते आहेत. ओडिशातील एका गुजराथी कुटुंबात ते जन्मले असले, तरी त्यांना भारत आपला देश आहे, असे वाटत नसावे. किमान त्यांच्या वक्तव्यांवरून तरी तसे सतत वाटत असते. त्यांचे ताजे वक्तव्य असे की, चीनला आपण शत्रू समजू नये आणि तसा समज करून घेणे ही अतिशयोक्ती आहे. भौतिकशास्त्रासारख्या विषयात उच्च शिक्षण घेतलेला आणि अमेरिकेत इलेक्ट्रॉनिक्समध्ये मास्टर्स केलेला हा माणूस इतका उथळ असावा, यावर विश्वास बसत नाही. पण, तो तसा आहेच आणि आपले तसे असणे सॅम पित्रोदा महाशय वारंवार सिद्ध करीत आले आहेत. गेल्या वर्षी त्यांनी भारतातील सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात संपत्तीच्या पुनर्वितरणाबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. सॅम पित्रोदा यांच्या वक्तव्याशी आपला संबंध नसल्याची भूमिका काँग्रेसने तेव्हा घेतली होती. नंतर एका मुलाखतीत सॅम पित्रोदा यांनी भारतातील वैविध्य सांगताना वांशिक टिप्पणी करून मुक्ताफळे उधळली होती. शीखविरोधी दंगल आणि पुलवामा हल्ल्याच्या वेळचीही त्यांची वक्तव्ये वादग्रस्त ठरली. आता त्यांचे ताजे वक्तव्य आहे चीनबद्दलचे. त्यापासूनही काँग्रेसने फारकत घेतली आहे. खरे तर काँग्रेसने नुसती फारकत घेणे पुरेसे नाही. काँग्रेसने सॅम पित्रोदा यांना देशाची माफी मागायला सांगितले पाहिजे किंवा त्यांचा आमच्या पक्षाशी कोणताही संबंध नाही, असे घोषित केले पाहिजे. यातले काहीही काँग्रेस करणार नाही. कारण सॅम पित्रोदा हे काँग्रेसच्या विद्यमान नेतृत्वाकडे वारशाने आलेले पात्र आहे. राजीव गांधी आणि डॉ. मनमोहन सिंग या दोन काँग्रेसी पंतप्रधानांचे ते सल्लागार होते. काँग्रेसच्या राजवटीत ते अनेक वर्षे राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे प्रमुख होते. त्यांनी भूषविलेली पदे पाहिली तर हा माणूस अतिशय ज्ञानी आहे, यावर कुणाचाही विश्वास बसेल. पण, त्यांची वक्तव्ये वाचली, ऐकली तर हा बसलेला विश्वास पटकन संपून जाईल.

सॅम पित्रोदा हे नेहरू-गांधी कुटुंबाचे दीर्घकालीन विश्वासू व्यक्तिमत्त्व. त्यामुळे त्यांनी केलेले वक्तव्य काँग्रेसच्या खात्यात जमा होणारच. वास्तवात चीन हा भारताचा मित्र नाही, हे वारंवार सिद्ध झाले आहे. तरीही आपण आपला शेजारी बदलू शकत नाही, या वास्तवावर विश्वास ठेवून भारताचे सरकार चीनशी वाटाघाटींच्या माध्यमातून दोन्ही राष्ट्रांतील संबंधांची हाताळणी करीत आहे. २०२० च्या गलवान व्हॅली संघर्षात २० भारतीय सैनिकांनी आपले प्राण गमावले. चिनी सैनिकांशी संघर्ष करताना भारतीय सैनिकांचा जीव गेला. त्यापूर्वी आणि त्यानंतरही सीमावर्ती भागावरील कुरघोडी सोडलेली नाही. अशा परिस्थितीत सॅम पित्रोदा यांचे ताजे वक्तव्य हे वास्तवाचे विकृतीकरण होय. चीनपासून आपल्याला धोका आहे, असे मानणे हा अतिशयोक्तीचा भाग आहे, हे पित्रोदा यांचे म्हणणे ऐतिहासिक आणि वर्तमानातील भू-राजकीय वास्तवांशी संबंध नसलेले वक्तव्य आहे. गेल्या काही वर्षांत चीनने भारताविरुद्ध आक्रमक पवित्रा स्वीकारला आहे. सीमावर्ती भाग असो, काही भागांवरील आधिपत्याचा मुद्दा असो किंवा आर्थिक हितसंबंधांचा विषय असो, भारताचे नुकसान करण्याची कोणतीही संधी चीन सोडत नाही. मार्केटमध्ये बोगस वस्तूंचा शिरकाव करण्यापासून ते सायबर थ्रेट निर्माण करण्यापर्यंत अनेक कारवाया चीन करीत असतो. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले होते. १९६७ मध्येदेखील चीनने नथु ला पास भागात आक्रमण केले होते. २०१७ मध्ये डोकलाम संघर्ष घडला. भारतीय क्षेत्रात चीनने रस्ता बांधण्याचा प्रयत्न केला होता हे त्याचे कारण. त्यानंतर गलवान व्हॅली संघर्ष झाला. त्यात २० भारतीय सैनिकांचा मृत्यू झाला. अरुणाचल प्रदेश आणि लडाखमध्ये चीनच्या कारवायांमुळे तणाव निर्माण होतच असतो. सीमावर्ती भागातील घुसखोरी आणि वादग्रस्त प्रदेशांजवळ बांधकामे करणे ही चीनच्या विस्तारवादी मानसिकतेची उदाहरणे आहेत. या संपूर्ण पृष्ठभूमीवर भारताने चीनला शत्रू मानणे अतिशयोक्ती आहे, असे सॅम पित्रोदा यांनी म्हणणे हा भारतीय जवानांचा, त्यांनी केलेल्या बलिदानाचा अपमान ठरतो. चीन आणि भारताची सीमा तब्बल साडेतीन हजार किलोमीटर्सची आहे. ती डोंगराळ, बर्फाळ आणि खडतर आहे. त्यामुळे सीमावर्ती भागावर निरंतर पहारा देत देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना किती त्रास होत असेल, याचा अंदाज करणे कठीण आहे. चीनने सीमेवर लष्करी तैनाती वाढविली आहे. हवाई तळ, रस्ते आणि क्षेपणास्त्र तैनातीची ठिकाणे विकसित केली आहेत. पीपल्स लिबरेशन आर्मी म्हणजे चिनी लष्कराकडून सतत घुसखोरीचा प्रयत्न सुरू असतो. भारत-चीन संबंधांमध्ये व्यापार हाही एक मुद्दा आहे. चीनकडून १०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त किमतीच्या वस्तू भारत आयात करतो. त्या तुलनेत चीन भारताकडून अत्यल्प आयात करतो. म्हणजे व्यापाराचे असंतुलन आहे आणि त्याचा परिणाम भारतीय अर्थकारणावर होतोच आहे. चीनच्या बेल्ट अ‍ॅण्ड रोड इनिशिएटिव्ह (बीआरआय) मुळे भारताच्या शेजारील अनेक देशांमध्ये आर्थिक अवलंबित्व निर्माण करण्यात येत आहे. त्याद्वारे भारताच्या प्रादेशिक प्रभावाला शह देण्याचा चीनचा प्रयत्न आहे. नेपाळ आणि भूतानमध्ये चीनकडून हस्तक्षेप केला जातो. हिंद महासागरात श्रीलंका, मालदीव या भागात आणि पाकिस्तानच्या ग्वादर बंदरात चीनचे नौदल उभे ठाकले आहे. पाकिस्तानला चीनचा पाठिंबा आहे. तो पाकिस्तानला शस्त्रे, अर्थसाह्य देतो आणि भारतविरोधी कारवायांसाठी त्याचा वापर करतो. भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध सुधारत असल्यामुळे चीनची पोटदुखी वाढलेली आहे. भारताची अमेरिकेसोबतची धोरणात्मक भागीदारी ही लोकशाही मूल्यांवर आणि परस्पर सुरक्षा हितांवर आधारित आहे. अमेरिका ही जगातील सर्वांत जुनी लोकशाही आणि भारत हे जगातील सर्वांत मोठे लोकतांत्रिक राष्ट्र आहे. ही दोन राष्ट्रे एकत्र आल्यास चीनच्या वर्चस्वाला धोका निर्माण होतो, याची चीनला चिंता वाटणे स्वाभाविक आहे. लोकशाहीचा जयजयकार दुमदुमेल आणि चीनमधील एकचालकानुवर्ती राजवटीकडे जगाचे लक्ष वेधले जाईल, याचीही चीनला चिंता असेल. चीनमध्ये लोकशाही नाहीच. तिथे एका पक्षाचे आणि त्यातही एका व्यक्तीचे राज्य चालते. तिथली राजवट ही हुकूमशाही, दडपशाहीसाठी जगभर प्रसिद्ध आहे. चीनने सागरी भागातही कुरघोड्या सुरू केल्या आहेत. चीनच्या आक्रमकतेला तोंड देण्यासाठी क्वाड (भारत, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया) मध्ये भारताची महत्त्वाची भूमिका आहे. तिचे महत्त्व चीनला कमी करायचा आहे. या संपूर्ण पृष्ठभूमीवर सॅम पित्रोदा यांचे विधान तथ्यात्मकदृष्ट्या चुकीचे, धोरणात्मकदृष्ट्या हानिकारक आणि राजनैतिकदृष्ट्या बेजबाबदार ठरणारे आहे, यात वाद नाही. चीनचा धोका हा अतिशयोक्त आहे, असे सांगून त्यांनी भारताच्या भूमिकेबद्दलच संभ्रम निर्माण केला आहे. काहीही म्हटले तरी सॅम पित्रोदा हे भारतीय आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या वक्तव्याचा अर्थ भारतविरोधी भूमिकेसाठी काढलाच जाणार नाही, याची खात्री देता येत नाही. आंतरराष्ट्रीय संबंध ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईटमध्ये पाहता येत नाहीत. त्यांना अनेक रंग असतात, छटा असतात. अनेकदा एखादा देश शत्रूसारखा वागत असला किंवा शत्रूच असला तरी त्याच्याशी गोड राहावे लागते आणि मित्र देशाशी वागतानाही सावधगिरी बाळगावी लागते. सॅम पित्रोदा यांचे वक्तव्य चीनच्या आतापर्यंतच्या क्रूर, वसाहतवादी, विस्तारवादी व आक्रमक भूमिकेचे केवळ समर्थनच नव्हे तर त्याला चारित्र्याचे प्रमाणपत्र देणारे आहे. त्याच वेळी ते भारताच्या शांततावादी भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. सॅम पित्रोदा हे काँग्रेसी असतील तर त्यांना काही गोष्टींचे स्मरण करून दिले पाहिजे. १९६७ साली इंदिरा गांधी असे म्हणाल्या होत्या की, चीनची भारताबद्दलची भूमिका सदैव द्वेषपूर्ण राहिली आहे. भारताची बदनामी करण्याची संधी चीन कधीही सोडत नाही. चीन आमच्या देशाच्या लोकतांत्रिक वाटचालीकडेही वक्र नजरेने पाहतो. १९७५ मध्ये इंदिराजींनी सिक्कीमला भारतात सामील करून घेतले. तिथल्या नागरिकांना भारतात राहायचे होते. हा प्रदेश वादग्रस्त ठरावा, असा चीनचा प्रयत्न होता. त्यावेळी चिनी सरकारच्या मुखपत्राने (चायना डेली) इंदिराजींवर टीका केली होती. नेहरू पिता-पुत्री नेहमीच असे वागतात. इंदिरा गांधी आणखी पुढे गेल्या आहेत. सॅम पित्रोदांना यातले काहीच माहिती नसेल असे नाही आणि तसे असेल तर काँग्रेसने त्यांना ते सांगावे किंवा त्यांची पक्षातून कायमची हकालपट्टी करावी. ▮

प्रासंगिक

केजरीवाल यांची चौफेर कोंडी

राहुल गोखले

दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल आणि 'आप' पक्ष या दोन्हींच्या राजकीय भवितव्याचाच नव्हे, तर राजकीय अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. २०११ साली सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी दिल्लीत भ्रष्टाचारविरोधी आंदोलन पुकारले होते. त्यात केजरीवाल 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' या चळवळीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. देशभर काँग्रेसविरोधी असंतोष उफाळून आला होता आणि त्याचा राजकीय लाभ उठवत केजरीवाल यांनी 'आप' पक्षाची स्थापना करीत राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. लोकानुनयी राजकारणाला कारभाराचे दिल्ली प्रारूप असे गोंडस नाव देऊन त्यांनी मतदारांना भुरळ अवश्य घातली. मात्र त्या कारभारातील पोकळपणा हळूहळू जनतेच्या दृष्टीस आणि अनुभवास येऊ लागला. अखेरीस यंदा दिल्लीत 'आप'ची सत्ता यमुनाजळी विसर्जित झाली. केजरीवाल यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा मोठ्या होत्या. २०१४ साली लोकसभा निवडणुकीत त्यांनी वाराणसी मतदारसंघात नरेंद्र मोदी यांच्याविरोधात निवडणूक लढविली होती. दिल्लीत मिळालेली सत्ता म्हणजे आपल्याला देशभर मिळालेली जनमान्यता आहे, अशी केजरीवाल यांची समजूत झाली होती. २०२२ साली पंजाबात 'आप'ला दणदणीत बहुमत मिळाले. २०२३ साली केंद्रीय निवडणूक आयोगाने 'आप'ला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा बहाल केला; तर त्याचवेळी तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय) यांची राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता काढून घेतली. या सर्व घडामोडींमुळे केजरीवाल यांची कल्पना भाजपा विरोधकांत 'आप'ला अव्वल स्थान मिळेल अशी झाली. त्या सर्व वल्गनांना दिल्लीच्या मतदारांनी वेसण घातली आहे. प्रश्न आता 'आप' आणि केजरीवाल यांचे भवितव्य काय हा आहे.

गेल्या १० वर्षांत 'आप'ने अनेक राज्यांत विधानसभा निवडणुका लढविल्या; मग त्या गोव्यात असोत किंवा गुजरातेत किंवा अन्यत्र. मात्र दिल्ली आणि पंजाब या व्यतिरिक्त 'आप'ला कुठेही यशाची चव चाखता आली नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीत काँग्रेसबरोबर आघाडी करूनही 'आप'ला एकही जागा जिंकता आली नव्हती. आता तर दिल्लीही गमावली. 'आप'कडे उरलेले एकमेव राज्य म्हणजे पंजाब. तेथे 'आप'कडे दणदणीत बहुमत असले, तरी दिल्लीच्या निकालानंतर केजरीवाल यांनी पंजाबातील 'आप'च्या आमदारांची दिल्लीत जी तातडीने बैठक घेतली त्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. पंजाबात 'आप'मध्ये सर्व आलबेल नाही का हा पहिला प्रश्न. अन्यथा दिल्लीमध्ये पराभव झाला म्हणून पंजाबच्या आमदारांची बैठक घेण्यातील प्रयोजन समजत नाही. पक्षाचे आमदार पंजाबातील असताना ही बैठक दिल्लीत का घेतली हा दुसरा प्रश्न. पक्षावर अद्याप आपलीच मांड आहे, याचे प्रदर्शन केजरीवाल यांना करायचे होते म्हणून हे केले का? ती बैठक अर्ध्या तासात संपली. तेव्हा त्या बैठकीत फारशी काही चर्चा झाली असल्याची किंवा चिंतन झाले असल्याची शक्यता नाहीच. मग अशी बैठक बोलाविण्याचे कारण काय? की, दिल्ली हातची गेल्यानंतर पंजाबात मुख्यमंत्री म्हणून जाण्यासाठी केजरीवाल चाचपणी करताहेत हा या बैठकीचा अन्वयार्थ?

आपल्याला सत्तेचा हव्यास नाही, असे केजरीवाल यांनी राजकारणात येताना भासविले होते. त्यांच्या भूमिका आणि त्यांचा व्यवहार यात अनेक विसंगती आहेत. त्यांनी आपल्या सरकारी निवासस्थानावर केलेला वारेमाप खर्च हा त्यांच्या 'सामान्यांच्या राजकारणाच्या' भूमिकेशी असाच विसंगत. तेव्हा आताही पंजाबात मुख्यमंत्रिपद त्यांना खुणावत नसेलच याची शाश्वती नाही. पण पक्ष प्रमुख म्हणून केजरीवाल यांनी सूचना केली तर भगवंत सिंग मान मुख्यमंत्रिपद सोडतीलच, याची खात्री देता येणार नाही. २०१७ सालच्या विधानसभा निवडणुकीत 'आप'ला यश मिळाले असते तर केजरीवाल हेच मुख्यमंत्री झाले असते अशी चर्चा होती आणि तसे झाले असते तर मनीष सिसोदिया दिल्लीचे मुख्यमंत्री झाले असतेही. पण २०१७ साली मुळात 'आप'ला पंजाबात सत्ता मिळाली नाही आणि संभाव्य समीकरणांना विराम मिळाला. आता दिल्लीत पराभव झाल्यावर केजरीवाल पंजाबात सरकारची सूत्रे हाती घेण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसे झाले तर तेथे 'आप'मधून त्यास कसा प्रतिसाद मिळेल हा कळीचा मुद्दा आहे. मुळात केजरीवाल सध्या जामिनावर आहेत. त्यांच्याविरोधात अनेक गुन्हे दाखल आहेत आणि आता तर त्यांच्या दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात झालेल्या कथित गैरव्यवहारांची चौकशी होण्याची शक्यता आहे. तेव्हा २०२७ साली पंजाबात मतदारांना सामोरे जाताना केजरीवाल यांचे नेतृत्व पोषक ठरेल की मारक, याची चिंता 'आप'ला आणि विशेषतः पंजाबातील पक्षनेत्यांना सतावेल, यात शंका नाही.

मुख्यमंत्रिपद नाहीच, पण साधी आमदारकीदेखील नाही अशा अवस्थेत केजरीवाल आहेत. दिल्ली महापालिकेतील 'आप'च्या काही नगरसेवकांनी भाजपामध्ये प्रवेश केल्याने तेथे राजकीय समीकरणे बदलतील आणि 'आप'चे महापौरपद धोक्यात येईल. अशा स्थितीत केजरीवाल यांना आपले राजकीय अस्तित्व टिकवायचे तर राजकारणात केवळ सक्रिय राहून पुरणार नाही तर संसदीय व्यासपीठावर स्वतःची वर्णी लावून घ्यावी लागेल. राज्यसभेत 'आप'चे काही खासदार आहेत. त्यातील कोणी केजरीवाल यांच्यासाठी राजीनामा देईल का? अन्य पक्षांत असे घडत असते. पण केजरीवाल यांना ते 'भाग्य' लाभेल का हाही प्रश्न आहे. त्यांच्यावर चालू असलेल्या खटल्यांत त्यांना दोनपेक्षा अधिक वर्षांची शिक्षा झाली तर त्यांची खासदारकी धोक्यात येऊ शकते. मग केजरीवाल यांच्यासाठी आपली खासदारकी का सोडावी, असा विद्यमान खासदारांनी पवित्रा घेतला तर नवल नाही. केजरीवाल यांची सर्व बाजूंनी कोंडी झाली आहे. १०-१२ वर्षांपूर्वी लोककल्याणाच्या, स्वच्छ राजकारणाच्या आणाभाका घेऊन केजरीवाल राजकारणात आले होते. राजकारण आणि यमुना नदी स्वच्छ करण्याची ग्वाही त्यांनी दिली होती. प्रत्यक्षात त्यांनी हे दोन्ही गलिच्छ केले. आता आत्मपरीक्षण करण्यासाठी भरपूर वेळ, पण केलेल्या घोडचुकांची दुरुस्ती करण्यासाठी फारसा अवधी नाही, अशा कात्रीत केजरीवाल सापडले आहेत. पंजाबातील 'आप'मध्ये बंडखोरी झाली नाही आणि तेथील सरकार २०२७ पर्यंत टिकले तरी दिल्लीच्या दणक्यानंतर तेथेदेखील 'आप'च्या वाट्याला तसाच पराभव आला तर आश्चर्य वाटणार नाही. लोकानुनयी राजकारण हा कार्यक्षम कारभाराला पर्याय ठरू शकत नाही हे न ओळखण्याची घोडचूक केजरीवाल यांनी केली. ती त्यांना भोवली आहे आणि ते आता राजकीय अस्तित्वाचीच लढाई खेळत आहेत. देशात अनेक पक्ष पर्यायी राजकारणाच्या उद्देशाचा गवगवा करून राजकारणात प्रवेश करतात; मतदार त्यांना संधीही देतात. पण त्या पक्षांना वैचारिक आधार नसतो आणि सत्ता अल्पावधीत मिळाल्याने संघटनात्मक बांधणीची, नेतृत्वाची फळी विकसित करण्याची निकड त्यांना वाटत नाही. अशा पक्षांचे प्रारब्ध अल्पायुषी ठरणे हेच असते. 'आप' आणि केजरीवाल त्याच वळणावर उभे आहेत. आता मागे वळून पाहताना कितीही खंत वाटली तरी पुढची वाट बिकटच नव्हे तर धूसर आहे, यात शंका नाही. ▮

९८२२८२८८१९

वेध

...आता पाकिस्तानची जिरवायलाच हवी!

विजय निचकवडे

चॅम्पियन्स ट्रॉफीचा यजमान यंदा पाकिस्तान आहे. परंतु, भारताने पाकिस्तानात सामने खेळण्यास नकार दिल्याने पाकिस्तानने लाहोर, कराची येथील मैदानांवर भारत वगळता अन्य देशांचे झेंडे लावले आहेत. त्यामुळे भारतात संतापाची लाट उसळणे स्वाभाविक आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी जे देश खेळणार आहेत, त्या सर्व देशांचे झेंडे लावणे आयसीसीच्या नियमांनुसार खरे तर बंधनकारक आहे. परंतु, पाकने खोडसाळपणा केला आहे. जाणीवपूर्वक भारताचा तिरंगा फडकवला नाही. भविष्यात पाकला याची मोठी किंमत चुकवावीच लागेल, चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी २३ फेब्रुवारी रोजी दुबईत जो सामना खेळला जाणार आहे, त्यात भारतीय संघाने पाकला पराभूत करून पहिला धडा शिकविला पाहिजे. त्याला आणखी एक कारण आहे. पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी मध्यंतरी पाकी क्रिकेट खेळाडूंशी संवाद साधला. त्यावेळी हिंदुस्थानला पराभूत करा, असे आवाहन त्यांनी केले. यातून त्यांची भारताबाबतची द्वेषभावनाच प्रदर्शित झाली. क्रिकेट हा खेळ आहे. जय-पराजय होतच असतात. पण, भारताला पराभूत करून २४ कोटी पाकिस्तानी नागरिकांना खुश करा, असे आवाहन पाकच्या पंतप्रधानाने करणे खेळभावनेला ठेच पोहोचवणारे आहे.

पाकच्या पंतप्रधानांचे हे कृत्य पाकमधील अनेक क्रिकेटप्रेमींनाही आवडलेले नाही, हेही वास्तव आहे. भारतीय संघ पाकिस्तानात खेळत नाही, त्याला ठोस कारण आहे. जोपर्यंत अतिरेक्यांना आणि त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या दहशतवादी कारवायांना खतपाणी घालणे पाकिस्तान थांबवत नाही तोपर्यंत पाकशी कोणतेही संबंध ठेवायचे नाही, हे भारताचे धोरण आहे. याबाबत एकदा नव्हे, अनेकदा पाकिस्तानला ठणकावून सांगण्यातही आले आहे. त्यामुळे स्वत:मध्ये सुधारणा न करता पाकिस्तान फक्त भारताकडूनच अपेक्षा ठेवणार असेल तर ते योग्य नाही. भारत हा चॅम्पियन्स ट्रॉफीत खेळणारा एक प्रमुख संघ आहे. त्यामुळे भारताचा झेंडा लावणे हे पाकचे कर्तव्य होते. पण, मुद्दाम भारताला डिवचण्यासाठी पाकने जे कृत्य केले आहे, त्याला भारतीय क्रिकेट संघ प्रत्यक्ष मैदानात उत्तर देईल, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. १४० कोटी भारतीयांची मनोकामना रोहित सेना पूर्ण करणार याबाबत कुणाही भारतीयाच्या मनात शंका नाही. त्यामुळे पाकशी तशीही जिरणारच आहे आणि जिरवलीही पाहिजे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताने नेहमीच पाकिस्तानला पाणी पाजले आहे. आता क्रिकेटच्या मैदानावर भारतीय झेंडा न फडकविणाऱ्या पाकला रोहित, विराट, शमी, शुभमन हेच चोख उत्तर देतील. भारतीय क्रिकेट संघाची सध्याची धडाकेबाज कामगिरी पाहून पाकी क्रिकेट खेळाडू धास्तावलेच आहेत, पाकिस्तानी चाहत्यांनीही शस्त्रे खाली टाकली आहेत. रोहित, विराट, शुभमन, जडेजा, अक्षर यांसारख्या खेळाडूंची कामगिरी पाहून पाकिस्तानी क्रिकेट रसिकांनी आधीच हार मानली आहे. त्यामुळे त्यांचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी कितीही भारतद्वेष्टेपणा केला तरीही त्याचा कोणताही परिणाम भारतीय संघाच्या कामगिरीवर होणार नाही, हे निश्चित! भारतीय संघ फार आधीच दुबईत पोहोचला आहे. आपल्या खेळाडूंनी सरावही सुरू केला आहे. प्रत्येक खेळाडूच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास स्पष्ट दिसतो आहे. आपल्या खेळाडूंचा हा सराव आणि तंदुरुस्ती पाहून पाकिस्तानचे चाहते तोंडात बोटे घालत आहेत. पाकिस्तानी चाहत्यांना त्यांच्या खेळाडूंपेक्षा भारतीय खेळाडूंवर जास्त विश्वास असल्याचे चित्र स्पष्ट दिसते आहे. पाकिस्तानी क्रिकेट रसिकांच्या ज्या प्रतिक्रिया ऐकायला येतात, त्या ऐकल्यानंतर पाकिस्तानचा क्रिकेट संघ कमजोर असल्याचेच निदर्शनास येते. न्यूझीलंडचा क्रिकेट संघ नुकताच पाकिस्तानच्या दौऱ्यावर होता. त्याचवेळी इंग्लंडचा संघ भारतात टी-२० आणि एकदिवसीय मालिका खेळत होता. तिकडे न्यूझीलंडने पाकिस्तानला त्यांच्याच मैदानांवर पराभवाची धूळ चारली आणि इकडे भारताने आपल्या मैदानांवर खेळताना इंग्लंडला चारीमुंड्या चीत केले. शिवाय, फॉर्ममध्ये नसलेल्या रोहित शर्माने शतक झळकावले. विराटनेही अर्धशतक ठोकले. शुभमन गिलने तर जबरदस्त फलंदाजी केली. अक्षर पटेलनेही चुणूक दाखवली. हे सगळे पाहून पाकिस्तानचा क्रिकेट संघ, त्यांचे चाहते चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने खेळण्यापूर्वीच गलितगात्र झाले आहेत. आता मैदानात त्यांना धूळ चारण्याची औपचारिकताच तेवढी शिल्लक राहिली आहे. ▮

९७६३७१३४१७

धर्म-संस्कृती

ऐतरेयोपनिषद : चराचर सृष्टी-निर्मितीचा इतिहास

प्रा. दिलीप जोशी

ऐतरेयोपनिषद हा ऋग्वेदांतर्गत येणारा उपनिषद आहे. या उपनिषदाचे कर्ते ऋषी महर्षी ऐतरेय महिदास आहेत. त्यांच्या आईचे नाव इतरा देवी होते. ते नितांत मातृभक्त असल्यामुळे त्यांनी त्यांचे नाव ऐतरेय धारण केले आहे. त्यावरून हा ऐतरेय उपनिषद. विशेष म्हणजे त्यांचे कुळ दास कुळ असूनही त्यांनी प्रचंड अभ्यास करून हा उपनिषद निर्माण केला. 'गुणकर्म विभागशः' सूत्राचे महिदास ऐतरेय ऋषी हे सुंदर उदाहरण आहे. या उपनिषदाचे ३ अध्याय आणि ३३ मंत्र आहेत. हे ब्रह्मविद्या प्रधान उपनिषद आहे. वेदोपनिषदातील सारगर्भ तत्त्वज्ञान सांगणारी चार महावाक्ये आहेत. १) अहं ब्रह्मास्मी २) आयमात्मा ब्रह्म ३) तत्त्वमसी ४) प्रज्ञानं ब्रह्म. यातील 'प्रज्ञानं ब्रह्म' हे महावाक्य ऐतरेय उपनिषदातील आहे. सृष्टीची रचना, मानवी शरीररचना, अन्नरचना याबाबत या उपनिषदात मंडण आहे. मानवाची निर्मिती, ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, त्यांचा कार्यकर्ता आणि ज्ञाता कोण? मृत्यूनंतर पुढे काय? जगाचा रचियता कोण? सृष्टीचे कारण कोण? नियंत्रक कोण? पालनकर्ता कोण? यावर चर्चा याच उपनिषदात आहे. साधकांनी गृहस्थाश्रमात राहून साधना करावी की गृहत्याग करूनच साधना करावी? परब्रह्म उपासनेसाठी यातील समन्वयावरही इथे चर्चा आहे. ध्यान-धारणा-प्राणायाम यावरही चर्चा आहे. या उपनिषदाची सुरुवात प्रयोजन स्पष्ट करते.

ॐ आत्मा वा इदमेक इवाग्र असिन्नन्यत्किंचन मिशत् ।
स इक्षतलोकान्नु सृजा इति ॥

सर्वांत पहिले एकमात्र केवळ आत्माच होता. 'एकाकी न रमे म्हणोनी निर्मिली चौदाही भुवने' या ओवीप्रमाणे आत्म्याला एकटे वाटू लागल्याने त्याने विचार केला आणि त्याने लोकरचना करायला सुरुवात केली.

स इमां ललोकानसृजत् । अम्भोमरीचिरमापोऽदोऽभः
परेण दिवं द्यौः प्रतिष्ठाऽन्तरिक्षं मरीचयः । पृथिवी मेरो या अधस्तात्त आपः ॥

त्याने अंभ, मरीची, मर आणि आप या चार लोकांची लोक रचना केली. द्युलोकाच्या पार स्वर्गात अंभ लोकाची रचना केली. अंतरिक्षात मरीची म्हणजे भुवलोकाची रचना केली. पृथ्वीवर मर लोकाची रचना केली. पृथ्वीच्या खाली पाताळात आप लोकांची रचना केली. ऐतरेय ऋषी यांनी मनुष्याचे शरीर आणि विराट पुरुषाचे शरीर यातील समानता विशद केली आहे. मग त्या परम आत्म्याने लोकपाल म्हणजे मनुष्य तयार करण्याचे योजिले. त्यासाठी त्याने पाण्यातून पिंड काढून त्याला आकार देऊन अवयवयुक्त जलप्रधान पुरुष पिंड तयार केला. पिंड आणि ब्रह्मांड याचा सुरेख साम्यभाव गोड शब्दात सांगितला.

तमभ्यतपत्तस्याभितप्तस्य मुखं निरभिद्यत यथाऽण्डं
मुखाद्वाग्वाचोऽग्निर्नासिके निरभिद्येतं नासिकाभ्यां प्राणः ॥
प्राणाद्वायुरक्षिणी निरभिद्येतमक्षीभ्यां चक्षुश्चक्षुष आदित्यः कर्णौ निरभिद्येतां
कर्णाभ्यां श्रोत्रं श्रोत्राद्दिशस्त्वङ्निरभिद्यत त्वचो लोमानि लोमभ्य
ओषधिवनस्पतयो हृदयं निरभिद्यत हृदयान्मनोमनसश्चन्द्रमा
नाभिर्निरभिद्यत नाभ्या अपानोऽपानान्मृत्युः
शिश्नं निरभिद्यत शिश्नाद्रेतो रेतस आपः ॥४॥

प्रथम परमात्म्याने मुख निर्माण केले ज्यात वागींद्रिय म्हणजे वाणीचे सामर्थ्य आले. त्यातून अग्नी निर्माण झाला. पुढे नासिका रंध्र म्हणजे घ्राणेंद्रिये ज्यातून वायू निर्माण झाला. त्यानंतर चक्षू म्हणजे डोळे ही दृष्टी इंद्रिये जिथे आदित्य सूर्य निर्माण झाला. नंतर कान ही श्रवणेंद्रिये त्यातून दिशा निर्माण झाल्या. त्यानंतर त्वचा या स्पर्शेंद्रियातून औषध वनस्पती निर्माण झाल्यात. हृदय या आंतरिंद्रायातून मन त्यातून चंद्रमा तर नाभीतून मलेंद्रिये त्यातून अपान वायू ज्याद्वारे मृत्यू निर्माण झाला. त्यानंतर जननेंद्रिये त्यातून रेतस ज्याद्वारे आप म्हणजे पाणी निर्माण झाले. या सर्व आप सूर्यादि देवता या पुरुषाच्या शरीरातून जलसागरात पडल्या. जेव्हा त्यांना तहान-भूक सतावू लागली तेव्हा त्या देवता परमात्म्याला म्हणाल्या, आमचे आश्रय स्थान सांगा? आमचे अन्न सांगा?

तेव्हा परमात्म्याने गौमाता निर्माण केली आणि हे तुमचे आश्रय स्थान म्हणाले. देवता म्हणाल्या ही ठीकच आहे, पण पर्याप्त नाही. मग परमात्म्याने घोडा निर्माण केला, पण देवतांना तोही पर्याप्त वाटेना. आता ईश्वराने त्या देवतांना आपण निर्माण केलेला पुरुष दाखविला. ते सुंदर रूप देवतांना भावले. मग त्यांनी आपापले स्थान निवडले. अग्नी वाणी रूपात मुखात, वायू नासिकेत प्राण रूपात, सूर्य दृष्टी रूपात नेत्रात, दिशा श्रवण रूपात कानात, औषधी रोम स्पर्श रूपात त्वचेवर, चंद्र मनाच्या रूपात हृदयात, मृत्यू नाभीमध्ये प्राणशक्ती अपान रूपात आणि जल वीर्यरूपात लिंगात समाविष्ट होऊन राहू लागले. हेच तर पिंडात ब्रह्मांड आहे. यावेळी तिथे उपस्थित क्षुधा आणि तृषा म्हणजे तहान-भूक म्हणाल्या, आमचे आश्रयस्थान सांगा? तेव्हा परमात्म्याने त्यांना वरील सर्व देवतात वाटून दिले. ज्या देवतेला जे हविषान्न दिले जाईल त्या चरूमध्ये, हवीमध्ये तुमचाही हिस्सा राहील. जसे डोळ्याला पाहण्याची भूक, कानाला ऐकण्याची भूक इत्यादी. त्यानंतर परमात्म्याने या सर्वांसाठी अन्न उत्पत्ती आणि अन्नरचना केली, पण हे अन्न या निर्माण केलेल्या पुरुषाला पाहून माघारी पळू लागले. परमात्म्याने अन्नाला बोलावले आणि आदिपुरुषाने त्याला मुखातून ग्रहण करण्याचा प्रयास केला. मुख फक्त अन्नाबद्दल बोलून तृप्त झाले; तद्वतच नाक फक्त अन्नाचे अवघ्राण करून, नेत्र केवळ अन्नाकडे पाहून तर कान फक्त ऐकून, त्वचा केवळ अन्न स्पर्शाने तर हृदय अन्नाच्या केवळ ध्यानाने तृप्त होऊ लागले. मग परमात्म्याने अपानवायू म्हणजे प्राणशक्तीद्वारा मुखाच्या छिद्रातून अन्न ग्रहण करण्याचे विराट पुरुषाला आदेशित केले. प्राणशक्ती अन्नावर निर्भर आहे. म्हणून अपानवायू अन्नग्रहण करणारा आहे. तेव्हा अन्न स्थिरावले. त्यानंतर परमात्मा केसांच्या रंध्रातून विराट पुरुषाच्या आत प्रवेशित झाले. हे परमात्मा जागृती अवस्थेत दक्षिण नेत्रात, स्वप्नावस्थेत मनात आणि सुषुप्तीत हृदयाकाशात राहतात. त्यामुळे हा विराट पुरुष म्हणजे आपला देहच पूर्णब्रह्म वाटू लागला. देवतांच्या वास्तव्यामुळे अवयवांना इंद्रद नाव पडले. पुढे 'द' काराचा लोप पावून इंद्र ही देवतांची देवता म्हणून इंद्रिय म्हणतात. हा आत्मा तीन वेळा जन्म घेतो.

आईच्या गर्भात सर्वप्रथम आत्म्याचे गर्भाधान होते. म्हणजे तो पुरुष पतिदेव वीर्यरूपाने पत्नीच्या गर्भात स्थापित होतो, त्या पत्नीच्या गर्भात पतिदेवच गर्भरूपात येतात. हा त्या पुरुषाचा पहिला जन्म. आई गर्भात भरणपोषण करते. तो गर्भरूपातला पुरुष वाढतो आणि जन्म घेतो. वडील भरणपोषण करून त्याला स्वतःच्या पायावर उभा करतात हा पुरुषाचा दुसरा जन्म. आता आपला मुलगा वारसा पुढे नेऊ शकतो ही खात्री झाल्यावर सर्वसंग परित्याग आणि मग मृत्यू. मृत्यूनंतर तो पुन्हा कुठल्या तरी गर्भात जातो हा तिसरा जन्म. पितृशरीरातून पहिला, मातृशरीरातून दुसरा आणि स्वशरीरातून तिसरा जन्म. यानंतर ज्यांचा उद्धार झाला असे वामदेव योगी सांगतात की, हा संसाराच्या वर उठून तो दिव्य लोकात जाऊन अमर होतो आणि संसारात अडकून राहिला तर पुन्हा पुन्हा जन्म घेतो. हा जन्ममरणाचा फेरा चुकावा म्हणूनच हा उपनिषद अभ्यासावा. ऐतरेय उपनिषद सृष्टीच्या उत्पत्तीचा इतिहासच आहे. ▮

९८२२२६२७३५

शिवतत्त्वासाठी 'ॐ नमः शिवाय' जप आवश्यक

माघ वद्य चतुर्दशीला महाशिवरात्र हे व्रत केले जाते. उपवास, पूजा आणि जागरण हे या व्रताचे मुख्य भाग आहेत. महाशिवरात्रीच्या दिवशी शिवाचे तत्त्व नेहमीपेक्षा एक हजार पटीने जास्त प्रमाणात कार्य करत असते म्हणून शिवतत्त्वाचा अधिक लाभ मिळावा यासाठी भगवान शिवाची भावपूर्ण पूजाअर्चा करण्याबरोबरच ॐ नमः शिवाय हा जप जास्तीत जास्त करावा. भगवान शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतो. त्या प्रहराला म्हणजे शंकराच्या विश्रांती घेण्याच्या काळाला महाशिवरात्र असे म्हणतात. शिव हा स्वतः स्वयंप्रकाशी आहे आणि तो संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतो. शिवाचे एक नाव शंकर असे आहे. शंकर म्हणजे सर्वांचे कल्याण करणारा. शिवाला देवांचे देव म्हणजे महादेव असेही म्हणतात. शिवाचे आणखी एक नाव म्हणजे महांकालेश्वर. महांकालेश्वर हा संपूर्ण विश्वाचा क्षेत्रपाल देव आहे.

शंकर पवार/नागपूर

पत्रपंडित ग. त्र्यं. माडखोलकर स्मारकाची मागणी योग्य

पत्रपंडित कै. ग. त्र्यं माडखोलकर यांचे स्मारक नागपुरात व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करणारे तरुण भारतचे माजी मुख्य संपादक सुधीर पाठक यांचे मत वाचले. पुन्हा एकदा सार्वजनिकरीत्या योग्य व्यासपीठावर हा मुद्दा उपस्थित झाला, याचा आनंद आहे. कोणीतरी नव्याने ही मागणी करायला हवी होती. याआधी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी विदर्भ साहित्य संघास १९९३ च्या सुमारास भेट दिली असताना संघाने त्यांच्या पुढ्यात दोन मागण्या ठेवल्या होत्या. एक, महाराष्ट्र शासनाचे दरवर्षी जाहीर करण्यात येणाऱ्या वाङ्मय पुरस्कारात माडखोलकरांच्या नावे एक पुरस्कार असावा आणि दुसरी माडखोलकरांचे स्मारक नागपुरात व्हावे. या दोन्ही मागण्या आश्वासन मिळूनही पूर्ण होऊ शकल्या नाहीत. पैकी पुढे माडखोलकर जन्मशताब्दी निमित्ताने ७ सप्टेंबर १९९७ रोजी प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा घेण्यात आली. त्यात तत्कालीन पालकमंत्री नितीन गडकरी तसेच नागपुरातील प्रतिष्ठित गणमान्य मंडळी, सामाजिक, साहित्यिक, पत्रकार क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते. पण तेही काम पुढे सरकले नाही.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक आघाडीचे लढवय्ये म्हणून तरी त्यांचे स्मारक व्हायला हवे होते. सुधीर पाठक यांनी माडखोलकरांच्या स्मारकाची मागणी केली, ती सफल होईल या इच्छेसह पाठक यांचे अभिनंदन!

विलास देशपांडे/९९६००३११४८

वाचक पत्रे

प्रेरणादायी छत्रपती शिवाजी महाराज

हिंदवी स्वराज्य व्हावे, हीच श्रींची इच्छा. राजमाता जिजाऊ आऊसाहेबांच्या संस्कारातील बाळकडूमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन पडले.

शिवाजी महाराजांच्या कर्तबगारीमुळेच प्रजेला जगण्याचा हक्क प्रदान झाला. हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि त्याच्या ज्वलंत इतिहासाची सुवर्णपाने घडामोडींचा वेध म्हणजे प्रत्येकाच्या नसानसात पुन्हा जगण्याची उमेद आहे. छत्रपतींच्या देदीप्यमान कामगिरीचा वेध घेणे म्हणजे शब्द अपुरे पडतात. जय भवानी, जय शिवाजी ही घोषणा अनेक वर्षांपासून प्रेरणादायी ठरत आहे. आज शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. महाराजांचे विचार आणि कर्तव्य खरोखरच प्रेरणादायी आहेत.

त्यांच्या कार्याला आणि विचारांना आपल्या आयुष्यात अनेकांनी प्रज्वलित ठेवले आहे. आणि ती जनजागृतीची मशाल पुढच्या पिढीला तितकीच महत्त्वाची वाटली म्हणून आजही दाहीदिशा छत्रपती शिवरायांच्या नामघोषाने वातावरण प्रसन्न आणि चैतन्यदायी होते. आपल्या वर्तणुकीतून शिवरायांच्या प्रतिमेला ठेच लागता कामा नये, याची काळजी आजच्या युवा पिढीने घेतली पाहिजे. गुण आणि संस्कारातून शिवराय जोपासणाऱ्यांच्या कार्यात साथ देण्याची गरज आहे. जातिभेदाची कवाडे गळून पडण्याची गरज आहे. गरीब-श्रीमंत भेद नाहीसा होण्याची आवश्यकता आहे. आपण सुधारलो तर सोबतचा सुधारेल, ही भावना रुजवण्याची गरज आहे. पर्यावरण संवर्धनाला महत्त्व देण्याची गरज आहे. आई-बहीण या नात्याला जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिवरायांचे विचार आजही आपल्या सोबत आहेत आणि त्यांची जयंती साजरी करताना कायदा आणि नियमभंग होणार नाही, याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे. ▮

प्रा. मधुकर चुटे/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विनम्र अभिवादन

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आज जयंती

सहावा वित्त आयोग स्थापणार

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

◆ **मुंबई, १८ फेब्रुवारी**

सहावा राज्य वित्त आयोग स्थापन करण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. हा आयोग १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी शिफारशी करेल. या शिफारशींबाबत अहवाल सादर करण्यास आयोगाला ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांच्या नावाची राज्यपालांकडे शिफारस करण्याचे अधिकार मुख्यमंत्र्यांना देण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. आयोगाच्या सदस्य सचिव पदावर भारतीय प्रशासन सेवेतील कनिष्ठ प्रशासकीय अधिकारीच्या श्रेणी पेक्षा कमी नसेल किंवा समतुल्य दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल. आयोगाच्या कालावधीत आवश्यक पदांची निर्मिती करण्यास, आयोगाचे कामकाज अधिक परिणामकारकरीत्या चालण्यासाठी आवश्यक कार्यालयीन खर्चाकरिता पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली. सहावा राज्य वित्त आयोग पंचायती व नगरपालिका यांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करून पुढील बाबींच्या संबंधात शिफारशी करील. आयोगास केंद्रीय वित्त आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन त्यांच्या शिफारशी करता येतील.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

महापालिका आयुक्त तेली यांची बदली; नूतन आयुक्तपदी डॉ. सचिन ओंबासे

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१८ फेब्रुवारी-

सोलापूर : सोलापूर महापालिकेच्या आयुक्त शितल तेली - उगले यांची बदली झाली आहे. त्यांच्या जागी नूतन आयुक्त पदी धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नूतन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे हे गुरुवार दि. २० फेब्रुवारी रोजी आयुक्त पदाचा पदभार घेणार आहेत.

मुंबई मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागातील अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही.राधा यांनी सोलापूर महापालिकेच्या नूतन आयुक्तपदी

धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे आदेश आज काढले आहेत. शासनाने ओंबासे यांची बदली केली असून, त्यांची नियुक्ती सोलापूर महापालिका आयुक्त या पदावर शितल उगले-तेली यांच्या जागी ते पद वरिष्ठ समय श्रेणीत अवनत करून केली आहे. आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून, नवीन पदाचा कार्यभार तेली-उगले यांच्याकडून त्वरीत स्वीकारावा, असे डॉ. ओंबासे यांच्या बदली आदेशात म्हटले आहे. आयुक्त शितल तेली-उगले यांची नेमकी कोणत्या पदावर आणि कुठे बदली झाली या संदर्भात माहिती स्पष्ट झाली नाही. आयुक्त शितल तेली उगले यांनी दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ रोजी येथे आयुक्त पदाचा पदभार घेतला. त्यांची बदली कुठे आणि कोणत्या पदावर याबाबत मात्र स्पष्ट माहिती मिळू शकली नाही.

सांगोला, मंगळवेढ्यातील सिंचनासाठी पाणी होणार उपलब्ध

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेच्या सौर उर्जा प्रकल्पासाठी १ हजार ५९४ कोटींच्या निधीला मंजुरी

मुंबई, १८ फेब्रुवारी-

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेसाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे व योजनेची ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्यासाठी १ हजार ५९४ कोटी रुपयांना मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे योजनेसाठी लागणाऱ्या दरवर्षी सुमारे ३९८ दशलक्ष युनीट वीजेची गरज भागवली जाणार आहे. म्हैसाळ सिंचन योजनेचा उद्भव कृष्णा नदीवर म्हैसाळ येथे आहे. येथून विविध टप्प्यांमध्ये २३.४४ अब्ज घनफूट पाणी उचलून त्याद्वारे सांगली जिल्ह्यातील मिरज, कवठे महांकाळ, तासगांव, जत व सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा या तालुक्यातील अवर्षण प्रवण भागातील १ लाख ८ हजार १९७ हेक्टर क्षेत्रास सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

योजनेचा वीज वापराचा खर्च कमी करणे व हरित उर्जा निर्मितीसाठी कायमस्वरुपी उपाय योजना म्हणून हा ऊर्जा कार्यक्षम जलव्यवस्थापन प्रकल्प राबवण्यात येणार आहे. या करिता केएफडब्ल्यु जर्मन बँकेकडून १३० मिलियन युरो (अंदाजे १ हजार १२० कोटी) कर्ज स्वरूपात व ४७४ कोटी राज्य शासनाची गुंतवणूक अशा एकूण १ हजार ५९४ कोटी किंमतीच्या प्रकल्पासाठी त्रिपक्षीय करार करण्यास मान्यता दिली आहे. तसेच यात एपीएफसी व एससीएडीए- स्काडा यंत्रणा बसवणे व २०० मे.वॅ. क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी करणे, तयार झालेली वीज स्वतंत्र विद्युत वाहिनी द्वारे २२०/३३ के. व्ही नरवाड उपकेंद्रापर्यंत पुरवणे या कामांचा समावेश आहे.

नव्या मुख्यमंत्र्याची आज निवड

◆ **नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

विधिमंडळ पक्षाचा नवा नेता निवडण्यासाठी दिल्ली भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक बुधवारी होत आहे.गुरुवारी रामलीला मैदानावर दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्याचा शपथविधी सोहळा थाटात होणार आहे.

शपथविधी समारंभ गुरुवारी दुपारी ४.३० वाजता रामलीला मैदानावर होणार होता, पण नंतर ही वेळ बदलवण्यात आली. आता हा समारंभ सकाळी ११ वाजता रामलीला मैदानावरच होणार आहे. शपथविधी समारंभ भव्य स्वरुपात केला जाणार आहे. ◀ *(वृत्तसंस्था)*

राज्य अमली पदार्थविरोधी कृती दल स्थापन करणार

मुंबई, १८ फेब्रुवारी-

राज्यात अमलीपदार्थ विरोधी कृतीदल स्थापन करण्यास व यात लागणाऱ्या मणुष्यबळासाठी ३६४ पदांना आणि त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. राज्यात अमली पदार्थविरोधी कृतीदल स्थापन करण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली. या कृती दलासाठी आवश्यक असणारे ३४६ पदांच्या मनुष्यबळाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

यापैकी ३१० पदे नियमित असतील, तर ३६ पदे बाह्य यंत्रणेकडून भरली जाणार आहेत. यात एक विशेष पोलिस महानिरीक्षक, एक पोलिस उपमहानिरीक्षक, तीन पोलिस अधीक्षक, तीन अपर पोलिस अधीक्षक, १० पोलिस अधीक्षक, १५ पोलिस निरीक्षक,१५ सहाय्यक पोलिस निरीक्षक,२० पोलिस उपनिरीक्षक, ३५ सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक, ४८ पोलिस हवालदार, ८३ पोलिस शिपाई, १८ चालक पोलिस हवालदार, ३२ चालक पोलिस शिपाई, एक कार्यालय अधीक्षक, दोन प्रमुख लिपीक,११ वरिष्ठ श्रेणी लिपीक, ७ कनिष्ठ श्रेणी लपीक, २ उच्च श्रेणी लघुलेखक, तीन निम्न श्रेणी लघुलेखक नियमित स्वरुपात घेतले जाणार आहेत. तीन वैज्ञानिक सहाय्यक, तीन विधि अधिकारी, १८ कार्यालयीन शिपाई, १२ सफाईगार असे एकूण ३६ पदे कंत्राटी पद्धतीने बाह्य यंत्रणेद्वारे भरल्या जाणार आहे. यासाठी लागणारा आवश्यक खर्च १९ कोटी २४ लाख १८ हजार ३८० रुपये तर, वाहन खरेदीसह अन्य खर्चास ३ कोटी १२ लाख ९८ हजार रुपयांना मान्यता देण्यात आली.

मनपातील सहअभियंता नाईकवाडी, कनिष्ठ अभियंता खानापूरे पोलीस कोठडीत

महापालिकेची २ कोटींची फसवणूक केल्याचे प्रकरण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

महापालिकेतील बांधकाम परवाना विभागातील सहाय्यक अभियंता झाकीर हुसेन आलाबक्ष नाईकवाडी व कनिष्ठ अभियंता श्रीकांत बसन्ना खानापुरे यांना महापालिकेची फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. महापालिकेत खळबळ उडाली आहे.

जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या दरम्यान वरील दोन्ही आरोपी हे महापालिकेच्या बांधकाम विभागात अधिकारी म्हणून काम पाहत होते. त्या काळात त्यांनी महापालिकेची जाणीवपूर्वक फसवणूक केली. त्यांनी एकूण ५६ बांधकाम परवानामध्ये महापालिकेचे सुमारे दोन कोटी सात लाख ८८ हजार ३५ रुपयांचे नुकसान केल्याचे दिसून आले. याप्रकरणी बांधकाम विभागाचे उपअभियंता बसवराज मठपती यांनी पोलिसात तक्रार दिली होती. दरम्यान मंगळवारी पोलिसांनी नाईकवाडी आणि खानापुरे या दोघांना अटक केली. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. यात आरोपतर्फे ॲड . शशी कुलकर्णी, ॲड .गुरुदत्त बोरगावकरॲड. रणजित चौधरी तर सरकारतर्फे ॲड.अमर डोके यांनी काम पहिले.

राज्यातील ९ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई, १८ फेब्रुवारी-

राज्य सरकार सेवेतील ९ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. याबाबतचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने जारी केले आहेत. डॉ. विजय सुर्यवंशी यांची कोकण विभागाचे नवे विभागीय आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. विजय सुर्यवंशी यांची विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई, डॉ. राजेश देशमुख यांची आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई, श्रीमती नयना गुंडे यांची महिला व बाल आयुक्त पुणे, श्रीमती. विमला आर. यांची निवासी आयुक्त आणि सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली, अहिल्यानगर जिल्हाधिकारी सिद्धाराम सलीमठ यांची साखर आयुक्त, पुणे, मिलिंदकुमार साळवे यांची जिल्हा परिषद, भंडारा येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. सचिन ओंबासे यांची आयुक्त सोलापूर महानगरपालिका, लीना बनसोड यांची आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक येथे नियुक्ती करण्यात आली आहे,

राहुल कुमार मीना (प्रकल्प अधिकारी, खढउझ, गडचिरोली आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, गडचिरोली उपविभाग, गडचिरोली) यांची लातूर येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

यूपीएससी-ईडब्ल्यूएसला वयात ५ वर्षे सूट

नऊ प्रयत्नांची संधी

मध्यप्रदेश हायकोर्टाचा निर्णय

◆ **भोपाळ, १८ फेब्रुवारी**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२५ साठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल (ईडब्ल्यूएस) उमेदवारांनाही पाच वर्षांची वयाची सवलत मिळणार आहे. त्यासोबतच नऊ वेळा प्रयत्न करण्याचीही सवलत देण्यात येईल.

नऊ प्रयत्नांची अट केवळ आरक्षित प्रवर्गासाठी लागू होती, ती सवलत ईडब्ल्यूएसलाही मिळावी, असे न्यायालयाने म्हटले. मध्य प्रदेश हायकोर्टाने हा निकाल दिला आहे. यंदा ९७९ पदांच्या परीक्षेसाठी अर्ज मागवण्यात आले होते.

शिक्षक निवड भरती परीक्षा २००४ च्या संदर्भात सुनावणीवेळी हा निकाल दिला. मुख्य न्यायमूर्ती सुरेशकुमार कैत आणि न्या. विवेक जैन यांच्यासमोर ही सुनावणी झाली. यूपीएससीत वयाची मर्यादा व अटेम्प्ट निश्चित करण्याचे अधिकार केंद्राला आहेत, असा युक्तिवाद राज्य सरकारने केला होता.

इतर परीक्षांत ईडब्ल्यूएसला सवलत मिळते तर यूपीएससीत का नाही, असा सवाल न्यायालयाने केला. ◀ *(वृत्तसंस्था)*

सध्याची वयोमर्यादा

- खुला प्रवर्ग : २१ ते ३२ वर्षे (कोणतीही सवलत नाही)
- ईडब्ल्यूएस : २१ ते ३२ वर्षे (कोणतीही सवलत नाही)
- ओबीसी : २१ ते ३५ वर्ष (३ वर्षांची सवलत)
- एससी/एसटी : २१ ते ३७ वर्षे (५ वर्षे सवलत)

प्रयत्नांची मर्यादा : खुला प्रवर्ग ६, ईडब्ल्यूएस ६, ओबीसी ९, खुला प्रवर्ग (दिव्यांग) ९, ओबीसी दिव्यांग : ९, एससी/एसटी व अक्षम माजी सैनिक (ओबीसी): कोणतीही मर्यादा नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्याच मंत्र्यांवर संतापले

मुंबई, १८ फेब्रुवारी-

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची अतिशय महत्त्वाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सहा मोठे निर्णय घेण्यात आले.

या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आपल्या मंत्र्यांवर चांगलेच संतापले. कॅबिनेट बैठक होण्यापूर्वीच कॅबिनेटचा अजेंडा हा छापला जातो. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित मंत्र्यांना अशाप्रकारे पुन्हा वागू नये, यासाठी तंबी दिली. याबाबत आता सूचना केल्यानंतरही बदल झाला नाही तर थेट कारवाई करु, असा देखील मोठा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

आता जवान हनी ट्रॅपमध्ये अडकणार नाहीत

एमशिल्ड २.० ॲप्लिकेशन तयार

◆ **नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

पाकिस्तानकडून अनेकदा भारतीय जवानांना हनी ट्रॅपमध्ये अडकवण्याचा आणि त्यांच्याकडून गुप्त माहिती काढण्याचा प्रयत्न केला जातो. अशी प्रकरणे अनेक वेळा समोर आली आहेत. मात्र, आता भारतीय लष्कराने असे एक ॲप्लिकेशन तयार केले आहे, त्यामुळे शत्रू राष्ट्र कधीही भारतीय जवानांना हनी ट्रॅपमध्ये अडकवू शकणार नाही.

या ॲप्लिकेशनचे नाव एमशिल्ड २.० आहे. जवानांकडून नकळत कोणतीही माहिती लीक होऊ नये, यासाठी हे ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. हे ॲप्लिकेशन फक्त लष्कराचे जवान डानलोड करू शकतात तसेच कोणत्याही लष्करी जवानाने कोणतेही बनावट ॲप्लिकेशन डानलोड केले आहे की नाही, हे फक्त अधिकाऱ्यांनाच कळते. हे एमशिल्ड २.० हे देखील सांगते की, कोणताही पीआयओ कॉल आला आहे की नाही, जो बहुतेकदा हनी ट्रॅपमध्ये केला जातो.

लष्कराच्या अधिकाऱ्याने सांगितले की, या ॲप्लिकेशनचा वापर केल्यानंतर आतापर्यंत हनी ट्रॅपचा एकही प्रकार घडला नाही. या मोबाईल ॲप्लिकेशनची खास गोष्ट म्हणजे, ते फक्त लष्करी जवानच वापरतात. कोणताही जवान जाणूनबुजून किंवा अजाणतेपणे या हनीट्रॅपचा बळी पडू नये, यासाठी लष्कराने हे मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले आहे. दरम्यान, याबद्दल कॅप्टन शिवानी तिवारी म्हणाल्या की, सध्या हे ॲप्लिकेशन आमच्या रोमियो फोर्समध्ये वापरले जात आहे. ◀ *(वृत्तसंस्था)*

हनी ट्रॅप म्हणजे काय?

शत्रू राष्ट्राकडून जवानांसाठी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी हनी ट्रॅपचा वापर केला जातो. यात एक सुंदर महिला जवानांच्या संपर्कात येते. सोशल मीडियाच्या माध्यमातून पोस्ट लाईकपासून सुरू झालेला संपर्क वाढवण्यात येतो. काही कालावधीतच ती महिला त्या जवान अथवा अधिकाऱ्यांकडून शस्त्रे, तळ, विमाने इत्यादी महत्त्वाची माहिती काढून घेते. ज्यावेळी हे सैनिकाला लक्षात येते की, आपली फसवणूक झाली आहे, तोपर्यंत शत्रू राष्ट्राकडे ही माहिती पोहचलेली असते.

अश्लील कंटेंट रोखण्यासाठी सरकार काही करीत आहे का?

सुप्रीम कोर्टाचा सवाल

◆ **नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

काही घाण भरलेली आहे आणि त्यामुळेच त्याने शोमध्ये अशा प्रकारचे विधान केले. अशा प्रकारच्या वर्तणुकीची निंदा केली गेली पाहिजे. हे सहन करता कामा नये. फक्त स्वतःला असे समजतो की, तो खूप प्रसिद्ध आहे आणि कोणतेही शब्द बोलू शकतो. मग तो संपूर्ण समाजाला हलक्यात घेत आहे का? पृथ्वीवर कुणी आहे का, ज्याला ही भाषा आवडेल?, असा सवाल न्यायालयाने केला.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावावर कोणालाही सामाजिक मूल्यांच्या विरोधात काहीही बोलण्याची मोकळीक नाही. समाजाचे स्वतःचे काही मूल्ये आहेत. समाजाचे आपली कक्षा आहे आणि तुम्ही त्याचा आदर केला पाहिजे, अशा शब्दांत न्यायालयाने अलाहाबादियाला खडसावले. ◀ *(वृत्तसंस्था)*

अश्लील शो बंद करा, महिला आयोगाच्या सूचना

इंडियाज गॉट लेटेंट या कार्यक्रमासंदर्भात तक्रार आली होती. हा शो अश्लील असल्याने बंद करावा, अशी मागणी केली होती. रणवीर अलाहाबादी याच्यावर गुन्हा दाखल झाला होता. मात्र, उच्च न्यायालयाचा निर्णय आला आहे की, विविध तक्रारी देशभरातून दाखल झाल्या आहेत, त्या एका ठिकाणी कराव्या. आम्ही निर्णयाचे स्वागत करतो. सोशल मीडियावर अनेक शो सध्या सुरू आहेत. अशा तक्रारी आल्यास आम्ही यासंदर्भात कारवाई करू. अश्लील शो बंद करावे, अशी सूचना आम्ही पोलिसांना केली आहे, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी दिली आहे.

दिल्लीतील केशवकुंज संघ कार्यालयाचे आज उद्घाटन

◆ **नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दिल्लीस्थित झेंडेवाला संघ कार्यालयाच्या नूतनीकृत इमारतीचे औपचारिक उद्घाटन बुधवारी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते होत आहे.

राजधानी दिल्लीतील झेंडेवाला मंदिराला लागून असलेल्या आणि केशवकुंज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संघ कार्यालयाच्या नूतनीकरणाच्या बांधकामाचे भूमिपूजन २०१६ मध्ये सरसंघचालक डॉ. भागवत यांच्याच हस्ते झाले होते. उद्या होणाऱ्या उद्घाटन समारंभाला सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे तसेच गोविंददेव गिरी महाराज प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

केशव स्मारक समितीने ३.७५ एकर जागेवर हे संघ कार्यालय उभारले आहे. या ठिकाणी १३ मजल्यांचे तीन भव्य मनोरे बांधण्यात आले. साधना, प्रेरणा आणि अर्चना नावाचे तीन मनोरे या संकुलात आहेत. हे तीन मनोरे मिळून यात ३०० लहानमोठे कक्ष तसेच दोन सभागार आहेत. रामजन्मभूमी आंदोलनाचे नेते विहिंपचे अशोक सिंघल यांच्या नावाने ४६३ आसनाचे सभागृह या ठिकाणी उभारण्यात आले आहे. याशिवाय १२० आसनक्षमतेचे दुसरे छोटे सभागृहही या ठिकाणी आहे. ६०० आसनक्षमतेचे आणखी एक सभागृह या परिसरात असून, त्यात स्थायी स्वरूपाची खुर्च्यांची आसनव्यवस्था नाही. नियमित शाखेसाठी एक मैदानही या परिसरात असून, तेथे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा पुतळा उभारण्यात आला आहे.

७५ हजार स्वयंसेवकांचे योगदान

या संपूर्ण इमारतीच्या बांधकामाला १५० कोटी रुपये खर्च आला असून, देशभरातील ७५ हजार स्वयंसेवकांनी दिलेल्या आर्थिक योगदानातून हे बांधकाम करण्यात आले आहे. १९३९ पासून या ठिकाणी संघ कार्यालय आहे. आधी १९६२ तसेच नंतर १९८० मध्ये त्यात काही सुधारणा करण्यात आल्या. नंतर हे कार्यालय लहान पडू लागल्यामुळे या ठिकाणी भव्य आणि अत्याधुनिक असे कार्यालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

पाच टक्के पैशाचे आमिष दाखवून ८० लाखांची केली फसवणूक

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

५ टक्के पैशाचे आमिष दाखवून शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवण्यास लावले, मात्र ठरल्याप्रमाणे पैसे न देता ८० लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी पैलवान पती-पत्नी विरुध्द विजापूर नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.

निवृत्ती मारूती पैलवान व त्यांची पत्नी रेखा निवृत्ती पैलवान(दोघे रा. १०५ आर्श रेसिडेन्सी,एसआरपी कॅम्प जवळ, विजापूर रोड, सोलापूर) अशी फसवणुकीचा गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. ही घटना १ ऑगस्ट २०२१ ते २० जानेवारी २०२५ दरम्यान घडला आहे. याबाबत आशिष अशोक पाटील (वय २५ रा. न्यू संतोष नगर,जुळे सोलापूर)यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विजापूर नाका पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करून ५ टक्के दराने मोबदला देण्याचे अमिष दाखवले. जुळे सोलापुरातील भंडारे स्पोर्ट क्लब,इंद्रजीत मेडीकल समोर, बॉम्बे पार्क, न्यू संतोष नगर, आरोपीच्या घरी असे विविध ठिकाणी रोख व ऑनलाईन पध्दतीने असे एकुण ८० लाख रुपये दिलेत. ठरल्याप्रमाणे फिर्यादीस २० जानेवारी २०२५ नंतर ठरल्याप्रमाणे मोबदला दिला नाही.फिर्यादीचा विश्वास भंग करून अर्थिक फसवणूक केली आहे

राजधानीत अभिजात मराठीचा अभूतपूर्व जागर

मराठी साहित्य संमेलनात भरगच्च कार्यक्रम

◆ **नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

यंदाचे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन येत्या शुक्रवारपासून नवी दिल्ली येथील ताल कटोरा स्टेडियममध्ये उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरीत होणार आहे. या संमेलनात २१ ते २३ फेब्रुवारीपर्यंत कविसंमेलन, मुलाखत, परिसंवाद, परिचर्चा असे वेगवेगळे एकापेक्षा एक सरस भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे आयोजक असणाऱ्या सरहद संस्थेचे प्रमुख संजय नाहर यांनी आज महाराष्ट्र सदन येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

ताल कटोरा स्टेडियममधील छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरीत ९८ वे साहित्य संमेलन होत असून या संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

दुपारी साडेतीनला विज्ञान भवनात होणाऱ्या उद्घाटनाच्या मुख्य सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, स्वागताध्यक्ष शरद पवार यांची प्रमुख उपस्थिती असेल.

त्यानंतर सायंकाळी ६.३० वाजता उद्घाटनाचे दुसरे सत्र संमेलनस्थळी होणार असून माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षेतेखाली होणाऱ्या कार्यक्रमात मराठी भाषा मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असेल. मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांचे पूर्वाध्यक्ष भाषण होईल, तर संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांचे अध्यक्षीय भाषण होईल. तत्पूर्वी सकाळी ग्रंथदिंडी काढण्यात येणार असून ध्वजारोहण होणार आहे.

पहिल्या दिवशी सायंकाळी अखेरच्या सत्रात निमंत्रितांचे कविसंमेलन होणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील तसेच दिल्लीतील निवडक नामवंत कवी सहभागी होणार आहेत. संमेलनाच्या ठिकाणी मोठ्या संख्येने प्रकाशकांचे स्टॉल असणार आहेत, तसेच याठिकाणी संत महापती मंच असून तिथे इच्छुक साहित्यिकांच्या पुस्तकांचे प्रकाशन होईल. या साहित्य संमेलनास देशाबाहेरूनही साहित्यिक मंडळी येणार असल्याची माहिती नाहर यांनी दिली. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

बार्शीचे आनंद शेलार आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक

वेस्ट इंडिज मास्टर्स संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड

तभा वृत्तसेवा
बार्शी, दि. १८ फेब्रुवारी-

येथील हाय-परफॉर्मन्स क्रिकेट सेंटरचे प्रमुख प्रशिक्षक आनंद शेलार यांची निवड वेस्ट इंडिज मास्टर्स संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून झाली आहे. इंटरनॅशनल मास्टर्स लीगमध्ये खेळणाऱ्या या संघाचे नेतृत्व क्रिकेट दिग्गज ब्रायन लारा करत आहेत. या स्पर्धेत सचिन तेंडुलकर, युवराज सिंग, इरफान पठाण, कुमार संगकारा, शेन वॉटसन, इऑन मॉर्गन, जॅक्स कालिस यांसारखे महान खेळाडू सहभागी आहेत. ही लीग मुंबई, वडोदरा आणि रायपूर येथे २२ फेब्रुवारीपासून सुरु होत असून, सामन्यांचे थेट प्रक्षेपण डिस्ने+ हॉटस्टार, कलर्स आणि कलर्स सिनेप्लेक्स वर होणार आहे. याआधी आनंद शेलार यांनी रोड सेफ्टी वर्ल्ड सिरुजमध्ये वेस्ट इंडिज लेजेंड्स आणि साऊथ आफ्रिका लेजेंड्स संघांचे मार्गदर्शन केले होते. त्याचबरोबर त्यांच्या क्रिकेट अकॅडमीतील १४ खेळाडूंनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवड चाचण्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत जिल्हा संघात स्थान मिळवले आहे. यासह आनंद शेलार लवकरच दुबई टी १० लीग आणि लंका टी१० लीगमध्ये सहाय्यक प्रशिक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारण्याची शक्यता आहे. त्यांच्या या उल्लेखनीय वाटचालीमुळे महाराष्ट्रातील युवा खेळाडूंना प्रेरणा मिळत आहे.

स्पेनचा भारतावर एका गोलने विजय

भुवनेश्वर : साक्षी राणाने वरिष्ठ आंतरराष्ट्रीय पदार्पणात प्रभावी गोल केला,पण मंगळवारी कलिंगा स्टेडियमवर झालेल्या महिला एफआयएच हॉकी प्रो-लीग २०२४-२५ मध्ये स्पेनकडून भारताचा ४-३ असा एका गोलने पराभव झाला. भारताकडून साक्षीने ३८ व्या मिनिटाला, बलजीत कौर ने १९ व्या मिनिटाला व ऋजाता दादासो पिसाळ्ने ४५ व्या मिनिटाला गोल केले, तर स्पेनकडून एस्टेल पेटचे (२५ वे , ४९ वे मिनिट), सोफिया रोगोस्की (२१ वे मिनिट) आणि कर्णधार लुसिया जिमेनेझने (५२ वे मिनिट) गोल केले. पहिला चरण चुरशीचा झाला. ऋजाताने डावीकडून चेंडू शर्मिला देवीकडे पास केला तेव्हा भारताला सुरुवातीची संधी मिळाली, परंतु तिचा फटका पोस्टमधून थोडक्यात हुकला. स्पेनने त्यांचा खास फ्रीफ्लोइंग हॉकी खेळण्याचा प्रयत्न केला, परंतु भारताच्या बचावात्मक दबावासमोर त्यांना संघर्ष करावा लागला.

अष्टपैलू शार्दुल ठाकूर एसेक्सशी करारबद्ध

चेम्सफोर्ड : भारताचा अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूरने २०२५ च्या हंगामाच्या सुरुवातीपासून एसेक्ससोबत सात सामन्यांचा काऊंटी क्रिकेट स्पर्धेत खेळण्याचा करार केला आहे. ३३ वर्षीय शार्दुल ठाकूरने सर्व फॉरमॅटमध्ये ८३ वेळा भारताचे प्रतिनिधित्व केले आहे, यात त्याने ११ कसोटी सामन्यांध्ये एकूण १२९ बळी टिपले आहेत. यात ११ कसोटी सामन्यांधील ३१ बळींचा समावेश आहे.

विदर्भाचे पहिल्या डावातील आघाडीवर लक्ष

मुंबईची मधली फळी कोसळली ● यश राठोडचे अर्धशतक ● पार्थ रेखडेचे ३ बळी

◆ नागपूर, १८ फेब्रुवारी

येथे सुरू असलेल्या प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील उपांत्य सामन्यात दुसऱ्या दिवशी विदर्भाने १०७.५ षटकांत सर्वबाद ३८३ धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना मुंबईला दिवस अखेर ५९ षटकांत ७ बाद १८८ धावांवर रोखले. ११ चेंडूंत मधल्या फळीतील ४ गडी बाद झाल्यामुळे मुंबईला आव्हानात्मक लढाईला सामोरे जावे लागले. विदर्भाचे लहिल्या डावात आघाडी घेण्याचे लक्ष्य आहे. मुंबई अजूनही १९५ धावांनी पिछाडीवर असून त्यांच्याकडे अजून ३ गडी शिल्लक आहे.

विदर्भाने ५ बाद ३०८ धावांवरून पुढे खेळत ७५ धावांची भर घातली. यश राठोडने आपले अर्धशतक साजरे केले, परंतु कर्णधार अक्षय वाडकरचे अर्धशतक थोडक्यात हुकले. यश राठोडने ११३ चेंडूंत ७ चौकारांच्या मदतीने ५४ धावांची अर्धशतकी खेळी केली, तर अक्षयने ६२ चेंडूंत ४ चौकारांच्या मदतीने ३४ धावांची भर घातली.

पार्थ रेखडेची प्रभावी गोलंदाजी

मुंबईकडून शिवम दुबेने ५ बळी, शम्स मुलानी व रॉयस्टन डायसने प्रत्येकी २ बळी व शार्दुल ठाकूरने एक बळी मिळविला.

प्रत्युत्तर देताना मुंबईची धावसंख्या २ बाद ११३ पासून ५ बाद ११३ अशी घसरगुंडी उडाली. आपला दुसरा प्रथम श्रेणी सामना खेळताना विदर्भाचा डावखुरा फिरकीपटू पार्थ रेखडेने अजिंक्य रहाणे, सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबेला एकाच षटकात बाद केले. हे त्याचे डावातील ४१ वे षटक होते.

तीन बळी पडलेल्या षटकांत १८ धावांवर रहाणे पहिला फलंदाज होता, जेव्हा चेंडू बचावात्मक धक्का देऊन यष्टिवर परतला. त्यानंतर सूर्यकुमार यादव दोन चेंडूत शून्य धावांवर बाद झाला. दानिश मालेवारने दुसऱ्या हल्ल्यात तो रोखला कारण तो पॅडवरून आला होता. त्यानंतर दुबेने परत खेळ केला व तो स्टपभोवती सरकला आणि अथर्व तायडेने स्लिपमध्ये उत्कृष्टपणे झेल घेतला.

हर्ष दुबेचे एकूण ६० बळी

तनुश कोटियनसोबत शतकी भागीदारी करून शानदार पुनरागमन घडवणाऱ्या शम्स मुलानीला डावखुरा फिरकीपटू हर्ष दुबेने पायचीत केले, तेव्हा आणखी नाट्यमय परिस्थिती निर्माण झाली. अक्षय वाडकरने निर्णयाचा आढावा घेण्याचा निर्णय घेतला आणि रिप्लेमध्ये पुष्टी झाली की चेंडू स्टपमध्ये आदळला . दुबेने त्याचा ६० वा बळी घेतल्यामुळे मुलानीला ४ धावांवर माघार घ्यावी लागली. याबरोबरच हर्ष दुबे रणजी करंडकाच्या इतिहासातील सहावा गोलंदाज झाला. २०१९-२० च्या हंगामात जयदेव उनाडकटनंतर हर्ष दुबे एका हंगामात ६० किंवा त्याहून अधिक बळी घेणारा पहिला गोलंदाज ठरला. ◀*(तभा वृत्तसेवा)*

पाकिस्तान-न्यूझीलंड उद्घाटनीय सामना कराचीत आज

◆ कराची, १८ फेब्रुवारी

आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धेचा उद्घाटनीय सामना बुधवारी यजमान पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यान कराचीतील नॅशेल स्टेडियमवर खेळला जाणार आहे.

पाकिस्तानने २०१७ मध्ये चॅम्पियन्स चषकाची शेवटची आवृत्ती जिंकली होती. आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धेतील पहिलाच सामना पाकिस्तानचा नयूझीलंडविरुद्ध होणार असल्याळे पाकिस्तान संघात उत्साह आहे. पाकिस्तान संघात प्रतिभावान खेळाडू आहे, पण संघ अस्थिर आहे. त्यांच्यामध्ये सर्व काही ठिक आहे, पण त्यांचे नशिब अनिश्चित आहे. पण पाकिस्तानचा सर्वात लक्षवेधी सामना २३ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्ध होणार आहे. सुरक्षेच्या कारणास्तव भारतीय संघ पाकिस्तानच्या भूमीवर पाऊल ठेवण्यास नकार देत असल्यामुळे हा उभय संघादरम्यानचा सामना दुबईत खेळला जाणार आहे.

पाकिस्तान संघाचे वेगवान आक्रमण अव्वल दर्जाचा आहे. त्यांच्याकडे फखर जमान आणि सलमान अली आघा सारखे काही

मोहम्मद रिझवान मिचेल सॅण्टनर

फलंदाज आहेत ,जे प्रतिस्पर्ध्यांवर जोरदार हल्ला चढवू शकतात.

स्पर्धा सुरू होण्यापूर्वी पाकिस्तान संघासाठी एक आनंदाची बातमी आहे. त्यांचा वेगवान गोलंदाज हॅरिस रौफ तंदुरुस्त झाला आहे. न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या घरच्या मैदानावर झालेल्या तिरंगी मालिकेत दुखापतीमुळे हॅरिस रौफला बहुतेक सामन्यांना मुकावे लागले होते. तो रौफ आता तंदुरुस्त झाला आहे.

मात्र सामना सुरू होण्यापूर्वीच न्यूझीलंडला वाईट बातमी मिळाली. रविवारी अफगाणिस्तानविरुद्धच्या सराव सामन्यादरम्यान लॉकी फर्ग्युसनला दुखापत झाली. या दुखापतीमुळे लॉकी संपूर्ण स्पर्धेतून बाहेर झाला आहे. तो लगेचच मायदेशी परतणार आहे. न्यूझीलंड संघात त्याचे स्थान काईल जेमीसन घेणार आहे. जेमीसनने सप्टेंबर २०२३ मध्ये आपला शेवटचा वन-डे सामना खेळला होता.

पाकिस्तान-न्यूझीलंड सामना

स्थळ : नॅशनल स्टेडियम, कराची
वेळ : दुपारी २.३० वाजतापासून
थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्सवर

- प्रतिस्पर्धी संघ-

पाकिस्तान : मोहम्मद रिझवान (कर्णधार आणि यष्टिरक्षक), बाबर आझम, फखर जमान, कामरान गुलाम, सौद शकील, तय्यब ताहिर, फहीम अशरफ, खुशदिल शाह, सलमान अली आगा, उस्मान खान, अबरार अहमद, हॅरिस रौफ, मोहम्मद हसनैन, शादी. नसीम शाह.

न्यूझीलंड : मिचेल सॅण्टनर (कर्णधार), मायकेल ब्रेसवेल, मार्क चॅपमन, डेव्हॉन कॉनवे, काईल जेमिसन, मॅट हेन्री, टॉम लॅथम (यष्टिरक्षक), डॅरिल मिचेल, विल ओरोर्क, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, नॅथन स्मिथ, केन विल्यमसन, विल यंग, जेकब डफी. ◀*(वृत्तसंस्था)*

शिवजन्मोत्सवनिमित्त १९ तास दांडपट्टाचा विक्रम...

सोलापूर : चार हुतात्मा पुतळा चौकात मंगळवारी ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन व भारतीय लाठी महासंघाच्या वतीने शिवजन्मोत्सवनिमित्त सात मावळ्यांनी दांडपट्टा चालविण्यास सुरवात केली. मंगळवारी पहाटे पाच वाजता हा उपक्रम त्यांनी सुरू करून सलग १९ तास १९ मिनिटे १९सेंकद हा दांडपट्टा चालविण्याचा विक्रम त्यांनी १२.३० वाजता पूर्ण केला. प्रशिक्षक आश्विन कडलासकर यांच्यासह श्लोक कोळी, आदिनाथ खंडेराव, सुयश हुच्चे, अरमान पटेल, दर्शन राजोबा व प्रतोष आळंद यांचा यात समावेश आहे.

(छायाचित्र : केवल तिवारी)

पहिला माढाश्री २०२५चा मानकरी सोलापूरचा अकबर कुरेशी

माढा शहर गटातून डॉ. निखिल सोनकांबळे अव्वल

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५वी जयंती आणि अरुण कृष्णा घाडगे यांच्या अमृतम होत्सवानिमित्त घाडगे फिटनेस सेंटर आयोजित जिल्हा शरीरसौष्ठव स्पर्धेचा जीके एनर्जी माढाश्री किताब येथील अकबर कुरेशीने पटकावला.

या स्पर्धेचे उद्घाटन आमदार अभिजीत पाटील, कुर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष शहाजी चवरे, जगदाळे फाउंडेशनचे शिवाजी जगदाळे, सभापती नितीन साठे, शिवसेना नेते मनोज साठे, सुधीर लंकेश्वर, वेदांत साठे, शाहूराजे व शंभूराजे चवरे, पृथ्वीराज कानडे, समर्थ भांगे, आर्यन भांगे, किरण जाधव, दिनेश गाडेकर, रासप नेते गोरख वाकडे यांच्या उपस्थितीत पार पडले. घाडगे फिटनेस सेंटरचे मार्गदर्शक प्रवीण घाडगे यांनी प्रास्ताविक केले. सहभागी सर्व खेळाडूंची व्यवस्था घाडगे फिटनेस सेंटर व जी के एनर्जी यांच्यामार्फत करण्यात आले होते. या स्पर्धेचे परिक्षण जिल्हा शरीरसौष्ठव संघटनेचे सचिव प्रमोद काटे, सहसचिव नजीर शेख, राष्ट्रीय पंच शकील बडेकर, शरणकुमार कुंभार आणि रतिकांत पाटील यांनी केले.

ही स्पर्धा पार पाडण्यासाठी ऋषिकेश गाडे, विक्रम पाटोळे, नागेश थोरात, विनय कदम, उमेश कवडे, श्रीकांत काशीद, प्रमोद घाडगे, रितेश घाडगे, प्रणव घाडगे, घाडगे फिटनेस संचालिका गीता घाडगे आदींनी परिश्रम घेतले. स्पर्धेचे सूत्रसंचालन सुहास चवरे यांनी केले.

स्पर्धेचे गटनिहाय विजेते (प्रथम चार)

५५ किलो : अक्षय जगताप, तौफिक चांदा, तृतीय लक्ष्मण मोरे, डॉ. निखिल सोनकांबळे.
६० किलो : हरून मंगळगिरी, वाशिम शिकलकर, अमन शेख, प्रतीक कुलकर्णी.
६५ किलो : गणेश जाधव, योगेश घेवारे, नवीन दंडो,आकाश वाघमारे.
७० किलो : सलीम शेख, भीमाशंकर कोरडे, सुधीर घोडके, विनोद मोरे.
७५ किलो : निखिल चव्हाण, शाबाद नदाफ, चेतन जाधव, जयदीप पिसे.
७५ किलोवरील : अकबर कुरेशी, आकाश सुरवसे, लक्ष सुरवसे, श्रीनाथ स्वामी.
माढा शहर गट : डॉ. निखिल सोनकांबळे, विनय कदम, विनोद गोरे, रोहन साळुंखे, गौरव धुमाळ, रवींद्र मारकड

श्री चौडेश्वरी प्रिमिअर लीग किक्रेट : चेतन डेकोर संघास विजेतेपद

धनराज उदगिरी सामनावीर, कृष्णा कंदी मालिकावीर

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

जे. एम. डी. कन्स्ट्रकशन आयोजित श्री चौडेश्वरी प्रिमिअर लीग किक्रेट स्पर्धेत चेतन डेकोर हा किक्रेट संघ विजेता ठरला.

भद्रावती पेठ येथील पुंजाल मैदानावर झालेल्या क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामना राणी केटरर्स संघाविरुद्ध चेतन डेकोर संघामध्ये झाला. राणी संघाने ८ षटकांत ६ बाद ६८ धावा केल्या. चेतन डेकोर संघाने २ गडीच्या मोबदल्यात ७० धावा करुन विजय संपादन केला.

अंतिम सामन्यात धनराज उदगिरी मॅन ऑफ द मॅच ठरला तर मॅन ऑफ दि सिरिज कृष्णा कंदी यांनी पटकाविला.

चौडेश्वरी प्रिमिअर लीग स्पर्धेचे बक्षिस वितरण चौडेश्वरी तोगटवीर नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल बडगंची यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी युवक संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय बडगंची जे.एम.डी. चे संचालक जगदीप भिमरथी, चंद्रशेखर उदगिरी, श्रीनिवास चिंता, राकेश उदगिरी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी किरण अकिम, श्रीनिवास चिंता, श्रीकांत गट्टी, रोहित कंदी यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

अकलूजचा घोरपडे छत्रपती तर कुर्डुवाडीचा पटेल संभाजीराजे केसरीचा मानकरी

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ कुस्ती स्पर्धा : चांदीच्या गदेसह ७१ व ४१ हजार रुपयांचे पारितोषिक पटकाविले

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१८ फेब्रुवारी

अकलूजचा विक्रम घोरपडे हा शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ कुस्ती स्पर्धेतील छत्रपती केसरीचा तर कुर्डुवाडीचा मोईन पटेल हा संभाजीराजे केसरीचा मानकरी ठरला.

हिंदवी स्वराज्य संस्थापक, जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त डाळींबी आड शिंदे चौक येथील इंदिरा कन्या प्रशाला येथील मैदानात सोमवारी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. यावेळी शहर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील पैलवान कुस्ती स्पर्धेत सहभागी झाले होते. हलगीच्या कडकडाटात कुस्ती स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. कुस्ती स्पर्धेतील प्रमुख आकर्षण होते कै पैलवान मुरलीधर घाडगे यांच्या स्मरणार्थ छत्रपती केसरी २०२५ ज्याचे बक्षीस होते ७१ हजार रुपये रोख आणि गदा आणि कै पैलवान रामकृष्ण वानकर यांच्या स्मरणार्थ संभाजीराजे केसरी २०२५ ज्याचे बक्षीस होते ४१ हजार रुपये रोख आणि चांदीची गदा.

छत्रपती केसरीसाठी कोल्हापूरचे पैलवान शुभम कोळेकर विरुद्ध अकलूजचे पैलवान विक्रम घोरपडे यांच्यात तर संभाजीराजे केसरी ही स्पर्धा कुर्डुवाडीचे पैलवान मोईन पटेल विरुद्ध कोल्हापूरचे पैलवान चरमन नंदगोंड यांच्यात कुस्तीची प्रमुख दंगल पहायला मिळाली, सदरच्या कुस्तीच्या डावपेचने सर्वांना खिळवून ठेवले. यासह अरुण रोडगे यांच्यातर्फे ३१ हजार रोख बक्षीस आणि ट्रॉफीसाठी सोलापूरचे पैलवान रविराज सरवदे विरुद्ध, ढोकबाभूळगावचे विक्रम घोरपडे, प्रीतम परदेशी यांच्या तर्फे २१ हजार रोख बक्षीस आणि ट्रॉफीसाठी सोलापूरचे पैलवान गणेश कलागते विरुद्ध मंद्रुपचे पैलवान बबलू व्हनमाने, शैलेश पिसे यांच्या तर्फे २१ हजार रोख बक्षीस आणि ट्रॉफीसाठी अकलूजचे पैलवान आकाश ढेरे विरुद्ध कुर्डुवाडीचे पैलवान अमित सुळ, जयवंत सलगर यांच्या तर्फे २१ हजार रुपये बक्षीस आणि ट्रॉफीसाठी सोलापूरचे पैलवान नागेश कलागते विरुद्ध वटवटेचे पैलवान औदुबर पाटील, केगावचे पैलवान मनोज देवकर विरुद्ध कामतीचे पैलवान दशरथ खराडे, भोसरीचे पैलवान प्रज्योत टाकळीकर विरुद्ध सोलापूरचे पैलवान समर्थ केत, सोलापुरचे पैलवान देवधर जगताप विरुद्ध कामतीचे पैलवान अथर्व कारंडे, सोलापूरचे पैलवान विनायक मनासावले विरुद्ध कामतीचे पैलवान शौर्य भोईटे यांच्यातील लढत प्रेक्षनीय झाली.

या कुस्ती स्पर्धेत राष्ट्रीय कुस्ती पंच प्रा धनराज भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक अजित पाटील,मराठवाडा केसरी अतिष मोरे, सुरज मोरे, रवी शेळके, अप्पा जाधव, यांनी पंच म्हणून काम पाहिले. यावेळी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष नानासाहेब काळे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, जन्मनजय राजे भोसले, ज्येष्ठ वकील धनंजय माने, संदीप कारंजे, श्रीकांत डांगे, चंद्रकांत वाणकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक माने, राजन जाधव, पुरुषोत्तम बरडे, चेतन नरोटे, नरेंद्र काळे, अण्णासाहेब रोडगे, शैलेश पिसे, बाळासाहेब पुणेकर, राजू सुपाते, बापू जाधव, राजाभाऊ काकडे, श्रीकांत घाडगे, मनीष देशमुख, मनीष काळजे, विनोद भोसले, दादू रोडगे, पंकज काटकर, सुभाष पवार, अमर दुधाळ, महेश हनमे, प्रकाश ननवरे, दत्तमामा मुळे, तात्यासाहेब वाघमोडे, अंबादास शेळके, सचिन स्वामी, बसवराज कोळी, देविदास घुले, तुषार गायकवाड, कृष्णा भुरळे, जेलपेश घुले, बाबा बनसोडे, राहुल मुद्दे आदी उपस्थित होते.

मुख्य कुस्त्यांचे अंतिम विजेते : विक्रम घोरपडे (छत्रपती केसरी, ७१ हजार रुपये आणि गदा), मोईन पटेल (संभाजीराजे केसरी, ४१ हजार रुपये आणि गदा), रविराज सरवदे विरुद्ध शुभम मुळे बरोबरीत (३१ हजार आणि ट्रॉफी), गणेश कलागते व अमित सुळ (२१ हजार आणि ट्रॉफी), नागेश कलागते १५ हजार रोख आणि ट्रॉफी)

सस्नेह निमंत्रण
सप्रेम नमस्कार, आम्ही नव्याने सुरू करीत असलेल्या
यशराज ॲग्रो इंडस्ट्रीजचे
कस्तुराई फीड्स
या पशुखाद्य निर्मिती कंपनीचा
॥ उद्घाटन समारंभ ॥
डेअरी-किंग पशु आहार
दूध-सम्राट पशु आहार
बुधवार, दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३.३० वा.
शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर संपन्न होणार आहे.
शुभहस्ते
मा.ना.श्री.जयकुमार (भाऊ) गोरे, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा नूतन पालकमंत्री सोलापूर
मा. श्री. बबनरावजी (दादा) शिंदे, माजी आमदार, माढा, चेअरमन, विठ्ठलराव शिंदे सह. सा. कारखाना
मा. ना. श्री. दत्तात्रय (मामा) भरणे, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री, महाराष्ट्र राज्य
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा.श्री. संजय (मामा) शिंदे, माजी आमदार, करमाळा
प्रमुख पाहुणे
मा. श्री. राजनजी पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार परिषद
मा.श्री. अभिजित (आबा) पाटील, आमदार, माढा विधानसभा
विशेष उपस्थिती
मा. श्री. प्रा. शिवाजीराव सावंत सर, चेअरमन, भैरवनाथ शुगर्स, आलेगाव
मा. श्री. यशवंत (तात्या) माने, माजी आमदार, मोहोळ
मा. श्री. आप्पासाहेब जगदाळे, संचालक, पुणे जिल्हा मध्य. सह. बँक
मा. श्री. रणजितसिंह (भैय्या) शिंदे, चेअरमन, जिल्हा दूध संघ, सोलापूर
मार्गदर्शक
मा. डॉ. श्री. शैलेश मदने, इंटरनॅशनल सेल्स मॅनेजर, Advanced Enzymes, दुग्ध व्यवसाय तज्ज्ञ
शिवव्याख्याते - कीर्तनकार
ह.भ.प. सुसेन महाराज नाईकवाडे, शिवचरित्रकार, पुणे
या आणि इतर मान्यवर, सर्व पत्रकार बांधव, दूध उत्पादक संस्थांचे चेअरमन व सर्व पशुखाद्य वितरक यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी आपण या समारंभास उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.
आपले विनीत
श्री. गोरख महादेव खटके-पाटील (सर)
संस्थापक अध्यक्ष, यश उद्योग समूह, टेंभुर्णी
कार्यकारी संचालक, यशराज ॲग्रो इंडस्ट्रीज
समस्त खटके-पाटील परिवार व सर्व मित्र परिवार
स्थळ : प्लॉट नं. B-2 / 3, MIDC टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर

संक्षिप्त वृत्त

आदर्श स्कूलमध्ये शिवजन्मोत्सव साजरा

कुर्डूवाडी, दि. १८ फेब्रुवारी-

आदर्श पब्लिक स्कूल व जुनिअर कॉलेजमध्ये शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. प्रारंभी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे व प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिवगर्जना सादर केली. सी.बी.एस.ई. विभागातील विद्यार्थ्यांनी नृत्य व पोवाड्याच्या माध्यमातून शिवजन्मोत्सवाच्या कार्यक्रमास सुरूवात केली. झुलवा पाळणा व राजं आलं आलं या गीतांचे सादरीकरण अथर्व गोसावी व वेदांत लोंढे यांनी केले. यावेळी यावेळी शिवगीत गायन, मनोरे, पोवाडे, सीबीएससी विभागातील स्वरा माने व शौर्य हांडे यांनी स्वसंरक्षणाच्या कौशल्यांचे सादरीकरण केले. कार्यक्रमांमध्ये आरोही कांबळे, काव्या देशमुख, राधिका खारे, आर्या उबाळे, शिवराज खंडागळे, श्रेया साळुंखे, ईश्वरी काळे, राज जगताप यांनी शिवरायांबद्दल मनोगत व्यक्त केले. तसेच सृष्टी जगताप हिने शिवबा राजे हे गीत सादर केले. हिंदवी पवार व संस्कृती तरटे, भूमी मोरे यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रावर पोवाडे सादर केले. सूत्रसंचालन सहशिक्षक पंडित जाधव यांनी केले. शिवजयंतीचे औचित्य साधून 'छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, मुख्याध्यापिका शकिलाबी सय्यद, सीबीएसई विभागाच्या प्रिन्सिपल भारती मेहता व प्राथमिक विभागप्रमुख आयेशा मुलाणी उपस्थित होते.

तारामाता शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

अक्कलकोट, दि. १८ फेब्रुवारी-

श्री तारामाता प्राथमिक शाळा व शिशु विकास मंदिरचे वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन कार्यक्रम श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोल राजे भोसले, श्री स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष प्रथमेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजीव माने यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. कार्यक्रमास संस्थेचे माजी अध्यक्ष सुरेश सूर्यवंशी, विश्वस्त तानाजी चव्हाण, सुधाकर गोंडाळ, अमर शिंदे, संतोष फुटाणे, मोहन चव्हाण, ताराबाई हांडे, भीमराव साठे उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सुवर्णा कदम यांनी अहवाल वाचन केले. यावेळी विद्यार्थी प्रियंका कुलकर्णी, नागराज आलूरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, बालगीते, कोळीनृत्य, गोंधळ गीत, शेतकरी नृत्य, हिंदी मराठी चित्रपटातील गीते सादर केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापिका संयोगिता साळुंखे, सहशिक्षिका रागिणी जाधव, पुष्पा हरवाळकर, अंजली जाधव, प्रशांत सांगोळगी, राणी गरड, उमा गोंडाळ, अमोल पाटील, शितल जाधव, लता शिर्के, सुवर्णा सुरवसे, शुक्राचार्य चव्हाण यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन सहशिक्षक अरिफ शेख, आभार सहशिक्षिका शितल गोडसे यांनी मानले.

निधन वृत्त...

दिग्दर्शक रेवण उपारे

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

विजापूर रोड येथील जेष्ठ रंगकर्मी, दिग्दर्शक, रंगभूषाकार रेवण बसप्पा उपारे (वय ९०) यांचे निधन झाले. अर्धांगवायूचा झटका आल्यापासून ते आजारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, सुन, नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी सोलापूर नाट्य परिषदेच्या उपपनगरीय शाखेचे अध्यक्षपद भूषविले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक रंगकर्मी तयार झाले. वेड्याचा घर उन्हात, वऱ्हाडी माणसं, माझा कुणा म्हणून मी, संगीत कधीतरी कुठेतरी ही त्यांनी दिग्दर्शित केलेली नाटके गाजली.

मल्लेशी माशाळे

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

अक्कलकोट ता. हालचिंचोळी येथील माजी सरपंच मल्लेशी लक्ष्मण माशाळे (वय ९०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विद्यमान सरपंच श्रीशैल माशाळे यांचे ते वडील होत.

शेखर धायगुडे

पिलीव, दि. १८ फेब्रुवारी -

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील शेखर बाबासाहेब धायगुडे (वय २२) याचे शिरुरहुन दुचाकी मोटारसायकल स्पलेंडर (एम एच ४५- ए वाय ०७०९) या गाडीवरुन गावाकडे येत असताना अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने जागीच मृत्यू झाला. कुसमोड येथे त्याच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करणयात आले.

परमेश्वर नंदीकोले

अक्कलकोट, दि १८ फेब्रुवारी

येथील डबरे गल्लीतील परमेश्वर सोमनिंगप्पा नंदीकोले (वय८५) यांचे वृद्धापळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी चार मुले दोन मुली सुना नातवंडे असे परिवार होते. ते डॉ. बसवराज नंदीकोले यांचे वडील होत.

अंबादास तडकापल्ली

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

भारतीय कम्युनिस्ट पक्ष सोलापूर जिल्हा कौन्सिल शहर सचिव कॉम्रेड अंबादास तडकापल्ली (वय ५८) यांचे मंगळवारी सकाळी १० वाजता निलम नगर येथील निवासस्थानी हृदय विकाराच्या तीव्र धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्यात आई, दोन पत्नी,चार मुली, एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी अक्कलकोट रोड येथील पदमशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

वैराग्यपीठाचा वारसा लाभलेले मार्डी गावचे महात्म्य मोठे

माणूरकर महाराज; श्री मार्कंडेय ऋषी मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा

तभा वृत्तसेवा,
उत्तर सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

श्रीक्षेत्र मार्डी येथील चल-अचल नदीच्या संगमावर असलेल्या श्री मार्कंडेय ऋषींच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा तसेच श्री गणेश, शिवलिंग, नंदी, पादुका या मूर्तींचीही प्राणप्रतिष्ठापना माणूर पीठाचे पीठाधीश ष.ब्र.ज्ञ.विरपाक्ष शिवाचार्य महास्वामी यांच्या हस्ते सोमवारी (दि.१७) भक्तीभावात संपन्न झाला. श्रीक्षेत्र मार्डी गावाला शक्ती, भक्ती व वैराग्यपीठ् असा त्रिवेणी अध्यात्मिक वारसा लाभला असल्यामुळे या गावाचे महात्म्य निश्चितच मोठे असल्याचे प्रतिपादन यावेळी माणूरकर महाराजांनी केले.

शनिवार दि. १५ ते सोमवार दि. १७ पर्यंत तीन दिवस हा सोहळा चालला. श्री नागनाथ देवस्थानचे खर्गे नागेश स्वामी महाराज, श्री यमाईदेवीचे आद्यदेवीभक्त श्री रंगनाथ स्वामी मोकाशी यांचे विद्यमान वंशज ज्योतिषाचार्य रेणुकादास मोकाशी,अखिल भारतीय पुरोहित संघाचे अध्यक्ष पंडीत देविदास कुरापाटी यांच्या अधिपत्याखाली या सोहळ्यातील सर्व धार्मिक विधी पार पडले. ऋषीकेश कुरापाटी, अंबादास सरगम यांनी मंत्रघोष केले. खर्गे महाराज नागेश स्वामी, श्री यमाईदेवीचे पुजारी रंगनाथ गुरव, मानकरी रेणुकादास मोकाशी, शंकर पाटील, श्रीराम गोंधळी, भैरवनाथाचे पुजारी कुंभार, मातंगी देवीचे पुजारी भारत बोराडे, सिद्राम शिंदे,पद्मशाली समाजाचे प्रतिनिधी पुरुषोत्तम उडता, मल्लेश नराल, सुधाकर नराल, शेखर कटकम,अजय नराल हे या विधीचे यजमान होते. या सोहळ्याला मार्डीच्या सरपंच प्रांजली गणेश पवार, उपसरपंच श्रीकांत मार्तंडे, भाजपाचे नेते शहाजी पवार, मार्डी सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब पाटील, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मनोहर जगताप, माजी सरपंच अविनाश मार्तंडे, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या प्रदेश सरचिटणीस सुवर्णा झाडे, माजी जि.प.सदस्या ज्योती मार्तंडे,माजी सभापती सुरेखा पाटील, काशिनाथ कदम, कमलाकर माने, संजय वडजे, सत्यनारायण गुर्रम यांच्यासह सोलापुरातील पद्मशाली समाजातील व मार्डी गावातील सुमारे दोन हजार भाविक मोठ्या उपस्थित होते. शहाजी पवार यांनी महाप्रसादाचे योगदान दिले. पत्रकार दत्ता मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले.

मूर्ती घडविणारा कलाकार मार्डी गावचा सुपूत्र

सर्व मुर्ती सुंदर, चित्तवेधक असल्याचे प्रत्येक भाविकातून बोलले जात होते. या मुर्ती घडविणारे पंढरपूर येथील अशोक विटकर हे कलाकार मार्डी गावचे सुपूत्र असल्याचे सांगितल्यानंतर उपस्थितांनी उत्फुर्तपणे टाळ्या वाजविल्या. तर मुर्ती बसविण्यासाठी बांधलेले अधिष्ठान हे चिरेबंदी असून धामगाव येथील शंकर जाधव, सचिन जाधव, अजित देवकर या चिऱ्याचे बांधकाम करणाऱ्या कलाकारांनी हे बांधकाम केले.

नऊ जणांचे परिश्रम आणि १५ तासाचा खडा पहारा

दोन नद्यांचा संगम आणि निर्जन व निसर्गरम्य अशा वातावरणात दुर्लक्षित असलेल्या या देवस्थानाचा जिर्णोद्वार करण्याचा भाव खर्गे महाराज नागेश स्वामी, ज्येष्ठ नेते शिवाजीराव सोनार, ग्रामपंचायत सदस्य संजय इनामदार, अरुण मुडके, सामाजिक कार्यकर्ते विष्णु जगताप, शरद पवार,सोलापुरातील पद्मशाली समाजाचे नेते पुरुषोत्तम उडता, मल्लेश नराल,सुधाकर नराल यांच्या मनात उत्पन्न झाला. हे सर्वजण मोठ्या जिद्दीने दोन महिने अहोरात्र फिरले आणि मार्डीच्या अध्यात्मिक इतिहासाचे वैभव वाढविणारा हा सोहळा संपन्न झाला. मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यादिवशी विष्णु जगताप पहाटे पाच पासून सूर्यास्तापर्यंत उभे होते. त्यांनी निरंकार उपवासही केला.

नऊ ठिकाणचे जल

नुतन मुर्तींच्या अभिषेकासाठी प्रयागराज, रामेश्वर, चंद्रभागा, गाणगापूर (भिमा-अमरजा), मार्डी येथील चल-अचल नदी,यमाईदेवी मंदिर कल्लोळ, श्री नागनाथ मंदिरातील कल्लोळ व रेणुकादेवी मंदिरातील पुजेचे पाणी आदी ठिकाणचे जल आणले होते.

माऊली प्री स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १८ फेब्रुवारी-

दत्तनगर येथील माऊली प्री इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते पार पडले. यावेळी व्यासपीठावर कविता राऊत, किरण विभुते तसेच या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजयसिंह पाटील, सचिवा अर्चना पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी या शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे गाणी, नृत्य प्रकार, सामाजिक संदेश तसेच इतर कला प्रकारामध्ये नैपुण्य दाखवले. आ. राजेंद्र राऊत राऊत यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करुन कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. यावेळी कविता राऊत यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत प्रोत्साहन दिले. सूत्रसंचालन किरण विभुते यांनी केले अमोल जाधव, प्रेमा लंकेश्वर, मनीषा खडके यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रास्ताविक अर्चना पाटील व आभार विजयसिंह पाटील यांनी मानले.

इरकरवस्ती येथील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा,
पिलीव, दि. १८ फेब्रुवारी-

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील इरकरवस्ती भागात गेल्या विस दिवसापासून पिण्याच्या पाण्याची गैरसोय झाली आहे. याठिकाणी असणाऱ्या पाणीपुरवठा विहीरीत गेल्या दहा दिवसापुर्वी मयत व्यक्तीचा मृतदेह सडलेल्या अवस्थेत आढळून आला होता.त्यामुळे ते पाणी पिण्यासाठी अयोग्य झाले होते.

सदरच्या विहिरीतील पाण्याचे नमुने तपासणीसाठी सोलापूर येथे पाठविण्यात आले होते त्याचा अहवाल नुकताच आला असुन ते पाणी पिण्यासाठी अयोग्य व दुषीत असल्याने पिण्यासाठी वापरु नये असे सांगितले आहे. यामुळे या भागात सध्या पिण्याच्या पाण्याची भिषण टंचाई निर्माण झाली असुन नागरीकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. तरी याठिकाणी सुळेवाडी ग्रामपंचायतीने ताबडतोब नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी अशी मागणी सुळेवाडीचे युवा नेते विक्रम सुळे यांनी माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर, तहसीलदार माळशिरस, माळशिरस तालुक्याचे विद्यमान आमदार उत्तमराव जानकर तसेच माळशिरस तालुक्याचे माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्याकडे लेखी निवेदनादवारे केली आहे.

शिवजयंती नाचून नाही तर वाचून; आयुष व्यसन मुक्ती केंद्र, सोजर स्कूलचा उपक्रम

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि.१८ फेब्रुवारी-

आयुष व्यसन मुक्ती केंद्र, जामगाव (आ.) आणि सोजर इंग्लिश स्कूल प्राथमिक संयुक्त विद्यमाने शिवजयंती नाचून नाही तर वाचून! या अनोख्या उपक्रमाचे आयोजन या वेळी करण्यात आले.

या समयी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रिटा नेटके यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच या अभियानात सहभागी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना आपल्या जीवनात पुस्तकांची उपयुक्तता याबाबत मुख्याध्यापिका सौ. नेटके यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांनी प्रकट वाचन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक प्रसाद सहस्रबुद्धे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी परिश्रम घेतले.

आयशर ट्रकने शालेय विद्यार्थ्यास चिरडले

तभा वृत्तसेवा,
टेंभुर्णी, दि. १८ फेब्रुवारी-

माढा तालुक्यातील मौजे अकोले-खुर्द येथील बबनरावजी शिंदे विद्यालयातील पाचवीत शिक्षण घेणारा विद्यार्थी शेखर सारंग चौधरी (वय-११ वर्ष) याचे सोमवारी अपघाती निधन झाले.

शेखर हा ५.४० वाजता सुमारास वडिलांबरोबर मोटारसायकलवर बसून टेंभुर्णीकडे येत होते. आयशर ट्रकने (क्र- एच.आर-६६ सी-४९९२) त्यांच्या मोटारसायकलला (क्र. एम.एच-१२ एफ. आर-५५८३) धडक दिल्याने झालेल्या अपघातात निधन झाले. यामुळे हळहळ व्यक्त होत आहे. शेखर हा त्याचे शिक्षक वडील सारंग चौधरी यांच्या बरोबर दुचाकीवरून करमाळा-टेंभुर्णी रोडवरून टेंभुर्णीकडे येत होते. ते टेंभुर्णी रोडवरील करमाळा ब्रिजपासून एक कि.मी.अंतरावरील एका पेट्रोल पंपाजवळ आले असता पाठीमागून आलेल्या एका आयशर ट्रकने त्यांच्या मोटारसायकल पाठीमागून धडक दिली. यात मोटारसायकल खाली पडल्याने पाठीमागे बसलेला मुलगा शेखर हा रोडवर पडला तर वडील सारंग हे रोडच्या बाजूला पडल्याने ते बचावले. शेखर यास डोक्यास व छातीस जबर मार लागल्याने त्यास उपचारासाठी खासगी रूग्णालयात दाखल केले असता त्यास मृत घोषित करण्यात आले.

अपघातानंतर तो आयशर ट्रक चालक तसाच सुसाट निघून गेला. त्यास लोकांनी अडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पण त्याने जुमानले नाही. त्या दरम्यान त्याने जाताजाता आणखी दोन-तीन ठिकाणी दुचाकीस ठोकरण्याचा प्रयत्न केला. मात्र किरकोळ घटना वगळता मोठा अनर्थ टळला. त्यास दहा किमी अंतरावरील वेनेगावच्या पुढे वाहन अडवे लावून पकडण्यात यश आले. पोलिसांनी मालट्रक व चालक अखिलेशकुमार छनूलालकुमार (रा.गोपापुरा पोष्ट गढीराम धाम ता.जसवंतनगर, एटावा उत्तरप्रदेश) यास ताब्यात घेतले आहे. या घटनेची संदिप गोरख चौधरी (वय-४२) रा. निमगाव (टें) माढा यांनी फिर्याद दिली आहे. अधिक तपास पोहेकॉ ज्ञानदेव सरडे करीत आहेत. शेखर हा शांत संयमी व हुशार विद्यार्थी म्हणून वर्गात ओळखला जात होता. तो पाचवी स्कॉलरशिप परीक्षा उत्तीर्ण होऊन स्कॉलरशिपसाठी पात्र ठरला होता. त्याची मोठी बहीण ही सुद्धा याच शाळेत नववीत शिक्षण घेत आहे. ती दुपारीच पेपर संपल्याने स्कूल बसने घरी गेली होती.

विद्यार्थ्यांच्या मनामध्ये ग्रामीण विकासाचा विचार व्हावा : डॉ. मुजमुले

तभा वृत्तसेवा,
मंगळवेढा, दि. १८ फेब्रुवारी-

विद्यार्थ्यांच्या मनामध्ये ग्रामीण विकासाचा विचार व्हावा हा राष्ट्रीय सेवा योजनेचा हेतू असून विदयार्थ्यांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन ग्रामीण भागाचा विकास करावा. हा उद्देश विद्यार्थ्यांना सुरुवातीलाच माहीत असणे गरजेचे असल्याचे मत सोलापूर विदयापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना पंढरपूर विभागाचे समन्वयक डॉ.संजय मुजमुले यांनी व्यक्त केले.

श्री विदया विकास मंडळ, संचलित श्री संत दामाजी महाविदयालयाच्या फटेवाडी येथील राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबीराच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. ए. जे जाधव होते. यावेळी डॉ. संजय मुजमुले, प्राचार्य डॉ. ए. जे. जाधव, उपप्राचार्य राजेंद्र गायकवाड यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजनेच्या साहित्याचे पूजन करण्यात आले. यावेळी फटेवाडीच्या सरपंच सीमा काळुंगे, प्रकाश काळुंगे, उपसरपंच पल्लवी दिगंबर शिंदे, दिगंबर शिंदे, ग्रामपंचायत सदस्य देवाप्पा इंगोले, दत्तात्रय थोरवत, माजी सरपंच विष्णुपंत फटे, सुरेश वाडदेकर, बजरंग लेंडवे, बाळासो चव्हाण, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. डी. एस. गायकवाड, प्रा. प्रशांत धनवे, प्रा. शैलेश मंगळवेढेकर, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे समन्वयक डॉ. संजय शिवशरण, नॅक समन्वयक डॉ.परमेश्वर होनराव उपस्थित होते.

प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. डी. एस. गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.धैर्यशील भंडारे यांनी केले. तर आभार कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रशांत धनवे यांनी मानले.

आ. अभिजीत पाटलांनी घेतला शासकीय विभागांच्या कामांचा आढावा

माढा तालुक्याची आमसभा; आ. नारायण पाटील यांची प्रमुख उपस्थिती

तभा वृत्तसेवा,
माढा, दि.१८ फेब्रुवारी-

माढाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली माढा येथे सोमवारी आमसभेचे आयोजन करण्यात आले. यापूर्वी १५ वर्षांपूर्वी आमसभा घेण्यात आलेली होती. त्यांनतर आज या आमसभेचे आयोजन करण्यात आले. या आमसभेचे सचिव म्हणून गटविकास अधिकारी महेश सुळे यांनी जबाबदारी पार पाडली.

सकाळी ११ते संध्याकाळपर्यंत तासन्तास चाललेल्या या आमसभेला तहसीलदार, आमसभा सचिव तथा गटविकास अधिकारी, महावितरण कार्यकारी अभियंता, नगरपालिका मुख्याधिकारी, तालुका कृषी अधिकारी, शहर पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक,सहा. पोलीस निरीक्षक यांच्यासह ३० हुन अधिक शासकीय विभागाचे अधिकारी, विभाग प्रमुख उपस्थित होते. सोबतच क्षेत्रीय स्तरावरील ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक, केंद्रप्रमुख, सर्कल हे शासकीय कर्मचारी देखील उपस्थित होते.

करमाळ्याचे आ. नारायणआबा पाटील, नगराध्यक्षा मिनल साठे नगरपंचायत मुख्याधिकारी नेहा कंठे मा जि प सदस्य आनंदराव कानडे भारत शिंदे, संजय कोकाटे, संजय पाटील-घाटणेकर, संजय पाटील, विलास देशमुख, बाळासाहेब पाटील, जोती कुलकर्णी, ग्राम पंचायत सदस्यांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावली. प्रत्येक नागरिकाचे काम करणे वेगवेगळे विभागांच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे काम आहे तसे न झाल्यास मी हे काम जबाबदारीने पूर्ण करेल. मी छत्रपती शिवाजी महाराजांचा एक मावळा आहे, त्यांनी रयतेसाठी जी लोककल्याणकारी व्यवस्था उभी केली त्याचा पाईक होत तालुक्यातील शेवटच्या घटकांचे गाऱ्हाणे ऐकणे मी माझे कर्तव्य समजतो.

या सभेत उपस्थित नागरिकांनी सिना-माढा प्रकल्प विभाग, महाराष्ट्र वीज वितरण विभाग, भूमी अभिलेख विभाग, महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन, नगरपालिका प्रशासन, वनविभाग यांसारख्या अन्य विभागांवर समस्यांचा पाढा सुरू केला असता त्या सर्वांच्या तक्रारी ऐकून संबंधितांना तक्रारींचे निवारण करण्याच्या सूचना दिल्या. सदर सभेत वेगवेगळ्या ठरावांना मंजुरी देण्यात आली. आमसभेला पूर्वपरवानगी न घेता गैरहजर असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश आमदार पाटील यांनी सांगितले. माढा मतदारसंघातील अनेक बंधाऱ्यांची किंमती वाढवून जादा बिले काढण्यात आली, तसेच काम देखील निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याचा तक्रारीच्या अनुषंगाने उपअभियंता यांच्याकडे केले असून तक्रारी असणाऱ्या कामांच्या चौकशीची करून निकाली काढण्यात यावेत अशा सूचना दिल्या.

आमसभा ही नुसती नाममात्र नसून या सभेत कुणाच्या तक्रारीचे निवारण झाले कुणाचे नाही या सर्व गोष्टींचे माझ्या कार्यालयात लवकरच उत्तरांची आमसभाचे आयोजन करण्यात येईल यावेळी संबंधित विभागांचे सर्व अधिकारी यांनी केलेल्या कामकाजाचा आढावा मी आ. अभिजीत पाटील घेणार असल्याचे सांगितले.

शहरातील पाणी पुरवठा एक दिवसाने पुढे जाणार

लांबोटी पुलाजवळ मुख्य जलवाहिनीला गळती

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

उजनी ते सोलापूर मुख्य जलवाहिनीला गळती लागल्याने ती दुरुस्त करण्यासाठी उजनी येथून पाण्याचा उपसा होणार नाही. पाकणी जलशुध्दीकरण केंद्र येथूनही पाण्याचा उपसा कमी होणार असल्याने शहरातील काही भागातील पाणी पुरवठा उशिरा, कमी वेळ, कमी दाबाने होईल.शहर गावठाण भागातील पाणी पुरवठा एक रोटेशन एक दिवसाने पुढे जाणार आहे, अशी माहिती महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी दिली.

शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या उजनी ते सोलापूर दरम्यानची मुख्य जलवाहिनी लांबोटी पुलाजवळ नादुरुस्त झाल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत आहे. ही गळती दुरुस्ती कामासाठी गुरुवारी २० फेब्रुवारीला सोलापूर म हापालिकेमार्फत काम हाती घेण्यात येणार आहे. गळती दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने उजनी येथून पाण्याचा उपसा होणार नाही.

या कामामुळे पाकणी जलशुध्दीकरण केंद्र येथून पाण्याचा उपसा कमी होणार असल्याने २० फेब्रुवारी रोजीचा शहरातील काही भागातील पाणी पुरवठा उशिरा, कमी वेळ, कमी दाबाने होईल व तसेच उजनी पाईप लाईनवरुन आणि शहर गावठाण भागातील पाणी पुरवठा १ रोटेशन एक दिवसाने पुढे जाणार आहे. नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे श्री. चौबे यांनी केले आहे.

शिवजयंती मिरवणुकीसाठी १५०० पोलिसांचा बंदोबस्त

- शहरात २२५ मंडळांकडून छत्रपतींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना तर मिरवणुकीत ५० मंडळांचा सहभाग
- छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकाकडे येणारे सर्व रस्ते राहणार बंद
- बुधवारी मध्यरात्री एकपर्यंत वाहतूक मार्गात बदल

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शहरात सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. सोलापूर शहरात सुमारे २२५ सार्वजनिक मंडळांकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची किंवा मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली असून बुधवारी निघणाऱ्या मिरवणुकीमध्ये सुमारे ४५ ते ५० मंडळांचा सहभाग असणार आहे. श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या मिरवणुकीचे नियोजनही पूर्ण झाले. शिवजयंतीनिमित्त शहरातून निघणाऱ्या मिरवणुकीसाठी शहर पोलिसांकडून १५०० पोलिस कर्मचाऱ्यांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मिरवणुकीनिमित्त शहरातील वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. पोलिस प्रशासनाने त्याची अधिसूचना जाहीर केली. पर्यायी मार्गही सुचवले. त्यामुळे वाहनधारकांना पर्यायी मार्गांचा अवलंब करावा लागणार आहे.

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरात सुमारे २२५ सार्वजनिक मंडळांकडून महाराजांच्या प्रतिमेची किंवा मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. बुधवारी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या नेतृत्वाखाली सोलापूर शहरातून मिरवणुका निघणार आहेत. या मिरवणुकीत सुमारे ४५ ते ५० मंडळे सहभागी होणार असल्याचे माहिती मध्यवर्ती महामंडळाकडून देण्यात आली.

पोलिसांचा बंदोबस्त : पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ३ पोलिस उपायुक्त, ५ सहायक पोलिस आयुक्त, २२ पोलिस निरीक्षक, ६५ पोलिस उपनिरीक्षक, ७०० कर्मचारी, ४०० पुरुष व महिला होमगार्ड, राज्य राखीव दलाचे दोन प्लाटून. याशिवाय वाहतूक व्यवस्थेचा स्वतंत्र बंदोबस्त असणार आहे.

पारंपारिक मिरवणुकीचा मार्ग : डाळिंबी आड येथून मिरवणुकांना प्रारंभ ▸ शिंदे चौक ▸ नवीपेठ ▸ मेकॅनिक चौक ▸ बाळीवेस ▸ टिळक चौक ▸ मधलामारुती ▸ माणिक चौक ▸ दत्त चौक ▸ राजवाडे चौक ▸ डाळिंबीआड येथे विसर्जन.

नवीन मिरवणुक मार्ग : डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक, चार हुतात्मा पुतळा चौक, सरस्वती चौक, मेकॅनिकी चौक, भागवत थिएटर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक ते पुढे छत्रपती संभाजी महाराज पुतळा चौक.

बंद मार्ग : जुना पूना नाका, सुपर मार्केट, डफरीन चौक, दत्त चौक, भैय्या चौक, तरटी नाका पोलिस चौकी, सम्राट चौक याठिकाणाहून मिरवणुक मार्गाकडे येणारा रस्ता बंद राहणार आहे.

पर्यायी मार्ग : जुना पुणे नाक्याकडून, निराळे वस्ती, सुपर मार्केट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी.

शिवजन्मोत्सव खड्डा तालीम देखावा...

सोलापूर : शिवजन्मोत्सव निमित्त शहरातील खड्डा तालीम मंडळाने १५ फुट मंचावर काल्पनिक किल्ला उभारून विध्दुत रोषणाई केली आली.

स्थापत्य २०२५ प्रदर्शनाचे शुक्रवारी होणार उद्घाटन

बांधकाम व अंतर्गत सजावट विषयक माहितीचा खजिना होणार खुला

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी

असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सतर्फे भरविण्यात येणाऱ्या स्थापत्य २०२५ या बांधकाम व अंतर्गत सजावट विषयक प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार २१ फेब्रुवारी रोजी होणार असल्याची माहिती असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष प्रशांत मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हे प्रदर्शन २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी नॉर्थकोर्ट मैदानावर सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सर्वांसाठी पाहण्यास उपलब्ध राहणार आहे. या प्रदर्शनाचे प्रायोजकत्व मेटारोल इस्पात प्रा. लि. जालना यांनी घेतले आहे. याचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते व महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, मेटारोल इस्पातचे व्यवस्थापकीय संचालक डी. बी. सोनी यांची प्रमुख उपस्थितीत होईल.

नव्याने घर बांधू इच्छिणाऱ्यांसाठी तसेच घराच्या अंतर्गत सजावटीसाठीची अतिशय उपयुक्त आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती स्थापत्य प्रदर्शनातून गेल्या ११ स्थापत्य प्रदर्शनातून देण्यात येते. या प्रदर्शनात जागा विक्रीचे विविध प्रकल्प, प्रमोटर आणि बिल्डर, गृह कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था, सिमेंट कंपन्या, कन्स्ट्रक्शन केमिकल्स, स्टील, प्लंबिंग आणि सॅनेटरी वेअर, इलेक्ट्रिक मटेरियल, बांधकामास लागणारी अत्याधुनिक यंत्रे आणि उपकरणे, दरवाजे आणि खिडक्या, रूफिंग मटेरियल, टाईल्स, घरातील अंतर्गत सजावट, फर्निचर, लँडस्केपिंग, सोलार एनर्जी, लिफ्ट असे ७० स्टॉल आहेत. या स्टॉलच्या माध्यम तून सोलापूरकरांना माहिती घेता येणार आहे. या प्रदर्शनाचा सोलापूरकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन असोसिएशनचे सचिव मनोहर लोमटे यांनी केले.

या पत्रकार परिषदेस असोसिएशनचे उपाध्यक्ष भगवान जाधव, सचिव इंजि. मनोहर लोमटे, खजिनदार संतोषकुमार बायस, सहसचिव जवाहर उपासे, सहखजिनदार मनोज महिंद्रकर, माजी अध्यक्ष अमोल मेहता, कार्यकारी समिती सदस्य वैभव होमकर, चंद्रमोहन बत्तूल, सिद्धाराम कोरे, काशिनाथ हरेगावकर, गणेश इंदापुरे, शैराज होमकर, रामकृष्ण येमुल, सुनील दूधगुंडी आदी उपस्थित होते.

प्रदर्शनातून होणार पर्यावरण जागृती

स्थापत्य २०२५ चे घोषवाक्य सेव्ह एंव्हॉर्मेंट फॉर ग्रीन फ्युचर हे आहे. या विषयाची माहिती देणारा स्टॉलदेखील या प्रदर्शनात असणार आहे. स्थापत्य प्रदर्शनाच्या माध्यमातून पर्यावरण जागृतीही करण्यात येणार आहे, असे असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष प्रशांत मोरे यांनी सांगितले.

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आज घेणार सोलापूर बसस्थानकाचा आढावा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. बुधवार (दि.१९) फेब्रुवारी रोजी स. ११ वाजता मुंबई विमानतळ येथून सोलापूरकडे प्रयाण व दुपारी १२ वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन होणार आहे.

दुपारी १२.१५ वाजता येथील शासकीय विश्रामगृह येथे पदाधिकारी यांच्या समवेत चर्चा होणार आहे. दुपारी २ वाजता शासकीय विश्रामगृह येथून हॉटेल बालाजी सरोवर येथे आगमन होणार आहे. दुपारी २ ते ४ वाजता बालाजी सरोवर येथे राखीव असणार आहे. सायंकाळी ४ वाजता हॉटेल बालाजी सरोवर येथून सोलापूर बस आगार व बस स्थानक परिसरास प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करणार आहेत. या पाहणी दरम्यान सोलापूरच्या सोलापूर एसटी विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा होणार आहे. आढावा बैठकीच्या माध्यमातून सोलापूर विभाग आणि बस स्थानकाची माहिती घेणार आहेत. सोलापूर एसटी विभाग तसेच आगारातील अधिकारी कर्मचारी यांची पूर्व नियोजन बैठक घेऊन मंत्र्यांच्या दौऱ्यासाठीच्या सर्व सूचना देण्यात आल्याची माहिती सोलापूर एसटी विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी सांगितले. सोलापूर बस स्थानकाच्या पाहणीनंतर परिवहन मंत्री सरनाईक हे सायंकाळी वाजता सोलापूर बस आगार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ येथून एस.टी. ने जिल्हा धाराशिवकडे प्रयाण. रात्रौ ८.४५ वाजता बस आगार येथून सोलापूरकडे प्रयाण. रात्री १०.३० वाजता हॉटेल बालाजी सरोवर येथे आगमन व मुक्काम. गुरूवार (दि.२०) फेब्रुवारी रोजी हॉटेल बालाजी सरोवर सोलापूर येथून तुळजापूरकडे प्रयाण करणार आहेत.

एसटीच्या प्रलंबित प्रश्नांकडे परिवहनमंत्री देणार का लक्ष?

जुनापुना नाका बसपोर्ट तसेच विजापूर नाका येथील नवीन बसस्थानकाचे घोंगडे शासन दरबारी भिजतच

सोलापूरकरांना सतावतेय भविष्याची चिंता

तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव
सोलापूर, दि.१८ फेब्रुवारी-

सोलापूर आगार व बसस्थानकाची पाहणी करण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. महाराष्ट्र - कर्नाटक, महाराष्ट्र - तेलंगणा, व महाराष्ट्र - आंध्र प्रदेश या तीनही राज्यांना जोडणारा सोलापूर हा मुख्य दुवा आहे. त्यामुळे येथील परिवहन व्यवस्था मजबूत आणि नेहमीच तत्पर असली पाहिजे. असे असले तरीही सोलापूर बसस्थानकाचा कायपालट हा अद्यापही कागदावरच दिसून येत आहे. वाढीव लोकसंख्येच्या आकारमानानुसार सोलापूर बसस्थानक हे अपुरे व अडचणीचे ठरत आहे. तसेच प्रवाशांना मूलभूत सुविधा देण्यामध्ये देखील एसटी महामंडळ असमर्थ ठरत आहेत. ''प्रवाशांच्या सेवेसाठी'' हे ब्रीदवाक्य घेऊन कायम प्रवाशांच्या सोयीसाठी धावणाऱ्या लालपरीला ''अच्छेदिन'' कधी येणार हा प्रश्न कायम सतावतो आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या चाकांना कधी गती मिळणार ? हा प्रश्न देखील वारंवार उपस्थित केला जात आहे.

सोलापूर शहराचे मुख्य प्रवेशद्वार असणारे छत्रपती संभाजी महाराज चौक जुना पुना नाका येथे नवीन बसपोर्ट बनवण्याचा संकल्प तत्कालीन सरकारने हाती घेतला होता. परंतु त्याला कोणत्या गोष्टीचे ग्रहण लागले, कोणास ठाऊक ; मात्र ''नव्या बसपोर्टचे घोंगडे शासन दरबारी तसेच भिजत पडले आहे. तर दुसरीकडे हद्दवाढ भागासाठी नवीन बसस्थानक तयार करावे, अशी मागणी नागरिकांमधून वाढू लागली आहे. त्यासाठी विजापूर रोड येथे महापालिकेच्या आरक्षित जागेवर नवीन बस स्थानक निर्माण करण्यासाठी कागदपत्रे घोडे नाचवले गेले. परंतु त्याचा विषय ही तिथेच बारगळलाय''! त्यामुळे सोलापूरच्या बसस्थानकाकडे तसेच विकासाकडे परिवहन मंत्री लक्ष देणार का ? असा खडा सवाल आता सोलापूरकरांमधून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, वाढती महागाई कारण पुढे करून शासनाने एसटीची भाडेवाढ केली खरी, परंतु सुविधा देण्यामध्ये महामंडळ तसेच राज्य शासन असमर्थ असल्याचे दिसून येत आहे. वास्तविक पाहता ज्या पद्धतीने भाडेवाढ करण्याचा निर्णय महामंडळाने राज्य शासनासमोर ठेवला. त्याचप्रमाणे राज्यातील बसस्थानकांचे नूतनीकरण आणि नवनिर्मितीकरण करणे देखील गरजेचे आहे. त्यासाठी परिवहन मंत्र्यांनी पुढाकार घ्यावा. सोलापूरच्या नव्या बसपोर्टचा विषय मार्गी लावावा. बसपोर्टसह विजापूर रोड येथील नवीन बसस्थानकाचा प्रलंबित विषयावर परिवहन मंत्र्यांनी आढावा बैठक घेऊन त्यासंबंधी पाठपुरावा करावा अशी मागणी आता जोर धरू लागलेली आहे.

राज्यातील, जिल्ह्यातील, तालुक्यातील, गावपातळीवर दळणवळणाचे महत्त्वाचे साधन म्हणून लालपरीकडे पाहिले जाते. हे साधन अधिक मजबूत करणे आवश्यक्य आहे. त्यासाठी मंत्रालय स्तरावर विशेष बैठक बोलावून याविषयासंबंधी महत्त्वपूर्ण निर्णय गरजेचे बनले आहे. वाढीव भाड्यासह नवीन बी.एस. प्रणालीच्या एसटी बसेस महामंडळाच्या ताफ्यात रुजू करावेत. स्क्रॅप झालेले बसेस मोडकळीस काढाव्यात. जेणेकरून प्रवाशांच्या जीवितला कोणताही धोका निर्माण होणार नाही. यासाठी महामंडळाने प्रयत्नशील राहावे. राज्यात तसेच एसटीत भंगार एसटी बसेसचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. या सर्व बसेस निकाली काढून नवीन बसेस मार्गावर सोडाव्यात. प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीद सातत्यात उतरावे. अशी अपेक्षा आता प्रवाशांमधून व्यक्त केली जात आहे.

मराठवाडा एस.टी.स्थानकात पाण्याची टाकी परिसरात घाणीचे साम्राज्य. (छायाचित्रे : केवल तिवारी)

नव्या जागेत मंत्रीमहोदयांच्या दौऱ्यामुळे वॉलकंपाऊडचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. हे किती दिवस टिकेल?

बसपोर्टसह स्वच्छतेचा महत्त्वाचा विषय मार्गी लावा...

शहराच्या नव्या बसपोर्टचा व सोलापूर बसस्थानकासह इतर नऊ आगारातील बसस्थानकांची स्वच्छता हा मूळ एरणीचा विषय आहे. वाढीव लोकसंख्यानुसार सध्याच्या बसस्थानकावर मर्यादा येत आहेत. तसेच बसस्थानकावरील वाढती अस्वच्छता, दुर्गंधी आणि उघड्यावरच लघुशंका केली जात असल्याने, रोगराईला आमंत्रण मिळत आहे. नवनवीन साथीचे रोग बळावत आहेत. अशा परिस्थितीत सार्वजनिक ठिकाण असलेल्या बस स्थानकावर स्वच्छता असणे गरजेचे आहे. एसटी बसेसमध्ये देखील अस्वच्छता आणि मावा तंबाखू व गुटखा खाऊन थुंकलेल्या लालेलाल जागा वारंवार दिसून येतात. यावर राज्य शासनातर्फे कडक निर्बंध अन्य गरजेचे आहे. केवळ परिपत्रक अथवा सर्क्युलर न काढता त्याची अंमलबजावणी व्हावी. ही काळाची गरज बनली आहे. बस स्थानकावर नेहमीच स्वच्छता आणि दुर्गंधी असते. सर्वत्र अस्वच्छता पसरल्यामुळे रोगराईचा सामना करावा लागतो.

- योगेश कुंदूर, सामाजिक कार्यकर्ते शहीद अशोक कामटे विचार मंच

जुनापुना नाका बसपोर्ट व विजापूर रोड नवीन बसस्थानक हा पॉलिसी मॅटर

सोलापूरची वाढती लोकसंख्या लक्षात घेता पांजरापोळ व देशमुख यांच्या जागेवर उभारलेले सोलापूरचे सध्याचे बसस्थानक हे अपुरे व अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे सदरचे बस स्थानक शहराच्या मुख्य प्रवेशद्वारा असणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज चौक जुना पुना नाका बसपोर्ट येथे स्थलांतरित करावे. यासाठी कागदोपत्री प्रक्रिया राबवण्यात आली. परंतु त्यासंबंधी पुढील कार्यवाही झाली नाही. सदरचा विषय मागे पडला. वास्तविक पाहता नव्या बसपोर्टची निर्मिती गरजेची आहे. परंतु हा विषय पॉलिसी मॅटरचा विषय आहे. यावर वरिष्ठ स्तरावरून अंमलबजावणी व कार्यवाही होणे अपेक्षित आहे. त्याच पद्धतीने विजापूर रोड येथील नवीन बसस्थानकाचा विषय देखील मंत्रालय स्तरावरचा आहे. परिवहन मंत्र्यांकडे पाठपुरावा करणार आहोत.

- अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग.

बसस्थानक क्रमांक २ ची दुरावस्था कायम

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा सोलापूर जिल्हा दौरा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर तातडीने एसटी विभागाने लाव ''लिजाव टिम की बजाव''! हे धोरण अवलंबिले आहे. येथे तातडीने सुरक्षा भिंतीचे काम हाती घेतले आहे. वास्तविक पाहता येथे दररोज तळीरामांचा अड्डा भरतो. येथे एसटी महामंडळाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. तसेच मुक्कामी असलेल्या चालक वाहकांना नेहमीच विविध अडी - अडचणी आणि समस्यांना सामोरे जावे लागते. केवळ मंत्र्यांचा दौरा असल्याकारणाने दिखव्यासाठी डागडुजीची कामे हाती घेतल्याचे चित्र दिसत आहे. परंतु त्याचे मजबुतीकरण कितपत योग्य आहे. यावर शंका उपस्थित केली जात आहे.

महिलांना सवलत देऊन भाडेवाढ करणे चुकीचे

एसटी बसेसच्या प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत देऊन, दुसरीकडे भाडेवाढ करणे आयोग्य आहे. राज्य शासनाने व एसटी महामंडळाने केलेली भाडेवाढ ही मोठ्या प्रमाणात केली आहे. सदरची भाडेवाढ पाच टक्के अपेक्षित आहे.

- पूजा बिराजदार, महिला प्रवासी

बसपोर्ट संबंधी लोकप्रतिनिधींची उदासीनता

सोलापूरचे लोकप्रतिनिधी शहराच्या विकासासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. जुना पुना नाका येथील नव्या बसपोर्टचा विषय तडीस नेण्यासाठी लाखो मतदारांचे प्रतिनिधित्व करणारे लोकप्रतिनिधीच या प्रश्नावर मूक गिळून गप्प बसले आहेत का? असा प्रश्न जनतेला पडत आहे. वास्तविक लोकप्रतिनिधींनी हा विषय लावून धरणे गरजेचे होते. शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी तसेच शहरवासीयांना मूलभूत सोयी सुविधा प्राप्त करून देण्यासाठी लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेऊन यांत हस्तक्षेप करणे गरजेचे आहे. कारण नव्या बसपोर्टमुळे शहराच्या मध्यवर्ती भागातील रहदारी कमी होऊन वाहतूक कोंडी सुटू शकते. त्यामुळे हा विषय प्रधान्याने घेणे गरजेचे आहे.

- ॲड. योगेश पवार, सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ता

कुमठा नाक परिसरातील क्रमांक दोन एस.टी. स्थानकात प्रश्न अनुत्तरित आहे. सररास सांयकाळी मद्यपान अड्डा आहे.

बसस्थानकाला जोडणाऱ्या रस्त्यांची दुर्दशा कायम

सोलापूर बस स्थानकाला जोडणाऱ्या रस्त्यांची दुर्दशा कायम आहे. जी.एम. चौकाकडून बाहेर पडणाऱ्या एसटी बसेस ना नेहमीच मोठमोठ्या खड्ड्यांचा सामना करावा लागतो आहे. पावसाळ्यात या रस्त्याची अक्षरशः चाळण उडालेली असते. वाहन चालकांना तारेवरची कसरत करत बसचालवावे लागते. वाहनतळ आणि रस्ता या प्रश्नांकडे परिवहनमंत्र्यांनी लक्ष द्यावे.

- विश्वनाथ बंग, प्रवासी

शहरात शिवमय वातावरण;
विविध मंडळांच्यावतीने मिरवणुकीची तयारी

● छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आज मिरवणूक

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१८ फेब्रुवारी-

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहर शिवमय झाले आहे. जयंती निमित्त आज शहरातील प्रमुख मिरवणूक मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आकर्षक लक्षवेधी व पारंपारिक मिरवणूक काढली जाणार आहे. त्यासाठी सर्व शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने सजावटीची आणि मिरवणुकीची तयारी मिरवणूक मार्गावर करण्यात आली. मोठमोठ्या कंटेनर आणि ट्रक यांच्यावरती देखावे तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती विराजित करण्यात येणार आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून सदरची मिरवणूक सुरू होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांची सिंहासनाधीश्वर मूर्ती व त्याबाजूला मावळे असे चित्र यावेळी दिसून आले. तर शंभू महादेवाच्या पिंडीला दुधाचा अभिषेक घालताना छत्रपती शिवाजी महाराज यांचा देखावा करण्यात आला. तर नवीपेठेत विठ्ठल दर्शन देखाव्यातून कृत्रिम फुलांच्या माध्यमातून विठू माऊलीची प्रतिकृती साकारण्यात आली होती. त्यासमोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा विराजित करण्यात आला होता. तत्पूर्वी

आज मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव पाळणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर शहर व जिल्हा तसेच इतर जिल्ह्यातून अनेक महिलांनी या शिवजन्मोत्सवामध्ये पारंपरिक वेशभूषणे सहभागी झाल्या होत्या. पाळणा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हजारों संख्येने माता भगिनी या सोहळ्यासाठी उपस्थित झाल्या होत्या. दरम्यान, या मिरवणुकीमध्ये शहरातील वारकरी संघटनेचे भजनी मंडळ, लेझीम, झांज, ढोल ताशा असे पारंपरिक पथक, त्याच पद्धतीने छत्रपतींच्या जीवनावरील देखावे, लेझर शो सादर करण्यात येणार आहेत. डॉल्बी मुक्त मिरवणूक ही संकल्पना यंदाच्या वर्षी राबवून पारंपारिक वाद्य वृंदांच्या तालावर ही मिरवणूक मोठ्या उत्साहात संपन्न केली जाणार आहे.

जय शिवाजी, जय भारत पदयात्रा आज

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ९.३० वाजता दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधणार

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती दि. १९ फेब्रुवारी रोजी आहे. यानिमित्ताने केंद्र शासनाने महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यामध्ये 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रा राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. या अनुषंगाने सोलापूर येथे नवीन जिल्हाधिकारी कार्यालय ते रंगभवन उद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत हजारो विद्यार्थी, नागरिक, अधिकारी-कर्मचारी यांची जय शिवाजी जय भारत पदयात्रा आयोजित करण्यात आलेली आहे. तरी ही पदयात्रा १९ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते अकरा या कालावधीत यशस्वी करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी त्यांच्यावर दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित पूर्व तयारी बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी ठाकूर बोलत होत्या. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, तहसीलदार सर्वश्री श्रीकांत पाटील, निलेश पाटील, किरण जमदाडे यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते. अप्पर जिल्हाधिकारी ठाकूर पुढे म्हणाल्या की, प्रारंभी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या यात्रेनिमित्त हजारो विद्यार्थी, नागरिक अधिकारी, कर्मचारी यांच्याशी नवी दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे सकाळी ९.३० वाजता संवाद साधणार आहेत. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे मंडप व्यवस्था तसेच स्क्रीनची व्यवस्था केली आहे. त्यानंतर सकाळी दहा वाजता पदयात्रेचा शुभारंभ होणार आहे त्या दृष्टीने क्रीडा विभाग व अन्य संबंधित विभागाने पदयात्रा आयोजन यशस्वी होण्यासाठी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करावे, असे त्यांनी निर्देशित केले.



ज्ञानामृत आनंदलहरी - १०३३

सेना म्हणे हेचि सुख ।
नाही ब्रम्हयासी देख ।।

भगवंत भक्तीचे अनेक प्रकार आहेत. असे असले तरीही वारकरी मंडळी जी भोळया भावनेने जमेल तशी भकती करतात, ती भक्ती पांडुरंगाला खूप आवडते. अशी भक्ती देवांनाही करता येत नाही. लाखोंच्या संख्येने दिंडीत येणे. कीर्तन, भजनात एकत्र जमणे हे देवांना शक्य नाही. कीर्तन, भजन हा वारकरी संप्रदायाचा आधारस्तंभ आहे. किर्तनाच्या, प्रवचनाच्या माध्यमातून स्वपरीचयाचा, आत्म ोन्नतीचा, सुखशांतीचा संदेश वारकरी सांप्रदाय उभ्या जगाला देत असतो. संसारात अडकलेल्या जीवाला देह म्हणजेच मी असे वाटत असल्याने तो देहाच्याच भोवती फिरत असतो. अर्थात, मी साठी तो वाट्टेल ते करतो. अशा वाट्टेल त्या करण्यात त्याच्याकडून आपोआप अनितीचा मार्ग अवलंबला जाऊ शकतो. अनितीचा मार्ग अवलंबणे म्हणजे मानवतेपासून दूर जाणे होय. या जीवाकडून म ानवतेचे हरण होऊ नये, त्याला त्याचा खरा परीचय व्हावा म्हणून कीर्तनाचे माध्यम अशा जीवांसाठी प्रभावी मार्गदर्शक ठरते. जन्म देणे सोपे आहे; पण जन्मलेल्या जीवाला या कलयुगात चांगले बनवणे अवघड आहे. असे असले तरीही भक्ती मार्गात लोक सहजपणे चांगले बनतात. अध्यात्मिक वारसा असणा-यांना सहजपणे चांगले वागता येत असते. ब्रम्हाला जन्मदाता मानले जाते. या जन्मदात्यासही जे सुख मिळत नाही, ते सुख किर्तनातून सामान्य जीवाला मिळत असते, असे संत सेनाजी, सेना म्हणे हेचि सुख । नाही ब्रम्हयासी देख ।।, या शब्दांत म्हणतात. संत सेनाजींच्या या म्हणण्याचा आपण प्रत्यक्ष अनुभव घ्यायला हवा. हा अनुभव म्हणजे आनंदच आनंद असेल. खरे म्हणजे कीर्तनाचा श्रोता व्हायला भाग्य लागते, असे आम्हास वाटते.



संत तुकाराम महाराजांच्या, इहलोकींचा हा देह । देव इच्छिताती पाहे ।।, धन्य आम्ही जन्मा आलों । दास विठोबाचें झालों ।।, या अभंगाप्रमाणे देवलोक भगवंताला हा म्हणजे तुमच्या आमच्या प्रमाणे मनुष्य देह मागतात आणि आपल्यापैकी काही लोक या देहाला कंटाळून मेलेले बरे म्हणतात, काही तर आत्महत्या करतात. हे अत्यंत चुकीचे आहे. आपणाला आपल्या देहाची महती कळलीच पाहीजे. देव लोकांचे शब्द पाहीले तर आपण खरोखरच अत्यंत भाग्यशाली आहोत. आपणाला भक्ती मार्ग जर गवसला तर जीवनाची महती आणखी चांगल्याप्रकारे कळेल. संतांनी सांगीतल्याप्रमाणे कीर्तन, प्रवचनाची महती आपणाला कळावी. कारण संसारिक जीव किर्तनातून मानवतेचे धडे घेऊन माणूस बनतो व सुखी होत असतो. प्रत्येक मानवी जीव माणूस म्हणून वागू लागला तर तो आनंदी होईलच; पण त्याचबरोबर हुंडाबळी, खून, बलात्कार, चोऱ्या, फसवेगीरी समाजात पाहायलाही मिळणार नाहीत. अर्थात, कळत न कळत सर्वच सुखी व आनंदी होतील. आपल्याबरोबर इतरांना आनंदी करण्यात आपला सहभाग राहील असे आपण पहायला हवे, असे आम्हास वाटते.

जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

धैर्यवान राजा

छत्रपती शिवाजी महाराजांची आज जयंती. प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुविश्व वंदिता !! शाहसुनो शिवस्येषा मुद्रा भद्राय राजते !! अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत, स्फूर्तीस्थान, महापराक्रमी, क्षत्रिय कुलावंतस, राजनीतीज्ञ, धुरंदर, श्रीमंत, सिंहासनाधीश्वर, भूपती, प्रजापती, गजअश्वपती, कुळवाडीभूषण, शिवराय दुर्गपती, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना साष्टांग दंडवत, मानाचा मुजरा, सादर प्रणाम. कितीही विशेषणे लावली तरी कमीच, असा एकमेव लोक राजा.. हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारा, प्रजादक्ष, प्रजाप्रेमी राजा म्हणजेच आपल्या महाराष्ट्राचे श्री शिवछत्रपती महाराज होय. खरोखरच एक माणूस आपल्या उण्यापुऱ्या पन्नास वर्षाच्या आयुष्यात काय काय करू शकतो आणि त्या पन्नास वर्षाच्या राजावर लोक किती निष्ठा ठेवतात. प्राणापलीकडे प्रेम करतात याचे एकमेव उदाहरण म्हणजे श्री छत्रपती शिवाजी महाराज. त्यांचे जीवन म्हणजे धगधगता अंगार महापराक्रमी महानायक कसा असावा याचे मूर्तिमंत प्रतीक होय श्री छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे काय तर लहान वयात हिंदवी स्वराज्याचे स्वप्न बघणारा पराक्रमी लोकनायक मातेच्या शिकवणीचे आचरण करून ते प्रत्यक्षात आणणारा पुत्र. वडिलांचे स्वप्न साकार करणारा पिता प्रेमी पुत्र. आपल्या सहकार्यांवर भावाप्रमाणे प्रेम करणारा त्यांचा बंधू. आपल्या प्रजेची अहोरात्र काळजी करणारा, त्यांचे हित बघणारा, त्यांचा संकटे दूर करणारा रयतेचा छत्रपती राजा. एक मुसद्दी राजकारणी, मनगटाच्या जोरावर, पराक्रमावर विश्वास ठेवणारा.. प्रत्यक्ष लढाई करणारा.. शक्तीपेक्षा युक्तीने शत्रूवर मात करणारा. संयमी, विचारी, खंबीर मनोवृतीचा, धैर्यवान, कर्तृत्ववान राजा. खरोखर त्यांची प्रत्येक गोष्ट तुम्हाला जीवनाचा अर्थ सांगून जाते.. कठीण प्रसंगी कसे वागायचे काय करायचे याचा आदर्श वस्तू पाठ घालून देते.अशा या श्री छत्रपती शिवाजी महाराजांना आम्हां सर्वांचे त्रिवार वंदन.

- प्रा. डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर,
सोलापूर

संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

- सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

अलकः- (५६) पांचप्रण

आज १५ ऑगस्ट १९२२. आपल्या भारत मातेच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आपले पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून पांच प्रण सांगितले. (१) विकसित भारतासाठी कटिबद्ध व्हा. (२) गुलामी मनोवृत्तीच्या जोखडातून मुक्त व्हा. (३) आपल्या विरासतीवर गर्व करा. ती चिरपुरातन नित्य नूतन आहे. (४) एक भारत श्रेष्ठ भारत करण्याची प्रतिज्ञा करा. त्यासाठी एकता व एकजुटता अंगी बाणवा. (५) नागरिकांचे कर्तव्य. हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे ध्यानी धरा. सर्व भारतीयांनी या प्राणशक्तीचा उपयोग करावा अशी त्यांनी आग्रहाची विनंती केली. हे संकल्प ऐकताना मनोमन असे वाटले की हेच संकल्प घेऊन डॉक्टरजी स्वतः मार्गस्थ होत होते व मार्गदर्शन करत होते. विक्राळ प्रश्न व त्याची सोडवणूक यावरच डॉक्टरजी अखंड मंथन करत असत. आज मोदीजी डॉक्टरजींच्या रूपात बोलत होते. या दोघांची हालचाल पाहिली की मनात समर्थ रामदासांचा अभंग आठवतो. भाग्यवंत नर यत्नासी तत्पर। अखंड विचार चाळणेचा। चाळणेचा यत्न यत्नाची चाळणा। अखंड शहाणा तोचि एक ।।

- क्रमशः

श्रीमंतयोगी

श्रीमंत योगी १९ फेब्रुवारी १६३० महाराष्ट्राच्या भूमीने सुवर्ण दिन पहिला आई शिवाई च्या आशीर्वादाने महाराष्ट्राचे भाग्य लिहिणारा राजा जिजाऊ मासाहेबांच्या पोटी जन्माला. जिजाउंच्या पोटी सिंह जन्मला पुढे हाच सिंह अवघ्या जनतेचा वाली झाला. राजा असूनही ज्यांनी योग्यासारखा कशाचाही मोह धरला नाही असे जाणते राजे शिव छत्रपती, राजे त्रिवार मुजरा जी,आज तुमच्या विषयी जे मी थोडे जाणले ते लिहिण्याचा प्रयत्न करतेय,काही चूक भूल झाल्यास माफी ज्या माझ्या महाराजांची मी पाईक आहे ,त्या आपल्या हिंदवी स्वराज्याचे तोरण बांधणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांविषयी पुढील पिढीला मी काही सांगू इच्छिते प्रत्येकाला बालपणी गोष्टी ऐकायला आवडतात ,सर्व बाल गोपालाप्रमाणे शिवबा राजे पण मां जिजाऊ कडून गोष्टी ऐकत, त्या पण राम ायण-महाभारतातील, ज्या गोष्टी मधून शौर्य, संस्कार आणि दया ,दातृत्वाचे धडे महाराजांना आऊसाहेब देत होत्या. आऊसाहेबांनीच बालशिवबाला स्वराज्याचे स्वप्न दाखविले आणि ते सत्यात उतरविले ते शिवबाराजेंनी एकदा छत्रपती शिवबा राजे जंगलात शिकारीला गेले असता त्यांच्या डोक्याला एक दगड लागला त्यांना वाटले या निबिड जंगलात दगड कुणी मारला असेल ,तो एक म्हातारी समोर आली आणि राजांची माफी मागू लागली ,मी आंबे पाडण्यासाठी दगड मारला आणि तो चुकून तुम्हाला लागला , राजे दगड लागला म्हणुन चिडले नाहीत ,तर त्यांना याचे वाईट वाटले, त्यांनी विचार केला कि एक साधारण झाड एवढे सहनशील आणि दयाळू असू शकते तर मी राजा असून प्रजेच्या रक्षणा साठी सहनशील आणि दयाळू का असू नये त्यांनी म्हातारीला काही स्वर्णमुद्रा दिल्या.

शाहिस्तेखानाला रोज डायरी लिहिण्याची सवय होती. त्या डायरीचे नाव 'शाहिस्तेखान बुर्जी' असे आहे. याच डायरीमध्ये शिवरायांनी केलेल्या हल्ल्याचा प्रसंग नमूद केलेला आहे. याच बुर्जीत खानाने आणखी एक घटना नोंदवली आहे.

तो असं लिहितो, शिवराय आले तसे तुफान वाऱ्यासारखे. लाल महालातून निघून गेले, काही वेळाने गोंधळ थांबला शाहिस्ते खानाची बहिण धावत धावत खानाकडे आली आणि म्हणाली 'भाईजान मेरी बेटी ला पता है। त्यावेळी ज्याची बोटे छाटली गेली होती तो शाहिस्तेखान स्मितहास्य करत म्हणाला, शिवाजीची माणसे तिला पळवणार नाहीत. जरी पळवली असेल तरी बेफिक्र राहा कारण तो शिवाजी राजा पोटाच्या

लेकीसारखी तिची काळजी घेईल. अरे! कोण विश्वास दुष्मनालाही महाराजांच्या चारित्र्यावर, ती मुलगी तिथेच एका पिंपात लपून बसली होती ती सापडली. यातून एकच बोध सध्याच्या तरुणाईने घ्यावा राजांचा चारित्र्य संपन्न वारसा पुढे न्यावा. अमेरिकेच्या बोस्टन विद्यापीठात- शिवाजी द म्यानेजमेंट गुरु हा १०० मार्कांचा पेपर घेतला जातो. इतका आदर माझ्या राजाचा संपूर्ण जगात आहे. बांग्लादेशाच्या सध्याच्या परिस्थिती वर खालील उदाहरण आपल्याला सर्वधर्म समभावाची प्रेरणा देते. रायगडावर राजधानीची व्यवस्था झाल्यानंतर तिथे जगदीश्वराचे मंदिर बांधण्यात आले. महाराजांनी लगेच आपल्या मंत्र्यांना विचारले माझे मुस्लिम मावळे नमाज कुठे पडतील, महाराज जागा दाखवा व्यवस्था केली जाईल, असे उत्तर दिले गेले, लागलीच समोरील बाजूस मस्जिद बांधण्यात आली, सबका मलिक एक असे मानणारा आपला राजा जाणता राजा. छत्रपती शिवरायांनी अनेक लढाया लढल्या महाराष्ट्राबाहेरही लढाया लढल्या त्यातील एक प्रसंग कर्नाटक राज्यातील बेलवडीनावच्य गावची या गावात एक गढी होती- ती काबीज करण्यास पांढरा दिवस होऊन गेले तरी काही चालेना असा बळकट योद्धा तरी कोण? त्या होत्या सावित्री देसाई /मालम्मा प्रभू देसाई त्यांनी मावळ्यांना महिनाभर चिवट झुंज दिली. सावित्री देवी यांना ज्या वेळी महाराजांसमोर उभे केले. त्यावेळी आई आणि बाळ दोघेही समोर आले. त्या म्हणाल्या महाराज मला हवी ती शिक्षा करा. पण माझ्या बाळाला काहीही करू नका. छत्रपती शिवराय म्हणाले ताईसाहेब माझ्या मावळ्यांना आधीच माहित असते गढी एक स्त्री लढवत आहे, गढी मध्ये एक स्त्री आणि तिचे बाळ कारभार सांभाळत आहे तर त्यांनी कधीच गढीवर हल्ला केला नसता मी ही जिंकलेली गढी या बाळाच्या दूध भातासाठी देत आहे आणि बाजूचे सर्व प्रदेश तुमच्या चोळी बांगडीसाठी भेट देत आहे, ही भावाची भेट समजावी. महाराज निघून गेल्यानंतर सवित्री देवीने महाराजांचे एक शिल्प उभारले. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हातात दुधाची वाटी आणि एका हातात चमचा आहे. बाळ मांडीवर आहे आणि त्याची आई त्यांच्याकडे कौतुकाने पाहत आहे ते शिल्प आजही बेलवडी येथे आहे, असे आमचे राजे ज्यांच्या स्तुतीपर वचने प्रत्यक्ष त्यांचे धार्मिक गुरु रामदास स्वामी यांनी लिहिली आहेत. निश्चयाचा महामेरू! बहूत जनासी आधारू अखंड स्थितीचा निर्धारु श्रीमंत योगी यशवंत, कीर्तिवंत ! सामर्थ्यवंत, वरदवंत पुण्यवंत, नीतिवंत ! जाणता राजा जय भवानी जय शिवराय...

- दीपांजली माने-पाटील,
धाराशिव मो. नं. ७३८५३०१०१२

सुप्रभात

आजचा दिवस

वार : बुधवार	दिनविशेष - चांगला दिवस
दि. १९ फेब्रुवारी २०२५	छत्रपती शिवाजी महाराज
विक्रम संवत् २०८०-८१	जयंती
शके - १९४६	....राहू काल....
संवत्सर - क्रोधी नाम	रविवार : दु.४.३० ते ६.००
मास - फाल्गुन	सोमवार : स. ७.३० ते ९.००
कृ. षष्ठी (०७.३१)	मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
ऋतु - वसंत	बुधवार : दु. १२ ते १.३०
नक्षत्र - स्वाती (१०.३८)	गुरुवार : दु. १.३० ते ३.००
योग - वृध्दि (१०.४७)	शुक्रवार : स.१०.३० ते १२
करण - विष्टि (२०.४६)	शनिवार : स. ९ ते १०.३०

राशीभविष्य

मेष : अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

वृषभ : अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

मिथुन: व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मि ळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

कर्क: अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

सिंह : व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धाम ुळे लाभ होण्याची शक्यता.

कन्या : कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा,

तुळ : आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

वृश्चिक : मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

धनु : योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

मकर : फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मि ळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील. आळस करू नका.

कुंभ : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

मीन: कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

जय जय शिवराय

शिवरायांचा आठवावा पराक्रम
ध्यानी घ्यावे देव, देश नी धम प्रेम
मातेचे करती स्वप्न पूर्ण
पुनः पुनः नमन युगपुरुषास ।।
शिवरायांचे आठवावे युद्धकसब
शक्ती युक्तीने जिंकती दुर्ग
जेरीस आणती यवन खाविंद
हर हर महादेव म्हणोनिया ।।
शिवबांचे आठवा स्त्री दाक्षिण्य
माता भगिनी देवी समान
समस्त ठायी त्यांचा सन्मान
हिंदवी स्वराज्यात ।।
शिवबाचे आठवा गुरु प्रेम
समर्थांचे पायी सदा लीन
त्यांच्यासाठी दिले सज्जनगड
धर्म संरक्षिला जावा म्हणुन ।।
शिवबांची कुलस्वामीनी
आई तुळजाभवानी
रक्षिले तलवार देवोनी
वेळोवेळी संकटात त्यांना।।
शिवबांचे अपार मातृप्रेम
त्यांचीच प्रेरणा घेऊन
बांधले विजयाचे तोरण
तोरणा जिंकून दाखविला ।।
शिवबांची प्रजा निष्ठा
पित्या समान लेकराची चिंता
निगुतीने सांभाळले बहुजन
शूर , वीर मावळ्यांसी ।।
रुप शिवबाचे देखणे किती
विशाल भाल लखलख कांती
डोळे सूर्य चंद्रास लाजविती
इतके तेज शककर्त्या राजाचे।।
शिवरायांची युद्धनीती
विश्वात पसरे तिची ख्याती
यवन चळचळा कापती
गनिमी कावा उमजेचना।।
शिबबांचा निश्चय
काळ्या दगडावरची रेघ
पूण करण्यासाठी तत्पर
मावळे सैनिक दिनराती ।।
शिवबा माझा न्यायनिपुण
गरिबांसाठी झिजवले तन
रांझे पाटलाचे अवयव छाटून
न्याय दिला गरीबाला ।।
असा आमुचा जाणता राजा
भारतीयांचा मानबिंदू
शिकवण त्यांची अंमलात आणू
हिंदवी घम वाढवाया ।।
शत शत नमन शिवराया.

- डॉ. कांचन जतकर

शिवरायांचा आठवावा प्रताप !

छत्रपती शिवाजी महाराज हे नाव नुसतं सहज जरी कानी पडलं तरी घोड्यावर स्वार असलेले, पाठीशी ढाल आणि हातात तलवार घेऊन लढाई करणारं महाराजांचं चित्र आपसूकच डोळ्यासमोर तरळत. पण शिवाजी महाराज हे केवळ लढाई आणि संघर्ष एवढ्या पुरतेच मर्यादित नाहीत कारण महाराज हे केवळ तलवारीच्या जोरावर राजे झाले नाहीत तर त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाने आणि ध्येयाने त्यांनी रयतेच्या मनावर राज्य केले.

राजा हा फक्त लढाया जिंकण्यापुरताच मर्यादित नसतो हे महाराजांचं चरित्र आपल्याला सांगतं. मोघलां विरुद्ध लढा देणारा एक महान योद्धा याबरोबरच प्रजेचा पित्याप्रमाणे सांभाळ करणारा जाणता राजा, प्रजेचे संरक्षणासाठी प्रत्यक्ष ढाल असणारा राजा, फितुराना कठोर शासन करणारा उत्तम प्रशासक, आपल्या विरोधकांच्या धम ांचा,धर्मग्रंथांचा आणि महिलांचा नितांत आदर करणारा राजा अशा अनेक पैलूंमुळे शिवाजी महाराज एक राजा म्हणून तसेच एक व्यक्तिमत्व म्हणून महान ठरतात. त्यांच्या जीवनातला प्रत्येक प्रसंग हा आजही तितकीच नवी ऊर्जा, नवी प्रेरणा देतो. महाराजांनी केलेला अफजल खानचा वध ही केवळ एक घटना नव्हती तर अचूक नियोजन,बुद्धिमत्ता,शौर्य आणि धैर्य यांचा अद्वितीय संगम होता. ह्यातून संकट कितीही मोठ असलं तरी त्याला शक्ती बरोबरच युक्तीने कसं सामोरं जायचं हे महाराज आपल्याला शिकवतात.भविष्यात शत्रू समुद्रमार्गे ही स्वराज्यावर चालून येऊ शकतो हे अचूकपणे हेरून महाराजांनी उभारलेले नौदल.ह्यातून भविष्यावर नजर रोखून वर्तमानात कसं जगायचं हे महाराज शिकवतात. लढाया जिंकत असतानाच परिस्थिती विरोधात असताना केलेले तह हे आयुष्यात काही वेळेस संघर्ष टाळून स्वतःला पुढील संधीसाठी कसं तयार करायचं हे पुरंदरचा तह आपल्याला शिकवून जातो. शिवाजी महाराजांचे जीवन हे केवळ ऐतिहासिक घटनांचा संग्रह नव्हे तर तो,ते धैर्य,शौर्य,बुद्धि, साहस आणि स्वाभिमान यांचं जिवंत उदाहरण आहे.महाराजांनी बिकट परिस्थितीत घेतलेले धोरणात्मक निर्णय,त्यांचे प्रशासन कौशल्य,युद्धात वापरलेली गनिमी काव्याची रणनिती ही आजच्या गोष्टी मनासारख्या घडत नसल्या की लगेच सर्वींश ी किरणाऱ्या तरुणाईने अभ्यासण्याची नितांत गरज वाटते. त्यासाठी शिवरायांचा प्रताप आठवणे आणि तो आचरणातही आणणेही तितकंच महत्वाचं आहे!

- प्रतिक्षा नागणे
मो. ९३०७४१८०१७

वैचारिक शिव जयंती साजरी करू या

आज ३५० वर्षांहून अधिक काळ लोटून गेला, तरीही सर्वसामान्य रयतेच्या मनामध्ये शिवाजी राजे अधिराज्य करीत आहेत. असं त्यांचं काय वेगळेपण होतं? किंवा आहे. की आधुनिक लोकशाहीमध्ये पण शिवाजी महाराजांचं कौतुक, उदोउदो होत आहे. त्या 'राजा' च्या विचारात, व्यवहारात आणि चरित्रात असे काय आहे की त्यामुळे लोकशाहीत सुद्धा त्यांचे स्मरण कायम स्फूर्तिदायक ठरत आहे. तसे राजे खूप होऊन गेले परंतु सर्वच राजांची आठवण किंवा जयंती साजरी केली जात नाही पण शिवजयंती जितक्या विस्तृत प्रदेशात, जितक्या मोठ्या प्रमाणात आणि ज्या उत्साहाने, उमेदीने व स्फूर्तीने साजरी केली जाते तसे इतर कोणत्याही राजाच्या बाबतीत घडत नाही, असे का व्हावे ? याचा विचार केला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी राज्य 'निर्माण' केले आणि तेही रयतेचे राज्य. राज्यात राहणाऱ्या सर्वसामान्य माणसाला 'रयतेला' आपले राज्य वाटत होते हेच ठळक वेगळेपण महाराजांचं होतं. शिवाजी महाराजांचे कार्य हे आपले कार्य आहे असे रयतेला वाटत होते.

खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या उडवीन राई राई एवढ्या..शेतकऱ्याचा दहा-बारा वर्षाचा कोवळा पोरगा धिटाईन बांधावरून जाणाऱ्या शस्त्रसज्ज घोडेस्वराला अडवून म्हणतो. केवढं हे धाडस. कुठून आलं ? आपण मेलो तरी चालेल पण शिवाजी जगला पाहिजे असं वाटायला लागावं अशी किमया शिवाजीराजे करू शकले. शिवकार्यात लढवय्ये सैनिक, मावळे तर सहभागी होतीच परंतु सर्वसामान्य रयत सुद्धा आपल्या परीने सहभागी होती हे फार महत्त्वाचं होतं. कारण कोणत्याच खेड्याला, गावाला, गावकऱ्यांना, शेतकऱ्यांना किंवा तेथील रहिवाशी लोकांना कशाचीच झळ महाराजांनी दिली नाही. उलट रयत आणि राजा यांच्यातील अंतर कमी करून मदत केली जात होती. बेलगाम व्यवहाराला लगाम घालून त्यांच्यावर नियंत्रण ठेवले. त्यामुळे राजा व राज्यकार्य रयतेला आपले वाटू लागले.

मोगल व आदिलशाहीने उध्वस्त झालेली गावे, शिवाजीराजा नी कौलनामे घेऊन पुन्हा बसवली. जम ीन कसायला येणाऱ्यांना बी बियाणे देऊन मदत केली महसूल सुद्धा माफ केला. शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये, असे सैन्याला सक्त आदेश देणारा राजा. शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतीची काळजी वाहणाऱ्या राजासंबंधी रयतेला मग प्रेम का नाही वाटणार ? शिवाजींचे कार्य टिकले पाहिजे व वाढले पाहिजे असे का नाही वाटणार?

ज्या काळात गुलामांचाही व्यापार सर्रास होत होता तिथं व्यापार उद्योगास पाठबळ कसे मिळेल. रयत, व्यापारी यांना लुबाडले जात होते. महाराजांनी अशा लोकांवर जरब घालून व्यापार उद्योगास संरक्षण दिले. महाराज धर्मश्रद्ध होते म हाराजांची युद्धे ही कधीच धर्मयुद्ध नव्हते. सर्व धर्मांची, सर्व जातीची लोकं महाराजांनी जोडली. थोडक्यात चारी वर्ण आपापल्या धर्माप्रमाणे चालवून त्यांचा संग्रह करून ठेवला. धर्म, धर्मनिष्ठा मुख्य नव्हती तर राज्य ,राज्यनिष्ठा व स्वामीनिष्ठ मुख्य होती. महाराजांनी स्वतःच्या राज्यात प्रजेच्या धर्मावरून भेद, पक्षपातीपणा कधीच केला नाही. अस्पृश्यता, जात, धर्म, स्त्रीयांची गुलामी इत्यादींना स्वराज्यातून हद्दपार केले. शिवाजी महाराजांनी लोकभाषेत म्हणजे मराठीमधून आपला राज्यकारभार केला. म हाराजांसाठी लोक मरण्यासाठी तयार झाले. काही लोकांनी शिवचरित्र हे अफजलखान, शाहिस्तेखान, दिलेरखान, औरंगजेबाच्या कैदेतून सुटका किंवा कथा, कादंबर्या, नाटकं, सिनेमांच्या माध्यमातून लोकांसमोर ठेवून थिटे करण्याचा प्रयत्न केला.

आज धर्माधर्माचे, जातीपातीच्या राजकारणामुळे जे शिवाजी महाराज देशाचे, महाराष्ट्राचे होते ते मात्र अनेक संघटना, पक्षाच्या माध्यमातून फक्त महाराष्ट्रातील हिंदूंचे केले. स्वतःच्या स्वार्थासाठी म हाराजांचा उपयोग करून घेत आहेत. आज सर्व राजकीय पक्ष, पुढारी महाराजांचे स्मारक सागरात बांधण्यासाठी हाजारो कोटी खर्च करायची भाषा बोलतात. वर्षोनुवर्षे त्या गोष्टीवर राजकारण चालू आहे. हे रयतेला कधी कळणार. लक्षात ठेवा इस्टेटच्या लोभाने जे लढतात आणि मरतात त्यांची नोंद ठेवावी असं इतिहासाला वाटत नाही. काहीही झालं, कितीही इतिहासाची तोडमोड केली तरी शिवाजी महाराजांचे विचार जिवंतच राहतील. जय भवानी जय शिवाजी अशी घोषणा कानांवर पडल्याबरोबर आपल्या हृदयाची स्पंदने आनंदाने आणि अभिमानाने उत्तेजित होतात. महाराजांनी हाती तलवार घेतली, पण निष्पापांच्या रक्ताने ती कधी रंगू दिली नाही. त्यामुळे त्यांच्या रणनीतीला रक्ताचा वास येत नाही तर मानवतेचा सुगंध येतो. ते आई भवानीला कौल मागण्याइतके धार्मिक जसे होते, प्रजेचा सांभाळ पित्याप्रम ाणे करणारे कनवाळू पिता होते, तसेच बंडखोर-फितुरांना देहदंडाची शिक्षा देणारे कर्तव्यकठोर, न्यायनिष्ठुर राजाही होते.आपण त्यांच्यातील एक तरी गुण अंगीकारावा हीच शिवजयंती साजरी करण्याची सगळ्यात चांगली पद्धत असेल.

- प्रा. तात्यासाहेब काटकर,
अकलूज. मो. ९२२६१४४८३६

संक्षिप्त वृत्त

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी सोन्याच्या पानाची माळ

पंढरपूर दि.१८ फेब्रुवारी -

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस मीना राजेंद्र पाटील या भाविकांने सोन्याच्या पानाची माळ अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. त्याबद्दल देणगीदार भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी श्रींची प्रतिमा, दैनंदिनी, दिनदर्शिका व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व व्यवस्थापक मनोज श्रोत्री उपस्थित होते. सदर भाविक बलई ता. उरड (जि. रायगड) येथील रहिवाशी असून त्यांनी कै. शांताबाई पांडुरंग पाटील यांच्या स्मरणार्थ सोने पानाची माळ (लाल खडा व रेशीम गोंड्यासह) अर्पण असून, त्याची अंदाजे किंमत एक लाख ७८ हजार होत आहे.

कारखान्यांनी थकीत ऊस बिल द्यावे; अन्यथा आंदोलन

सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-

दक्षिण तालुक्यासह जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी शेतकऱ्यांची थकित ऊसबिले त्वरित द्यावेत, अन्यथा कारखान्यांसमोर आंदोलन करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष बिळेणसिध्द सुंटे यांनी दिला आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांची ऊस तोडणी केलेल्या अनेक साखर कारखान्यांकडून बिलाचा पहिला हप्ता मिळाला नाही. शिवाय गतवर्षाचे दोन हप्तेही मिळाले नाहीत. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. यावर्षी अनेक साखर कारदानदारांनी बिल जाहीर न करताच शेतकऱ्यांची ऊसतोडणी केली आहे. ऊसतोडणी झाल्यावर पंधरा दिवसांत बिलाचा पहिला हप्ता देणे बंधनकारक असताना दोन ते तीन महिन्यानंतरही ऊसबिल मिळत नसल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे. शेतीतील मशागतसह अन्य कामे करण्यासाठी आर्थिक गरज असताना कारखानदार चालढकल करीत आहेत. अनेक शेतकरी ऊसबिलासाठी कारखान्यांकडे चकरा मारत आहेत. मात्र त्यांना ऊसबिल मिळत नसल्याने शेतकरी वैतागला आहे. मार्च महिना वर्षअखेर असल्याने अनेक शेतकऱ्यांना पीककर्ज भरावे लागते. मात्र ऊसबिल न मिळाल्याने शेतकरी संकटात सापडला आहे, म्हणून कारखानदारांनी फेब्रुवारी अखेरपर्यंत बिल द्यावे. अन्यथा १० मार्चपासून साखर कारखान्यांसमोर आंदोलन करण्याचा इशारा सुंटे यांनी दिला आहे.

अकलूज उपजिल्हा रुग्णालयाला कायाकल्प पुरस्कार

अकलूज, दि. १८ फेब्रुवारी-

अकलूज उपजिल्हा रुग्णालयाला आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयानच्यावतीने एक लाख रपयांचा कायाकल्प पुरस्कार मिळाल्याची माहिती वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश गुडे यांनी दिली. कुटुंब कल्याण मंत्रालयाच्यावतीने दरवर्षी स्वच्छता आणि संसर्ग नियंत्रणाच्या मानकांचे पालन करुन अनुकरणीय कामगीरी करणाऱ्या तसेच सार्वजनिक आरोग्य सुविधांना प्रोत्साहन आणि मान्यता देवून सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये रुग्णालय देखभाल, स्वच्छता आणि संसर्ग नियंत्रण पध्दतींना प्रोत्साहन देणेसाठी ही योजना राबविणेत येते. आरोग्य संस्थांचे विविध मुल्यांकन प्रक्रियांद्वारे तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावरुन परिक्षण करणे. सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये सुधारित स्वच्छतेशी संबंधीत पर्यावरणपूरक पध्दतीचा अवलंब करून टिकाऊ पध्दती तयार करणे.ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत.यामध्ये चांगली कामगिरी करणाऱ्या रुग्णालयांना कायकल्प पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असते. यापूर्वी ही दोनवेळा अकलुज उपजिल्हा रुग्णालयाला उत्तेजनार्थ कायाकल्प पुरस्कार मिळाल्या चे सांगत यावर्षी ही शल्यचिकीत्सक डॉ. सुहास माने, डॉ.ड. झ. कुलकर्णी, निखिल फताटे यांचे मार्गदर्शनाखाली अधिपरीचारीका सुनिता भालेराव यांच्यासह उपजिल्हा रुग्णालयाच्या सर्व टीम परीश्रम घेतल्याचेहही डॉ. गुडे म्हणाले.

अन्नछत्र भक्ती, धार्मिक संस्कृतीचे केंद्र : शिवकांतम्मा

अक्कलकोट, दि. १८ फेब्रुवारी-

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली भक्तांकरिता उपलब्ध व नियोजित सोई- सुविधा ह्या उत्तम असून, अन्नछत्र हे भक्ती आणि धार्मिक संस्कृतीचे केंद्र म्हणून कर्नाटक राज्यात ओळखले जात असल्याचे मनोगत श्री दत्तात्रय देवस्थान, गाणगापूरच्या विशेष कार्यकारी अधिकारी शिवकांतम्मा यांनी व्यक्त केले. त्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे पुरोहित अपपू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी चेतन जाधव, प्रवीण घाडगे, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, भारत पाटील, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले,महांतेश स्वामी,धनंजय निंबाळकर, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण उपस्थित होते.

टेंभुर्णी पोलीस ठाण्यास ५ लाखांचे संगणक व प्रिंटर

माजी आ.बबनराव शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

तभा वृत्तसेवा,
टेंभुर्णी, दि. १८ फेब्रुवारी-

सोलापूर जिल्हा नियोजन मंडळच्या निधीतून टेंभुर्णी पोलीस ठाणेस आलेल्या पाच लाख रुपयांचे सात संगणक व तीन प्रिंटरचा लोकार्पण माजी आमदार बबनराव विठ्ठलराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

पोलीस ठाण्यास संगणक मिळावेत यासाठी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मागणी होती.त्यानुसार माजी आ.बबनराव शिंदे यांच्या शिफारशी वरून संगणक साठी जिल्हा नियोजन मंडळाकडून निधी मंजूर करण्यात आला होता.यामध्ये सात एचपी कंपनीचे ऑल-इन-वन संगणक व लेझर कंपनीचे तीन प्रिंटरचा समावेश आहे. यावेळी माजी आ. बबनराव शिंदे यांनी सध्या संगणूक युग असून याचा सामान्य जनतेसाठी वापर व्हावा असे म्हटले. तर पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य तथा भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन तुकाराम ढवळे,पोसई कुलदीप सोनटक्के, पोसाई अजित मोरे, मार्केट कमिटीचे धनंजय मोरे, सपोफौ.विलास रणदिवे, नोटरीचे ॲड. संतोष कानडे, पत्रकार सदाशिव पवार, संतोष पाटील, आबा साळुंके, नाथा सावंत, ॲड. मंगेश देशमुख, टेंभुर्णी ग्रामपंचायतचे उपसरपंच प्रतिनिधी सतीस नेवसे, टेंभुर्णी ग्राम पंचायत सदस्य परमेश्वर खरात, सचिन होदाडे, सोमनाथ तांबे, आरपीआयचे माजी जिल्हाउपध्यक्ष जयवंत पोळ, टेंभुर्णीचे माजी सरपंच दत्तात्रय देवकर, रोहित देशमुख, वडार संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार धोत्रे यांच्यासह पोलीस कर्मचारी बिरूदेव मार्कड,भास्कर गरड,बिरुदेव हजारे, सुनील सरडे,संजय पांडेकर, सहा पोलीस उपनिरीक्षक, विनोद साटे, गणेश जगताप, नितीन, डखवले, मुकुब, तांबोळी, नितीन तळेकर, विशाल शिंदे, राजेश लांडगे, दत्ता पवार, हनुमंत जिंजे, पोलीस नाईक व पोलीस कॉन्स्टेबल, प्रवीण साठे, प्रसाद अनुभुले, सचिन साळुंखे, महेश साळे, प्रशांत किरवे, गणेश इंगोले, उमेश खराडे उपस्थित होते.

भाजपा सदस्य अभियानात ग्रामीण पश्चिमने पटकावला राज्यात पहिला क्रमांक

जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांचा सन्मान

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि. १८ फेब्रुवारी-

भारतीय जनता पार्टी संघटन पर्व अभियानांतर्गत राज्यात सुरू असलेल्या पक्षाच्या सदस्य नोंदणीत राज्यात प्रथम क्रमांक पटकवल्याबद्दल भाजपाचे सोलापूर ग्रामीण पश्चिमचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांचा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते संघटन पर्व प्रभारी रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे येथे आयोजित विभागीय कार्यशाळेत सत्कार करण्यात आला.

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत भाजपचा झेंडा फडकवायचा आहे. यासाठी सदस्य नोंदणीचे उदिष्ट पूर्ण करा, असे आवाहन चेतनसिंह केदार-सावंत यांनी भाजप कार्यकर्त्यांना केले होते. या आवाहनास प्रतिसाद देत जिल्ह्यातील भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी दिवस-रात्र मेहनत करून भाजप सदस्य मोहिमेत राज्यात अव्वल क्रमांक पटकावला आहे. जिल्ह्यात २ लाख ६२ हजार ५२३ सभासद नोंदणी केली आहे. कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन भाजपचा विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. सदस्य नोंदणी मोहिमेत संघटनेतील सर्वांनी परिश्रम घेतल्यानेच प्रथम क्रमांक आला.

करकंब ग्रामस्थांची प्रयागराज कुंभ मेळाव्यात दिगंबर आखाड्यात व्यवस्था

महंत रामनारायणदास यांचे करकंबकरांकडून जंगी स्वागत

तभा वृत्तसेवा,
करकंब, दि. १८ फेब्रुवारी-

प्रयागराज येथे १४४ वर्षांनी कोट्यावधी साधूंच्या उपस्थित कुंभमेळा संपन्न होत असताना करकंब गावच्या श्री. ब्रह्मानंद महाराज मठाचे महंत राम नारायणदास महाराज हेही या कुंभमेळाव्यास सुरूवात झाल्यापासून दिगंबर आखाडा प्रयागराज येथे उपस्थित होते. या कालावधीत करकंबमधूनही अनेक भाविकभक्त या देवदुर्लभ सोहळ्यासाठी उपस्थित राहण्यासाठी जात होते. यावेळी महंत रामनारायणदास महाराजांनी या भाविकांची दिगंबर आखाडा प्रयागराज येथे भोजन व निवासाची सोय स्वतः जातीने लक्ष देऊन केली. त्यामुळे अनेकांना शाही स्नानाचा आनंद घेता आला. ही करकंबकरांसाठी अभिमानाची गोष्ट असल्याने महंत राम नारायणदास यांच्या करकंब नगरीत आगमना प्रित्यर्थ करकंबकर ग्रामस्थांच्यावतीने जंगी स्वागत करण्यात आले.

शिवरत्न पॅटर्नमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या करिअरला दिशा

सचिव धर्मराज दगडे : शिवरत्न टॅलेन्ट सर्च परीक्षेचे बक्षिस वितरण

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि. १८ फेब्रुवारी-

शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकरी अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते-पाटील आणि अध्यक्षा शीतलदेवी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवरत्न शिक्षण संस्था अकलूज संचलित शिवरत्न पॅटर्न हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना करिअरची योग्य दिशा देण्यासाठी सतत कार्यरत असून, विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला वाव देण्याच्या उद्देशाने या वर्षामध्ये शिवरत्न टॅलेन्ट सर्च परीक्षा २०२५ आयोजित करण्यात आली होती.

शिवरत्न पॅटर्न हे शिवरत्न टॅलेन्ट सर्च परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचा शोध घेऊन, त्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांना घडवण्याचे काम करत आहे, असे प्रतिपादन संस्थेचे सचिव धर्मराज दगडे यांनी परीक्षेच्या बक्षीस वितरण समारंभाच्या प्रसंगी केले. अकलूज येथे इ.१० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या शिवरत्न टॅलेन्ट सर्च २०२५ या परीक्षेचे आयोजन यशस्वीरित्या पार पाडण्यात आले परीक्षेत २५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रमासाठी शिवरत्न शिक्षण संस्थेचे सर्व संचालक मंडळ, शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश स्कूल अन्ड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अल्बर्ट थरकन, शिवरत्न स्कूलच्या प्राचार्य बिनो पौलस,शिवरत्न पॅटर्नचे प्रा.राजकिरण माने, अश्रफ शेख व सर्व शाखांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास १०,००० रुपये, द्वितीय क्रमांकास ७०००, तृतीय क्रमांकास ५००० तर उत्तेजनार्थ पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी १००० रुपये व प्रमाणपत्र तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

यशवंत विद्यार्थी

प्रथम क्रमांक (विभागून) इश्वरी संतोष निकम, सार्थक सत्यजित गिरमे, द्वितीय क्रमांक (विभागून), ओंकार दत्तात्रय राऊत, वेदिका अरूण केदार, तृतीय (विभागून) इंद्रनिल अनिल चव्हाण, श्रीराम भुषण म्हेत्रे, उत्तेजनार्थ पोर्णिमा संग्रामसिंह भांगे, श्रावणी कृष्णा मिसाळ, श्रावणी सागर शेटे, विश्वराज अमरदीप देशमुख, प्रतिभा निलेश ठोंबरे.

गुरुवारी ग्राहक तक्रार निवारण दिन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.१८ फेब्रुवारी-

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये दि. २० फेब्रुवारी रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अ.भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली. पंढरपूर, बार्शी, अकलूज, सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी १० ते दुपारी १ वा. पर्यंत करण्यात आले आहे. लिखित तक्रार घेऊन अर्जासह उपस्थित राहावे असे आवाहन अ. भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक दीपक इरकल, प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी, पंढरपूर तालुकाध्यक्ष विनय उपाध्ये, सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर यांनी केले आहे.

जवाहर महाविद्यालयात पारितोषिक वितरण सोहळा

तभा वृत्तसेवा,
अणदूर, दि. १८ फेब्रुवारी-

जवाहर महाविद्यालय अणदूर येथील संस्कृत विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय एक दिवसीय कार्यशाळा व राज्यस्तरीय निबंध पारितोषिक वितरण सोहळा साजरा करण्यात आला.

उद्घाटन जे. एन. काकनाळे यांनी केले. डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. अंकुश कदम, डॉ. अरुण चव्हाण, संयोजक प्रा.डॉ. सत्येंद्र राऊत आदी उपस्थित होते. यावेळी संस्कृत गाण्यातून सई माने, श्रुती कुताडे, समीक्षा घुगे व शिवानी मुळे हिने नृत्य सादर केले. यानंतर डॉ. अरुण चव्हाण यांनी संस्कृत भाषेचा इतर भाषांवर पडलेला प्रभाव या एक दिवसीय कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. जे. एन. काकनाळे आणि विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अंकुश कदम यांनी ी मार्गदर्शन केले. डॉ. संगीता सरवदे, अनिता मुदकण्णा, मीना जाधव यांनी पेपर सादर केले. पहिल्या सत्रात उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे यांनी अध्यक्षीय समोराप केला. द्वितीय सत्रात संस्कृत विभाग प्रमुख प्रा. सत्येंद्र राऊत यांनी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरणाचे प्रास्ताविक केले. राज्यातून एकूण दोनशेच्या जवळपास निबंध आले होते. त्यापैकी सर्वोत्कृष्ट मंजश्री पवार सातारा, उत्कृष्ट पर्जन्या अंजुटगी सोलापूर, प्रथम प्रगती ज्योतिर्लिंग शिंदे जवाहर महाविद्यालय अणदूर, द्वितीय श्वेता हालगे परळी वै. आणि तृतीय अमृता डोईफोडे लातूर तर उत्तेजनार्थ वैष्णवी पाटील लातूर, सुलभा खुळे करमाळा व श्वेता गरड खेड, या सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. अस्मिता बुरगुटे यांनी सूत्रसंचलन केले तर सम्यका मुके हिने आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. सिद्धेश्वर बाड, उमाकांत सलगर, प्रसन्न कंदले, संतोष चौधरी, दिलीप चव्हाण व सुमित चौधरी यांनी सहकार्य केले.

कुंभमेळ्यासाठी जाणाऱ्या गाडीला अपघात

चारजण गंभीर जखमी; माचणूर येथील घटना

तभा वृत्तसेवा,
मंगळवेढा, दि. १८ फेब्रुवारी-

बेळगावहून प्रयागराज कुंभमेळ्यासाठी दर्शनाला जाणाऱ्या मिनी बसचा कोल्हापूर-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर ट्रॅव्हलर गाडीचे (के. २४/७१७६) मागील टायर फुटून रविवार सकाळी ८.३० मिनिटांनी माचणूर येथे भीषण आपघात झाला आहे.

ट्रॅव्हलमध्ये १३ प्रवासी प्रवास करत होते. त्यापैकी चारजण गंभीर जखमी झाले. त्यांना सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यात ड्रायव्हर बसवराज पाटील (वय४०, प्रवीण पाटील (वय ४२), सुधा भोपळे (वय ४५), शोभा पन्हाळकर (वय ५२) यांचा आपघातात समावेश आहे तर किरकोळ जखमीमध्ये संजय भोपळे (वय ५६), वैभव भोपळे (वय २८), अक्षता भोपळे (वय २५), सानिका धुडूम (वय १८), विकास धुडूम (वय २२), गणपत पन्हाळकर (वय ६०), चन्नम्मा पन्हाळकर (वय ५०), चिनू सुतार (वय ४५), सुनीता सुतार (वय ४५), वंश भोपळे (आठ महिने), संग्राम भोपळे (वय २) अशी किरकोळ जखमींची नावे आहेत. अपघातस्थळी माचणूर ग्रामस्थांनी व फ्रोझा एक्स. टी. सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्तांना गाडीतून बाहेर काढण्यास मदत केली व जखमींना रुग्णवाहिका बोलावून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

जीबीएस रोगाला प्रतिबंध घालण्यासाठी प्रशासन सज्ज

आ. समाधान आवताडे; पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील प्रशासनाची बैठक

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. १८ फेब्रुवारी-

जीबीएस साथ रोगाला प्रतिबंध घालण्यासाठी पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील प्रशासन सज्ज आहे, पंढरपूर नगरपालिका प्रशासन आणि ग्रामीण भागात आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, आशा वर्कर्स ताईंच्या मार्फत सर्व्हे सुरू आहे, पाणी तपासणी, अन्न पदार्थ तपासणे, मोहीम हाती घेतली जाईल, दूषित पाण्याची तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आ. समाधान आवताडे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

पंढरपूर शहरात नुकतेच जीबीएसचे दोन रुग्ण आढळले होते. या पार्श्वभूमीवर सोमवारी आ. आवताडे यांनी प्रशासनाची बैठक पंढरपूर शासकीय विश्राम गृह येथे घेतली. या बैठकीस प्रांताधिकारी बी.आर. माळी, तहसीलदार सचिन लगोटे, मदन जाधव, पंढरपूर सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधीकारी डॉ. महेश सुडके, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, शहर पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, नगरपालिका उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर उपस्थित होते. प्रारंभी सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधीकारी महेश सुडके यांनी जीबीएस साथीच्या बाबतीत माहिती दिली. त्याच बरोबर तालुका वैद्यकीय अधिकारी, पंढरपूर नगरपालिका उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर यांनी शहरातील नियोजनाची माहिती दिली. आ. आवतडे म्हणाले की, पंढरपूर शहरात दोन जीबीएसचे दोन रुग्ण सापडले आहेत. नुकतीच माघी यात्रा संपन्न झाली, तसेच शनिवार, रविवारी शहरात लाखावर भाविक येत असतात. पुणे, मुंबई येथील जीबीएस साथीचे रुग्ण वाढलेले आहेत. या पार्श्वभूमीवर सली चा प्रादुर्भाव वाढू नये साठी पंढरपूर आणि मंगळवेढा तालुका प्रशासनाने दक्षता घ्यावी. हा रोग मुख्यतः पाणी आणि अन्नातून प्रसारित होतो, हे लक्षात घेता पिण्याच्या पाण्याच्या योजना भीमा नदीवर अवलंबून आहेत, या पाण्यावर योग्य त्या तपासण्या करण्यात याव्यात, पाणी शुद्धीकरण करण्याचे काम केले जावे, अशा सूचना केल्या.

५० वर्षांनंतर जुन्या मित्रांचा स्नेहमेळावा

तभा वृत्तसेवा,
श्रीपूर, दि. १८ फेब्रुवारी-

श्रीपूर येथील चंदशेखर विद्यालयातील सन १९७५ सालातील दहावीनंतर तब्बल ५० वर्षांनंतर एकत्र येणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा हा माझ्या पाहण्यातील पहिलाच मेळावा असून ही घटना अपूर्व असल्याचे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी प्रतिपादन केले.

मेळाव्यास ज्येष्ठ माजी शिक्षक ग. बा. कुलकर्णी, प. ना. अंभ्यकर, मोहन भगत, अं. गो. कुलकर्णी, प्राचार्य पांडुरंग बनसोडे उपस्थित होते. याप्रसंगी ग. बा. कुलकर्णी, रत्नप्रभा खुर्जेकर, तुकाराम बाबर, अनिल देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विजया देसाई, सुरेखा मालुसरे यांनी केले. आभार चारुदत्त देशपांडे यांनी मानले.

साखर उद्योगात कार्यकारी संचालक ते प्रेसिडेंट म्हणून आपल्या कार्याचा नावलौकिक वाढवत साखर उद्योगास वेगळा आयाम देणारे चारूदत्त देशपांडे यांना नुकताच शुगर टेक्नॉलॉजी असोशिएटेड ऑफ इंडिया न्यू दिल्ली या संस्थेचा उत्कृष्ट एक्सलन्स पुरस्कार मिळाल्याबद्दल या कार्यक्रमात पांडुरंग कारखान्यातर्फे डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी सत्कार केला.

मेळावा यशस्वी करण्यासाठी जयकुमार घाडगे, तुकाराम बाबर, ज्ञानेश्वर सुमंत, नंदकुमार सुतार, अनंता कुलकर्णी, किशोर उत्पात, अरुण गोरे, साठे, विजया गुर्जर, कल्पना कुलकर्णी, मंगल डहाळे, मिना आरळेकर, वंदना कुलकर्णी, सुरेखा मालुसरे यांनी परिश्रम घेतले.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

लिटल वंडर्स स्कूलला शिवाजी महाराजांची मूर्ती भेट

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि. १८ फेब्रुवारी-

सांगोला शहरातील सिद्धेश्वर एज्युकेशन फाउंडेशन संचलित लिटल वंडर्स पब्लिक स्कूलला माजी नगराध्यक्ष ड.पृथ्वीराज चव्हाण यांचेकडून छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती भेट देण्यात आली. यावेळी लिटल पब्लिक स्कूल तर्फे ड.पृथ्वीराज चव्हाण यांचा रोप देऊन सन्मान करण्यात आला. सांगोल्यातील माजी नगराध्यक्ष ड.पृथ्वीराज चव्हाण यांनी लिटल पब्लिक वंडर स्कूलला भेट दिली असता इंग्लिश मीडियम मधील विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास व पराक्रम यांची माहिती व्हावी या उद्देशाने शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती भेट दिली. यावेळी सिद्धेश्वर एज्युकेशन फाउंडेशनचे संचालक अमेय लोखंडे, स्नेहल लोखंडे उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त...

शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त १०२ जणांचे रक्तदान

माढा, दि. १८ फेब्रुवारी-

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे युवा नेते शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी यांनी माढा तालुक्यातील उपळाई खुर्द येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी १०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन युवा नेते शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विनंती कुलकर्णी विलास बाप्पा देशमुख, भारत शिंदे, गुरुराज कानडे राम मस्के, रावसाहेब देशमुख, गोविंद पवार, शंभू साठे, यशवंत शिंदे, संतोष मुटकुळे, सचिन लोकरे, प्रसाद पाटील, धनाजी देशमुख, पप्पू कदम, सोमनाथ गायकवड, समाधान अनपट, केशव गायकवाड, अविनाश धोत्रे, सुभाष इंदलकर, विजय कोकाटे, सतीश चोपडे, शीतल जोकार, सत्यवान लटके, विशाल कानगे, सरपंच राहुल जाधव, तुषार बारबोले, राजू केचे ,सतीश चोपडे,चैतन्य शेटे, मारुती वाघ, अंकुश जाधव, नागेश इंगळे, नवनाथ इंगळे, दत्तात्रय पाटेकर, गोटू नाईक, भाऊसाहेब मोहिते, अक्षय मोहिते, राजू मोहिते, महेश भोगे, संजय भोगे उपस्थित होते. याप्रसंगी उपळाई खुर्दच्या ऐडके वस्ती व मोहिते वस्ती येथील जिल्हा परिषद शाळेला साऊंड सिस्टिम भेट देण्यात आली.

प्रेम गीतांनी बार्शीकर न्हाऊन निघाले

बार्शी, दि. १८ फेब्रुवारी-

व्हॅलेंटाईन डेनिमित्त फक्त हौशी कलाकार बार्शीतर्फे प्रेम गीतावर गीतांचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित केला होता. सदर कार्यक्रम नवनवीन गाणे आणि प्रेमगीतांची हिट गाण्यांची मेजवानी घेऊन बार्शीकर मंत्रमुग्ध झाले असा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन शिवाजी शिक्षण मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे, उद्योजक सुरेशशेठ डाळे आणि स्मार्ट अकादमीचे सचिन वायकूळे यांच्या हस्ते पार पडले. मेजर अविनाश हिंगमिरे, सीए बालकिसन जाजू, अशोक डहाळे, राहुल झोंबाडे, प्रशांत म ाळवदे, गोंविद तापडिया, अजय खंडेलवाल आणि सुनील फल्ले यांनी गीते सादर केली. तसेच महिला सदस्य सुजाता हिंगमिरे, श्रीमती लक्ष्मी तोरड, सुनीता जाजू, रुपाली पवार, स्वाती डोळे, निमा कांबळे, अरुणा तापडिया यांनी आशिकी, दिवाना, साजन, प्यार झुकता नही, बाजीगर, एक दुजे के लिये, मै खिलाडी तू अनाडी,राजा हिंदुस्थानी, दिल तो पागल है, आंखे, चोरी चोरी, जवानी दिवानी अशा चित्रपटातील बहारदार गीते सादर केले. सूत्रसंचालन ॲड. प्रणाली शेटे यांनी केले. आ. दिलीपराव सोपल यांनीही गीताचा आस्वाद घेतला. कार्यक्रमास बार्शी माहेश्वरी जैन समाज, बार्शी वीरशैव लिंगायत तेली समाज, ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था, वृक्ष संवर्धन समिती, प्रसन्नदाता मंडळ, हेल्थ क्लब आणि अनेक संस्थांचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सीए बालकिसन जाजू आणि सुनील फल्ले यांनी नियोजन केले होते. श्रीमती लक्ष्मी तोरड यांनी आभार मानले.

पोथरेत राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप

करमाळा, दि. १८ फेब्रुवारी-

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, यांच्या संयुक्त विद्यम ाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप दि. १७ फेब्रुवारी रोजी पोथरे गावी मोठ्या उत्साहात पार पडला. या समारोप सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. बाबूराव हिरडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील होते. प्रस्ताविक प्रा. डॉ. अभिमन्यू माने यांनी केले. शिबिरास सरपंच अंकुश शिंदे यांनी सहकार्य केले. या शिबिरात पन्नास शिबिरार्थी सहभागी झाले होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. मुळीक एस. डी., प्रा. सोनवणे, डॉ. गायकवाड, प्रा. विटूकडे आणि इतर प्राध्यापकांनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन डॉ. विजया गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. कृष्णा कांबळे यांनी मानले.

ध्येय प्रतिष्ठानला आयएसओ मान्यता

माढा, दि. १८ फेब्रुवारी-

ध्येय प्रतिष्ठान सामाजिक संस्थेला शासनाच्या वतीने आयएसओ म ानांकन प्राप्त झाले आहे. ध्येय प्रतिष्ठान ह्या आमच्या संस्थेला आयएसओ मानांकन मिळाल्याने आम्ही केलेल्या कामाची पोच पावती मिळाली आहे. असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिनेश गाडेकर यांनी सांगितले आहे. ध्येय प्रतिष्ठान सन २००५ ला स्थापन करण्यात आली ह्या प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून माढा शहर व परिसरात सामाजिक व समाज उपयोगी विविध उपक्रम राबवले जात असुन तसेच तळागाळातील लोकांना प्रतिष्ठानच्या माध्यमातून मदत कार्य करण्यात येत आहे गुणवंत विद्यार्थी सत्कार, स्वच्छता मोहीम,आरोग्य शिबिरात सेवा देणे गरजूंना मदत असे विविध गोष्टी अनेक क्षेत्रात प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचेही संस्थापक अध्यक्षांनी सांगितले आहे.

पंढरपुरातील सर्व मिळकतींची ड्रोनद्वारे मोजणी

नक्शा प्रकल्पाचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. १८ फेब्रुवारी-

केंद्रशासनमार्फत शहरी भागातील जमिनीची ड्रोनद्वारे मोजणी करुन अद्यावत व अधिक अचूक नकाशे तयार करण्याचा 'नक्शा' उपक्रम सुरु करण्यात येत आहे. त्यात प्रथदर्शी प्रकल्प म्हणून पंढरपूर नगरपालिकेची निवड करण्यात आली असून, नगरपरिषद हद्दीतील सर्व मिळकतींचे सविस्तर नगर भूमापन करुन व चौकशी करुन मिळकतींचे नकाशे व मिळकत पत्रिका या प्रकल्पातंर्गत तयार करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख दादासाहेब घोडके यांनी दिली.

पथदर्शी नक्शा प्रकल्पाचा शुभारंभ मंगळवारी (दि.१८) योग भवन, पंढरपूर येथे करण्यात आला. यावेळी तहसिलदार सचिन लंगुटे, उपअधीक्षक भूमी अभिलेख पूजा आवताडे, उपमुख्याधिकारी अँड. सुनिल वाळूजकर, नगर अभियंता नेताजी पवार, क्रेडाई अध्यक्ष अमित शिरगावकर, भुमि अभिलेख विभागाचे नवनाथ राऊत, विकास कुमठेकर, शिवदास शितोळे, प्रविण ननवरे, मयुर पुजारी तसेच शहरातील क्रेडाई सदस्य, नगरपरिषदचे सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी, महिला बचत गट, माजी नगरसेवक, नागरिक उपस्थित होते.

यावेळी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख घोडके म्हणाले, पंढरपूर शहरी भागातील जमिन मोजणी करुन मालमत्ता कार्ड देण्याबाबत 'नक्शा'(छ-घडक) हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. राज्यात १० नगरपालिका क्षेत्राम ध्ये हा प्रकल्प पथदर्शी प्रकल्प म्हणून राबविण्यात येत आहे. त्यात आपल्या जिल्ह्यातील पंढरपूर नगरपालिकेचा समावेश आहे. पंढरपूर नगरपालिकेच्या क्षेत्राच्या भागातील मालमत्तांचे ड्रोनद्वारे सर्व्हेक्षण केले जाईल. त्याद्वारे प्रत्येक मालमत्तेचे अचुक नकाशे तयार करुन मालमत्ताधारकास दिले जातील. शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगर रचना विभागाच्या नकाशांशी तसेच भूमि अभिलेख विभागाच्या नकाशांशी एकसूत्रता असणे अत्यंत महत्त्वाचे असून. शहरी भागातील बांधकाम परवाने योग्य पद्धतीने हाताळणे आणि मिळकत कराची योग्य आकारणी करण्यासाठी, ड्रोन सर्व्हे सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागेचा अचूक आणि भूसंदर्भीय नकाशा तयार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपअधीक्षक भूमी अभिलेख पूजा आवताडे म्हणाल्या,ड्रोनद्वारे तयार केलेल्या नकाशाच्या आधारे पंढरपूर शहरात सद्यस्थितीत नोंदीत मालमत्तांची पडताळणी व नव्याने निदर्शनास आलेल्या मालमत्तांची मालमत्ता कर रजिस्टर मध्ये नोंद होऊन पालिकेचे उत्पन्न वाढेल. तसेच मालमत्ता धारकाचे अचुक क्षेत्र त्यास मोजणी करुन मिळेल.

शहरात विविध विकासकामे राबवितांना जमिन मोजणी ही अचुक होईल. त्यांचे मालकी पत्र जमिन मालकास मिळेल. तसेच शहरातील जमिनीचे वर्गिकरण करणे व त्याचे क्षेत्र निश्चिती करणे सुलभ होईल. नागरिकांच्या नागरी हक्कांचे संरक्षण होईल, मिळकतीबाबतचे न्यायालयीन दावे कमी होण्यास मदत होईल. सदर कार्यक्रम नगर विकास विभाग, भूमि अभिलेख विभाग व भारतीय सर्वेक्षण विभाग, डेहराडून यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

सांगोल्यातील सुनिल वाघमारे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि. १८ फेब्रुवारी-

शहाणबाग बहुउद्देशीय संस्था, सांगली यांचेकडून सांगोल्यातील सुनिल वाघमारे यांना कराटे क्षेत्राच्या अतुलनीय योगदानाबद्दल आदर्श शिक्षक राजे छत्रपती पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. सदर कार्यक्रम वारणा मल्टीपर्पज हॉल, सांगली येथे पार पडला.

सुनील वाघमारे हे सांगोल्यातील मुला मुलींना कराटे क्षेत्रात गेली २७ वर्षापासून मार्गदर्शन करीत आहेत. त्यामुळे सांगोल्याचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजले आहे. त्यांना याआधीही स्व. सवडलाल साहू बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांनी गोवा येथे सन्मानित केले होते. सदर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सुनील वाघम ारे यांचे सर्व क्षेत्रातून कौतुक होत आहे.

शिवतेजसिंह यांच्या वाढदिवसानिमित्त खाऊ वाटप

तभा वृत्तसेवा,
माढा, दि. १८ फेब्रुवारी-

माढा तालुक्यातील मानेगाव येथे शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायत सदस्य शितलकुमार जोकार व कै. राहुल भेंडकर प्रतिष्ठान यांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा येथे खाऊ वाटप करण्यात आले.

यावेळी धनंजय देशमुख, आशोक शेळके, बाळकृष्ण देशमुख, राहुल पारडे, अनिल भेंडकर, रमेश लोंढे, आलम जम ादार, दिपक सिरसट, मुख्याध्यापक अतुल देशमुख, मोहिते गुरुजी यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लक्ष्मी आनंद विद्या मंदिरात शिवजयंती उत्साहात

तभा वृत्तसेवा,
टेंभूर्णी, दि. १८ फेब्रुवारी-

लक्ष्मी आनंद विद्या मंदिर व ज्यु. कॉलेज टेंभुर्णी येथे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन, दीपप्रज्वलन करुन राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्प अर्पण करून सदर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

प्रशालेतील विद्यार्थ्यांनी विविध कलाप्रकारांच्या सादरीकरणातून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. जिजाऊ, शिवबा व मावळ्यांच्या वेषभूषेतील चिमुकल्यांनी उपस्थितांची मने जिंकली. संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजा बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्राचार्य विकास करळे, पीआरओ सागर खुळे, प्री-प्रायमरी इन्चार्ज सुप्रिया काळे इतर सर्व शिक्षक कर्मचारी विद्यार्थी शिवप्रेमी, पालक उपस्थित होते.

११ लाखांचा गुटखा जप्त

पंढरपूर पोलिसांची कारवाई

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.१८ फेब्रुवारी -

येथील शहर पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी गांजा जप्त केला त्यानंतर लगेचच कारवाई करून सुमारे ११ लाख रुपयाचा गुटखा व सुगंधी सुपारी जप्त केली आहे.

या कारवाई संदर्भात शहर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, खबऱ्यामार्फत पोलिसांना माहिती मि ळाली की सांगोला येथून पंढरपूर कडे एका बोलेरो जीप मधून गुटका सुगंधी सुपारी येत आहे. पोलिसांनी लगेच सांगोला रस्त्यावरील विक्रम ढाबा येथे सापळा लावला रविवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास संबंधित बेलेरो जीप येत असताना पोलिसांनी थांबवून तपासणी केली असता आत मध्ये पोते व बॉक्समध्ये गुटखा व सुगंधी सुपारी ठेवण्यात आली असल्याचे दिसून आले. दरम्यान पोलिसांनी बोलेरो गाडी पोलीस ठाण्यात नेऊन तपासणी केली असता गुटका व सुगंधी सुपारीचे ४० पोते व दोनशे बॉक्स आढळून आले.

याची किंमत ११ लाख रुपये असून बेलेरो आठ लाख रुपये किम तीची असा एकूण १९ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष कांबळे, पोलीस हेडकॉन्स्टेबल राजेश गोसावी, कल्याण ढवणे, सुरज हेंबाडे, सीरमा गोडसे सचिन हेंबाडे, प्रसाद आवटे, शरद कदम या पथकाने केली

छावा चित्रपट करमुक्त करा

— खा. धैर्यशील मोहिते-पाटलांचे पंतप्रधान मोदींना पत्र —

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि. १८ फेब्रुवारी-

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, महान योद्धा आणि कर्तव्यनिष्ठ शासक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित छावा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात त्यांच्या शौर्य, बलिदान, सत्यनिष्ठा आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रभावीपणे चित्रण करण्यात आले आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन केवळ ऐतिहासिकच नाही, तर अत्यंत प्रेरणादायी आहे.

चित्रपटाच्या माध्यमातून दिलेल्या संदेशामुळे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पत्र पाठवले असून, या चित्रपटाला देशभरातील सर्व शाळांमध्ये दाखवण्याची आणि त्याला करमुक्त करण्याची मागणी केली आहे.

खासदार मोहिते-पाटील यांनी म्हटले की, छावा चित्रपट युवांना साहस, कर्तव्यनिष्ठता, आणि देशभक्तीच्या मूल्यांची प्रेरणा देणारा आहे. त्यामुळे या चित्रपटाला शाळांम ध्ये दाखवण्याचे निर्देश दिले जावेत. याशिवाय, या ऐतिहासिक चित्रपटाच्या महत्तेचा विचार करून त्याला करमुक्त करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून अधिकाधिक लोकाना आणि विद्यार्थ्यांना हा चित्रपट पाहता येईल आणि प्रेरणा मिळवता येईल.

शिवजयंतीनिमित्त मॅरेथॉन स्पर्धा

४५७ पुरुष तर १५३ महिलांचा सहभाग

तभा वृत्तसेवा,
कुर्डूवाडी, दि. १८ फेब्रुवारी-

शिवप्रतिष्ठान कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, रोटरी क्लब, इनरव्हील क्लब कुर्डुवाडी व बीआयटी कॉलेज बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवानिमित्त शिवमहोत्सव आयोजित केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज भव्य मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. पुरुषांसाठी शिवदौड, मॅरेथॉन व म हिलांसाठी जिजाऊ दौड, पिंकेथॉन आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेची सुरवात महात्मा ज्योतिबा फुले चौक बायपास कुर्डुवाडी येथून झाली, स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण शिवम होत्सव मैदानावरती झाला. यामध्ये रोख बक्षीसे व ट्रॉफी मेडल आणि प्रशस्तीपत्र अशा स्वरूपाचे होते, स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या सर्वच स्पर्धकांना सहभाग-प्रशस्तीपत्र देण्यात आले. या स्पर्धेसाठी ४५७ पुरुष स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता तर १५३ महीला सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेमध्ये १४ वर्षांपासून ते ६० वर्षा वयाचे स्पर्धक धावले. ही स्पर्धा महिलांसाठी पाच किलोमीटर व पुरुषांसाठी सात किलोमीटर होती. या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्यासह, पुणे, अहिल्यानगर, जळगाव जिल्ह्यातून स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धे साठी सर्व स्पर्धकांना बी आय टी कॉलेज बार्शीचे प्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांच्याकडून देण्यात आले होते. या स्पर्धे साठी प्रमुख पाहुण्या म्हणून नॅशनल चाईल्ड अँड वूमेन डेव्हलपमेंटच्या राष्ट्रीय महासचिव डॉ. श्रद्धा जवंजाळ, महाराष्ट्र राज्य इंडियन मेडिकल असोचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी, कुर्डुवाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मुल्ला, श्रीमती पीएसआय सारिका गटकुळ यांनी भगवा झेंडा दाखवून सुरवात केली. बक्षीस वितरणाच्यावेळी ६० गड किल्ले पायी चढून जाणारे नवनाथ बोराडे यांचा सत्कार करण्यात आला तसेच नूतन विद्यालयातील राष्ट्रीय पातळीवरील तीन गोल्ड मेडलिस्ट विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला तसेच ५१ गदेचे मानकरी व माढा तालुक्यातील सुपुत्र अस्लमभाई काजी यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवदौड, जिजाऊदौडचे संयोजक संजय टोणपे, शिवदौडचे प्रमुख डॉ. प्रद्युम्न सातव, जिजाऊदौडच्या प्रमुख साजरी शहा, डॉ. निशिगंधा कोल्हे, डॉ. सुनंदा रणदिवे, इनरव्हीलच्या अध्यक्षा डॉ. नागश्री दोशी, सचिव वीणा पूर्वत, शिल्पा चिंचवडकर, डॉ. रवींद्र बोबडे, डॉ. हर्षद शहा, अजिनाथ बोबडे, घनश्याम क्षीरसागर, सुहास शहा, प्रमोद बागल, आशा घाडगे, उषा गोरे, प्रिया मेहता, वैशाली शहा, लता चव्हाण, नितीन गोरे, अरुण टोणपे, डॉ. साखरे, बाहुबली जोशी, प्रकाश धोका हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवप्रतिष्ठान, रोटरी क्लब, इनरव्हील क्लबचे पदाधिकारी तसेच बार्शीचे भागवत लोकरे, थोरात, संजय यादव, चेतन आद्ये, युवराज कोळी, वाहेद शेख आकाश गोरे, मच्छिंद्र कदम, सागर कोल्हे, क्षितिज टोणपे, प्रसाद आतकर, शंभू दास, सुरज काळे, अथर्व टोणपे, सागर कोळी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन सुधीर क्षीरसागर यांनी केले

गजानन महाराजांच्या प्रकटदिना निमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि. १८ फेब्रुवारी-

श्री संत गजानन महाराज प्रकट दिन सोहळा गुरूवार दि.२० फेब्रुवारी रोजी संपन्न होत असून त्यानिमित्त चौंडेश्वरी मंदिर, कोष्टी गल्ली, सांगोला येथे दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये बुधवार दि. १९ फेब्रुवारी श्री गजानन विजय ग्रंथाच्या २१ अध्यायाचे एक दिवसाचे महापारायण व समाप्ती नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२० फ ेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता हभप रामेश्वर पंचाक्षरी जोकार, सावळेश्वर-सोलापूर यांचे कीर्तन, पुष्पवृष्टी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच दिवशी सायंकाळी ४ वाजता सांगोला शहरातून पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. री सर्व भाविक भक्तांनी या भक्तीमय सोहळ्याचा लाभ घ्यावा अशी विनंती श्री संत गजानन महाराज भक्त परिवारांनी केली.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

शिवजन्मोत्सवानिमित्त धनेगावात व्याख्यानाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
वलांडी, दि.१८ फेब्रुवारी -

देवणी तालुक्यातील धनेगाव येथे ग्रामस्थांच्या वतीने शिवजयंतीनिमित्त भव्य व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. येथील महादेव विद्यालयाच्या सभागृहात १९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता हा कार्यक्रम पार पडणार आहे.

या विशेष कार्यक्रमात परमवीर चक्र विजेते सुभेदार जनरल योगेंद्रसिंह यादव, सेना मेडल विजेते कर्नल गिरीधर कोले, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी शरद पांढरे, पोलीस निरीक्षक माणिकराव डोके, सचिन रंडाळे, तहसीलदार सोमनाथ वाडकर, सुभेदार मोहन शिंदे, तसेच राष्ट्रीय युवा वक्त्या भाग्यश्री मोहिते-पाटील हे मान्यवर उपस्थित राहून व्याख्यान देतील. या व्याख्यानातून छत्रपती

शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात येणार असून, विशेषतः त्यांचे शौर्य, राज्यकारभार आणि प्रशासनातील योगदान यावर चर्चा होणार आहे.

विद्यार्थी व धनेगाव परिसरातील ग्रामस्थांनी या ऐतिहासिक क्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन रवींद्र कुमार पाटील, अनिल बिरादार व पांडुरंग बिरादार यांनी केले आहे.

संक्षिप्त वृत्त...

विज्ञान प्रदर्शनात जयहिंद विद्यालयाचे यश

कसबे तडवळे, दि.१८ फेब्रुवारी -

राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर या ठिकाणी पार पडलेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये जयहिंद विद्यालयातील टू वे बेंच, बसमधील कचरा व्यवस्थापन, मॅथ्स वर्किंग मॉडेल या तीन प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले होते. यामधील मॅथ्स वर्किंग मॉडेल या साहित्यास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. या साहित्याचे सादरीकरण करणारे इ.८ वीतील अमन महेबूब तांबोळी, सार्थक महादेव होगले यांचा रोख रक्कम, प्रमाणपत्र व बुके देऊन सन्मान करण्यात आला. तसेच सहभागी विद्यार्थी संस्कार हनुमंत जगदाळे, दिपक वैजिनाथ कदम,प्रथमेश धनंजय कुरुळे व समर्थ सोमनाथ शिंदे या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे एस. टी. पालके यांचाही सत्कार करण्यात आला. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे टी.पी. शिनगारे, मुख्याध्यापक आर.डी. गाढवे, ए.आर.घोडके, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांनी कौतुक केले.

शिवजयंतीनिमित्त आज रक्तदान शिबिर

इटकळ, दि.१८ फेब्रुवारी -

तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे बुधवार दि.१९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव असल्याने शिवभक्त मुरलीधर शिनगारे यांच्या निवासस्थानी राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे विधियुक्त पूजन व दुग्धाभिषेक करून शिव जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. याही वर्षी शिव जन्मोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन सकाळी १० ते ४ या वेळेत करण्यात आलेले आहे. तरी या रक्तदान शिबिरात गाव परिसरातील युवकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन शिवभक्त मुरलीधर शिनगारे यांनी केले आहे.

जवाहरमध्ये सेवालाल महाराज जयंती साजरी

धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -

धाराशिव विद्यानगर बावी येथील वसंत प्राथमिक जवाहर माध्यमिक आश्रम शाळा व कनिष्ठ महाविद्यालय येथे श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न झाली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे प्राचार्य दयानंद मनोहरराव राठोड कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रशासकीय अधिकारी जगताप बी.यु. प्रमुख उपस्थिती साकळे बी.एस. देशमुख, ए.आर. जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वप्रथम शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी संत श्री सेवालाल महाराज यांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विनोद राठोड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका देवकन्या भोसले हिने केले तर शेवटी कांबळे के.डी. यांनी सर्वांचे आभार मानले.

आलुरमध्ये सेवालाल महाराज जयंती साजरी

आलुर, दि.१८ फेब्रुवारी -

आलुर येथे संत श्री सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती ग्रामपंचायत कार्यालय आलुर व बंजारा समाजातील ज्येष्ठ नागरिक व युवकांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. बंजारा समाजाच्या वतीने प्रती वर्षीप्रमाणे सेवालाल मंदिरात पुजा आरती करुन सेवालाल चौक येथे ध्वजारोहण करण्यात आले व समाजातील महिला व युवकांनी शोभायात्रा काढुन पारंपारिक नृत्य सादर केले. ग्रा.पं. कार्यालय येथे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शिरिष पाटिल यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सरपंच प्रतीनिधी रामराव जेऊरे, गुलाब राठोड, निलु राठोड, हरी राठोड, कल्लप्पा राठोड, खुबा जाधव व बंजारा समाजातील युवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

तुळजाभवानीच्या मूळ गाभारा काम; पंधरा दिवसात अभिप्राय द्या : जिल्हाधिकारी

तिने पुजारी मंडळांनी लेखी अभिप्राय मंदिर संस्थानाकडे सादर करावेत... **श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या कामाची आढावा बैठक संपन्न...**

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -

जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थांचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे यांनी तुळजाभवानी मंदिर विकासकामांची आढावा बैठक आज दिनांक १८ फेब्रुवारी रोजी श्री तुळजाभवानी मंदिर प्रशासकीय कार्यालयात घेतली. यावेळी त्यांनी विविध टप्प्यांमध्ये होणाऱ्या विकासकामांच्या सद्यस्थितीबाबत संपूर्ण माहिती जाणून घेऊन पुरातत्व विभाग, मंदिर प्रशासन तसेच पुजारी मंडळासोबत प्रस्तावित कामासंदर्भात चर्चा केली.

देवीजींच्या मूळ गाभाऱ्याचे काम करावयाचे प्रस्तावित असून याबाबत काम करुणेचा झाल्यास देवीजींची मूर्ती हलविता येईल किंवा दर्शनाचे नियोजन कसे करता येईल याबाबतचे लेखी अभिप्राय तिनही पुजारी मंडळ व महंत यांनी पुढील १५ दिवसांत मंदिर संस्थानाकडे सादर करावेत अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. भावनीरोड वरील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यासाठी उपाययोजना करणेबाबत नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना सूचना बैठकीत देण्यात आल्या.

पुरातत्व विभागाकडून येत्या शुक्रवार पर्यंत गाभाऱ्याच्या स्ट्रक्चरल ऑडिट चा अहवाल सादर करण्यात येईल असे सांगण्यात आले. भवानी शंकर मंडपाचे काम करताना सर्व खांबांची रचना वेगवेगळी आढळून आल्याने त्यातील एक खांब नमुना म्हणून निवडण्यात आला असून त्यावर सर्वांची मते घेऊन त्याप्रमाणे सर्व खांबांची रचना करण्याबाबत चर्चा बैठकीत झाली.

मंदिर आवारातील यज्ञमंडपाशेजारील पिंपळपाराला पुरातन स्वरूप देणेस्तव काम सुरू असून या पाराची उंची आधीपेक्षा कमी करणेविषयी चर्चा झाली. मंदिर पोलीस चौकीसाठी नवीन

बांधकाम प्रशासकीय इमारतीच्या पहिल्या मजल्यावर पूर्ण झालेले असून त्याठिकाणी पोलीस चौकी हलविणेबाबत निर्णय बैठकीत झाला.

बैठकीस महंत तुकोजीबुवा, तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे, मंदिर संस्थानच्या तहसीलदार तथा व्यवस्थापक माया माने, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ नीलेश देशमुख, पुरातत्व विभागाच्या सहायक संचालक जया वहाने व अन्य अधिकारी, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे व हेमंत पाटील, महंत तुकोजी महाराज भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमर परमेश्वर, पाळीकर पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपीन शिंदे, उपाध्ये मंडळाचे अध्यक्ष अनंत कोंडो, पुजारी अण्णासाहेब क्षीरसागर, सुधीर कदम, सचिन पाटील, धनंजय लोंढे, नागेश साळुंके, इंद्रजीत साळुंके यांच्यासह पुजारी मंदिराचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

भवानी रोडवरील गेटवर शिवभक्त, सुरक्षा रक्षकांत राडा

झेंडा लावलेल्या मोटरसायकली मंदिरापर्यंत सोडण्याच्या कारणावरून बाचाबाची...

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१८ फेब्रुवारी -

उमरगा, बलसुर येथील शिवभक्त शिवजयंतीनिमित्त तुळजाभवानी देवीचे दर्शन घेण्यासाठी मोटरसायकलवरून मोटरसायकल रॅली काढून आले होते. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने भवानी रोड येथील गेट या भागातील स्थानिक नागरिक आणि व्यापारी यांच्या मोटरसायकल व्यतिरिक्त कुठलेही मोटरसायकली तुळजाभवानी मंदिरापर्यंत सोडत नाहीत. आम्ही मोटरसायकल रॅली देवीच्या दर्शनासाठी आमच्या गावावरून घेऊन आलोत आम्हाला का सोडत नाही म्हणून सुरक्षारक्षकाशी वाद घालण्यास सुरुवात केली असता बघ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमली.

शिवभक्तांनी गेटसमोर गाड्या आडव्या लावल्या यामुळे तुळजाभवानी मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांना काही वेळ अडसळ निर्माण झाला.

स्थानिक नागरिकांच्या सांगण्यावरून रॅलीतील शिवभक्तांनी मोटरसायकली जवाहर गल्ली मार्गे नेऊन भवानी रोडला लावल्या अर्धा पाऊण तास चाललेल्या बाचाबाची झेंडे असणाऱ्या गाड्यांचे कारण पुढे करत काही प्रमाणात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांची बदली

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -

धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांची बदली करण्यात आली असून, त्यांची नियुक्ती सोलापूरच्या महापालिका आयुक्त म्हणून करण्यात आली आहे. धाराशिव येथे त्यांच्या कार्यकाळातील ठोस निर्णय आणि प्रभावी प्रशासनामुळे जिल्ह्याच्या विकासाला वेग मिळाला. तुळजाभवानी मंदिराच्या जतन आणि संवर्धनासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते.

डॉ. सचिन ओम्बासे हे कार्यक्षम आणि तात्काळ निर्णय घेणारे अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांनी जिल्हाधिकारी पदाची जबाबदारी सांभाळताना अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. विशेषतः तुळजाभवानी मंदिराच्या पुरातन वैभवाच्या जतनासाठी त्यांनी खास योजना आखली. मंदिर परिसराचाविकास, स्वच्छता, भक्तांसाठी सुविधा आणि ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्यातील विकासकामांना गती मिळाली. प्रशासन आणि जनतेमध्ये विश्वास निर्माण करणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती.

श्री तुळजाभवानी मंदिरात उन्हामुळे भाविकांसाठी मंडप

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१८ फेब्रुवारी -

फेब्रुवारी महिना अखेर चालू झाले असून हळूहळू उन्हाळा जाणवू लागला आहे. दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत आहे. उन्हाळ्यामध्ये भाविक मंदिर महाद्वारापासून अनवाणी पायाने तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी मंदिरात आणि मंदिर परिसरात फिरत असतात उन्हापासून भाविकांचे संरक्षण व्हावे म्हणून मंदिर संस्थानच्या वतीने संपूर्ण मंदिरात सावलीसाठी मंडप टाकण्याचे काम चालू झाले आहे. यासाठी उन्हापासून ऊन विरहीत हिरवा कपडा संपूर्ण मंदिर परिसरात लावण्यात आला आहे. हवेसाठी या कपड्यात अंतर सोडण्यात आले आहे यामुळे मंदिर परिसरात भाविकांचे संरक्षण होऊन हवा देखील खेळती राहणार आहे.

मंडपा सोबतच दगडी फरशीवर खाली मॅट हाताने गरजेचे आहे. अनवाणी पायाने येणाऱ्या भाविकांमध्ये लहान मुले, वृद्ध आणि महिला भाविक देखील असतात उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे मंदिर परिसरात मॅट टाकणे आवश्यक आहे. तसेच मंदिर संस्थांच्या वतीने मंदिराबाहेर महाद्वारासमोर आणि मंदिर महाद्वार शेजारी असलेल्या प्रशासकीय कार्यालयासमोर प्रतिवर्षी मंडप टाकण्यात येत असतो पण यावर्षी मंदिरा बाहेर मंडप टाकल्याचे दिसून येत नाही. तसेच मंदिरासमोरील दगडी फरशा देखील उन्हाने गरम होतात. त्यासाठी मंदिर परिसर आणि मंदिर महाद्वारासमोर देखील मॅट हातरणे गरजेचे आहे.

वरुडा रोडला जोडणारा डी.पी. रोड पुर्ववत चालू ठेवा : खा. राजेनिंबाळकर

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -

धाराशिव शहरातील सर्व्हे नं. १५३ मधून बँक कॉलनी व अन्य नागरी भागांना जोडणारा रस्ता संदर्भात नागरीकांच्या मागणीच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये सदर रस्ता पुर्वीप्रमाणे चालू ठेवणेसंदर्भात पोलीस अधिक्षक धाराशिव मुख्याधिकारी, नगर पालीका, धाराशिव, जिल्हा प्रशासन अधिकारी नगर रचनाकार यांच्या समवेत नागरीकांच्या

तक्रारीच्या अनुषंगाने बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीस आमदार कैलास पाटील, नंदुभैय्या निंबाळकर उपस्थीत होते.

पोलीस प्रशासनाच्या ताब्यातील जमीनीमधून सदर रस्ता जात असून पोलीस प्रशासन हा रस्ता बंद करणार असल्याची माहिती सामाजिक प्रसार माध्यमातून व नागरीकांच्या निवेदनाव्दारे मिळाल्यानंतर नागरीकांची होणारी गैरसोय लक्षात घेता सदर रस्ता पुर्ववत प्रमाणे चालू ठेवणेबाबत या बैठकीमध्ये सुचना देण्यात आल्या.

या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, पोलीस अधिक्षक संजय जाधव, मुख्याधिकारी नगर परीषद वसुधा फड, जिल्हा प्रशासन अधिकारी नगर रचनाकार, राजाभाऊ पवार, आदीसह अनेक नागरीक उपस्थीत होते.

लोटस पोदार लर्न स्कूल येथे शिव जन्मोत्सव साजरा

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.१८ फेब्रुवारी -

शिवछत्रपती बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोटस पोदार लर्न स्कूल,उमरगा येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या सुवर्ण दिनी प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष व्यंकट अरगडे हे उपस्थित होते व त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीची पुजा संपन्न झाली.

ई-केवायसी केले नाही तर रेशन बंद होणार

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.१८ फेब्रुवारी -

तालुक्यात ८२ हजार १४७ लाभार्थ्यांनी अद्यापही ई-केवायसी केलेला नाही. यामुळे ते धान्यापासून वंचित राहू शकतात.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना अंतर्गत शिधापत्रिका धारकांना शासकीय अनुदानित अन्न धान्याचा लाभ सुरू ठेवण्यासाठी तसेच ही प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी कुटूंबातील सर्व सदस्यांचे ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. उमरगा तालुक्यात अंत्योदय व प्राधान्य कुटुंबातील एकूण १ लाख ८४ हजार १४७ लाभार्थी आहेत.या लाभार्थ्यांना सुरुवातीपासूनच ई-केवायसी करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. तालुक्यातील गावागावांत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी रेशनकार्डावरील कुटुंबातील सर्व लाभार्थ्यांनी आपल्या संलग्न रेशन दुकानांमधून प्रत्यक्ष आधारकार्ड दाखवून अंगठ्याचा ठसा देऊन आधार प्रमाणिकरण म्हणजेच ई-केवायसी करणे आवश्यक आहे. जे लाभार्थी ई-केवायसी करणार नाहीत, अशा रेशन कार्ड धारकांनाचे रेशन २८ फेब्रुवारीनंतर बंद केले जाणार आहे.

त्यामुळे तालुक्यातील लाभार्थ्यांनी या तारखेपूर्वी ई-केवायसी करणे बंधनकारक असल्याचे पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले आहे. एकूण लाभार्थी १८४१४७ असून केवायसी केलेले लाभार्थी ५८००० असून सरासरी टक्केवारी ३२ टक्के आहे. तालुक्यांतील एकूण १ लाख ८४ हजार १४७ रेशनकार्डवरील लाभाथ्यर्थ्यांपैकी ८६ हजार १४७ लाभार्थ्यांनी अद्यापही ई-केवायसी केलेली नाही.

शिधापत्रिका आधार संलग्न केल्यानंतर संबंधित कार्डधारकाचा आधार क्रमांक अचूक आणि तोच आहे का? याची पडताळणी म्हणजे ई-केवायसी होय. पत्ता व ओळखीच्या दृष्टीने ई-केवायसी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. सर्व शिधा पत्रिकाधारकांनी २८ फेब्रुवारीपूर्वी आपली ई-केवायसी करून घ्यावी. अन्यथा त्यांचा धान्य पुरवठा बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

– सचिन बिराजदार, निरीक्षण अधिकारी उमरगा.

ज्या सदस्यांचे ई-केवायसी मुदतीत पुर्ण होणार नाहीत अशा लाभार्थ्यांचा अन्नधान्याचा लाभ बंद होणार आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपल्या गावातील रास्त भाव दुकानदारांशी संपर्क करून तात्काळ आपले ई-केवायसी पुर्ण करून घ्यावे, ई-केवायसी करण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांनी रास्तभाव दुकानात समक्ष उपस्थित राहुन ई-पास मशिनवर Biometric बायोमेट्रिक ऑथेंटिकेसशन करून पुर्ण करावे.

– गोविंद यरमे तहसीलदार उमरगा.

कर्णकर्कश आवाज करणाऱ्या दुचाकीच्या आवाजाने नागरिक त्रस्त

कारवाईची मागणी...

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.१८ फेब्रुवारी -

कंपन्यांकडुन दिलेल्या सायलेंन्सरमध्ये फेरफार करून कर्णकर्कश व फटाक्यासारखा आवाज काढणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध नळदुर्ग पोलिसांनी कडक कारवाई करावी अशी मागणी त्रस्त नागरीकांनी केली आहे.

सायलेंन्सरमध्ये फेरफार केल्यानंतर फटाक्यासारखा आवाज येतो. रात्री अपरात्री, दिवसा फटाक्यासारखा कर्णकर्कश आवाज काढुन शहरातुन फिरणाऱ्या दुचाकी चालकांमुळे अबालवृद्धानसह, आजारी व्यक्ती विशेष करून ज्यांना हृदयविकाराच्या आजाराचा त्रास आहे ते बेजार झाले आहेत. कंपनीने दिलेले सायलेंन्सर बदलुन मॉडीफाय केलेले सायलेंन्सर बसवुन कर्णकर्कश फटाक्यासारखा आवाज काढत दुचाकी चालविणाऱ्या टवाळखोरांवर पोलिसांनी कडक कारवाई करणे गरजेचे आहे.

या कर्णकर्कश व फटाक्यासारख्या आवाजामुळे नागरीक कमालीचे त्रस्त झाले आहेत.

अशप्रकारची टवाळखोरी कारणारे दुचाकीस्वार महाविद्यालय, शाळा तसेच शिकवणीचे वर्ग सुटल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण करण्यासाठी महाविद्यालय तसेच शाळेच्या रस्त्यावरून असा कर्णकर्कश आवाज काढत दुचाकीवरून फेऱ्या मारतात.त्यामुळे विद्यार्थी त्रासुन गेले आहेत.

सध्या धाराशिव जिल्ह्यात कंपन्यांकडुन दिलेल्या सायलेन्सरमध्ये फेरफार करुन कर्णकर्कश व फटाक्यासारखा आवाज काढणाऱ्या दुचाकीस्वरांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे.

याचधर्तीवर नळदुर्ग शहरातही पोलिसांनी कारवाई करावी अशी मागणी त्रस्त नागरीकांमधुन होत आहे.

CMYK

धाराशिव
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

भाजपाचे जिल्हाध्यक्ष चालुक्य यांच्या वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -
भारतीय जनता पार्टी धाराशिव जिल्हाचे सक्षम कर्तव्यदक्ष जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजापूर येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथील विद्यार्थ्यांना भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणी

सदस्य मीना सोमाजी यांच्या वतीने वहीरजिस्टर पेन वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अरूणा कावरे राधा घोगरे लता सोमाजी सविता भोसले जि.प. कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक गाडे, अंबुसे चव्हाण, भोसले शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

ड्रग्स माफियांचा आका शोधून काढा; नागरिक आक्रमक भूमिकेत

ड्रग्स रॅकेट विरोधात तुळजापूरकरांची बैठक... उपविभागीय पोलीस अधीक्षक, निरीक्षक यांच्या बदल्या करा

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१८ फेब्रुवारी -
शहरात मागील काही वर्षापासून होत असलेल्या ड्रग्ज तस्करी व सेवनाच्या विरोधात पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे यांनी शहरातील पुजारी, सर्व पक्षाचे पदाधिकारी, व्यापारी व नागरिक यांची दि.१७ फेब्रुवारी रोजी पुजारी मंडळ कार्यालयात बैठक बोलावली. मंहत मावजीनाथ महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरची बैठक संपन्न झाली.

या बैठकीत आलेले सर्वच नागरिक ड्रग्स माफिया विरोधात आक्रमक झाले असुन आक्रमक भुमिका घेतली आहे. ड्रग्ज रॅकेट मोडुन काढा अन्यथा रस्ता रोको, तुळजापुर बंदचा इशारा या बैठकीत घेण्यात आला आहे. २० फेब्रुवारी रोजी पालकमंत्री प्रतापराव सरनाईक हे तुळजापूर येथे येणार असुन त्याना शहरवासियांच्या वतीने ड्रग्ज तस्करी, रॅकेट चालवणाऱ्यावर कारवाई करण्यासाठी निवेदन देण्यात येणार आहे. पालकमंत्री यांना निवेदन देऊनही कारवाई न झाल्यास आक्रमक भुमिका घेत आंदोलनाचा इशारा देण्याचे ठरले आहे. उपविभागीय पोलीस अधीक्षक आणि पोलीस निरीक्षक यांच्या तात्काळ बदल्या करा अशी ही मागणी बैठकीत करण्यात आली. आताच रोखा नाही तर ड्रग्ज प्रत्येकाच्या घरापर्यंत येईल अशी भुमिका घेतली आहे.

सदरील बैठकीला शहरातील सर्व पक्षाचे पदाधिकारी, पुजारी, नागरिक, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नैतिक मुल्यांचे प्रतिबिंब म्हणजेच छत्रपती शिवराय : आदेश शिंदे

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.१८ फेब्रुवारी -
छत्रपती शिवराय हे फक्त विर योद्धाच नव्हते तर ते माणसाला माणूसपण कसे जपावे आणि यासाठी लागणारी नैतिक मुल्यांचा साठा असणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यामुळे नैतिक मुल्यांचे प्रतिबिंब हे छत्रपती शिवराय यांच्यात दिसुन येते, असे प्रतिपादन युवा व्याख्याते आदेश शिंदे यांनी केले.

ते कळंब येथील डिकसळ मध्ये असणार्या स्वप्ननगरी शिवजन्मोत्सव सोहळ्यातील व्याख्यानमालेत बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवराय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उद्घाटक म्हणून कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त संतोष राऊत, सेवानिवृत्त मुख्याध्यापक अनिल यादव, कळंब तालुका पत्रकार संघाचे विश्वस्त सतीश टोणगे, अध्यक्ष अशोक शिंदे, व्हाईस

ऑफ मिडियाचे राज्य कार्यवाह अमर चोंदे, कळंब तालुका पत्रकार

मंडळाचे अध्यक्ष धनंजय घोगरे, व्हाईस ऑफ मिडियाचे तालुकाध्यक्ष रणजित गवळी, शिवजनमोतसव समितीचे अध्यक्ष परमेश्वर पालकर, सचिव ॲड. तानाजी चौधरी, स्वप्ननगरी सोसायटीचे अध्यक्ष दिलीप टोणगे, उपाध्यक्ष अनिल शेळके, ज्योतिबा मुंडे, महादेव खराटे, विठ्ठल माने उपस्थित होते.

पुढे बोलताना शिंदे म्हणाले की महाराजांचे सरदार सकुजी गायकवाड यांनी शत्रु स्त्री सावित्री देसाई यांच्या शी सत्तावीस दिवस लढून गड जिंकला आणि त्याने परत त्या स्त्रीवर अत्याचार केला. महाराजांनी त्याचे डोळे काढून अजिवन कारावासाची शिक्षा ठोठावली. त्यामुळे महाराजांच्या मनामनात नैतिक मुल्ये ठासून भरलेली होती.

त्यामुळे महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलूंचा आजच्या तरुणांनी अभ्यास करून आचरणात आणणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परमेश्वर पालकर यांनी केले तर सुत्रसंचालन सागर बाराते व आभार ॲड. तानाजी चौधरी यांनी मानले. यावेळी मोठ्या प्रमाणावर शिवप्रेमी उपस्थित होते.

श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा
इटकळ, दि.१८ फेब्रुवारी -
तुळजापूर तालुक्यातील येवती येथे रविवार दि.१६ फेब्रुवारी रोजी श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रतिवर्षाप्रमाणे या ही वर्षी मौजे येवती येथे श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला असुन श्री. संत एकनाथ महाराज लिखित श्री. भावार्थ रामायणाचे हे तिसरे वर्ष होते रविवार दि.१६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता ग्रंथ वाचन व निरुपणास सुरुवात करण्यात आली.

तब्बल बारा तास हा सोहळा सुरू होता. श्री. भावार्थ रामायणातील युद्धकांडातील अध्याय क्रमांक ४३ ते ४९ असे सात अध्याय ओव्या ११३५ याचे रात्रभर वाचन व निरूपण करण्यात आले.

या लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्यास परिसरातील तुळजापुर, उमरगा, कळंब, लातूर, सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, मंगळवेढा, परंडा, बार्शी, औसा, अक्कलकोट आदि तालुक्यातील ग्रंथ वाचक व सूचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रविवार दि.१६ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता सुरू केलेले ग्रंथ वाचन निरूपण सोमवार दि.१७ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजता श्री लक्ष्मण सावचित्य झाल्या नंतर लक्ष्मण शक्ती सोहळ्याची सांगता करण्यात आली.

जय श्रीराम जय श्रीराम च्या जय घोषाने येवती गाव राम मय झाले. येवती येथील श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा हा न भूतो न भविष्यती असाच झाला जवळपास हजारो रामभक्त श्रीराम कथा श्रवण करण्यासाठी उपस्थित होते.

सकाळी महाआरती नंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. अगदी नियोजनबद्द श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा संपन्न झाल्याने गाव परिसरातून येवती रामभक्त ग्रामस्थांचे कौतुक केले जात आहे.

४०० बालकांना मोफत सुवर्ण प्राशनाचा शिबिरातून लाभ

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -
शासकीय आयुर्वेद रुग्णालय, धाराशिव येथे दरमहा आयोजित केल्या जाणाऱ्या मोफत सुवर्ण प्राशन शिबिरात ११ फेब्रुवारी रोजीच्या शिबिरात ४०० हून अधिक बालकांनी सहभाग घेतला. अधिष्ठाता डॉ. ना.सु. गंगासागरे व बालरोग विभाग प्रमुख डॉ.टी.वाय. स्वामी यांच्या मार्गदर्शनात हे शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

धाराशिव शहरासह जिल्ह्यातील इतर भागांतूनही मोठ्या प्रमाणावर पालक आपल्या बालकांसह या शिबिरात सहभागी होत आहेत.

फेब्रुवारी महिन्यातील पुष्य नक्षत्रानिमित्त या शिबिरात ४०० हून अधिक बालकांना सुवर्ण प्राशनाचा लाभ मिळाला.

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन बालरोग विभाग प्रमुख डॉ.टी.वाय. स्वामी, प्रा.डॉ. दत्तात्रय परडे, डॉ. अश्विनी पाटील

आणि विभागातील सिनियर रेसिडेंट डॉक्टर्स यांच्या सहकार्याने करण्यात आले.

तुळजापूरात चोरांच्या दहशतीने नागरिक भयभीत; रहदारीच्या वस्तीत चोरांचा धुमाकूळ

पोलीस प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह? ▸▸ नागरिकांमध्ये संतापजनक वातावरण ... ▸▸ शहरात पेट्रोलिंगच्या फेऱ्या वाढवा... ▸▸ नागरिकांची सुरक्षा महत्त्वाची...

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१८ फेब्रुवारी -
मागील महिनाभरापासून शहरात चोऱ्या आणि दरोडयांचे प्रमाण वाढले असून सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओ वरून शहरातील नागरिक भयभीत झाले आहेत. मागील काही महिनाभरापासून घडणाऱ्या चोऱ्या आणि दरोडेच्या घटनेमुळे शहरातील नागरिक दहशतीने भयभीत झाले. शुक्रवार पेठ मधील अण्णासाहेब रोचकरी यांच्या घरात १७ फेब्रुवारी रोजी रात्री आठ सव्वा आठच्या सुमारास चोरट्यांनी धुमाकूळ घातला.

अण्णासाहेब रोचकरी यांच्या पत्नी घरामध्ये स्वयंपाक करत असताना अचानक काही चोरट्यांनी घरामध्ये प्रवेश केला. महिलेचे हात पकडून डोळ्यांमध्ये स्वयंपाक घरातील चटणी टाकली. घरामध्ये वस्तू अस्ताव्यस्त फेकल्या घरातील कपाट खोलून त्यामधील वस्तू जमिनीवर फेकल्या. आठवडा बाजार येथील शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या घरात नागरिकांच्या रहदारीच्या ठिकाणी चोरट्यांनी धुमाकूळ घातल्याने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस प्रशासनाच्या कारभाराकडे नागरिक संशयाच्या नजरेने पहात आहेत. शहरात चाललेल्या चोरट्याच्या धुमाकूळ आणि पोलीस प्रशासन केवळ बाघ्याची भूमिका घेत असल्याने नागरिक मोठ्या प्रमाणात भयभीत होत असताना कुठल्याही

प्रकारची ठोस पावले न उचलल्याने शहरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे पोलीस प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून पोलीस अधीक्षक यांनी स्वतः लक्ष घालून तुळजापूरकरांना दिलासा द्यावा अशी मागणी शहरवासीयातून होताना दिसत आहे. सोशल मीडियावर पोलीस प्रशासनावर चांगलेच तोशारे वढताना नागरिक मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. महिला आणि लहान मुलांमध्ये शहरात होणाऱ्या चोरट्यांच्या चर्चेमुळे भय निर्माण झाले आहे नागरिकांतून रात्रीच्या वेळी पोलीस पेट्रोलिंगच्या फेऱ्या शहरात वाढवाव्या अशी मागणी केली जात आहे. शहरात दारोदारी फेरीवाले व्यापारी, परराज्यातून विक्रीचे सामान घेऊन शहरात गल्लीबोळात फिरणारे व्यापारी, भिकारी मागतकरी अशा लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हे लोक दिवसभर चाकाचोळा घेऊन रात्री चोऱ्या दरोडेखोरांना सहकार्य करतात अशीही चर्चा नागरिक करत आहेत. अशा लोकांची पोलीस प्रशासनाने कसून चौकशी करणे सुद्धा गरजेचे आहे. अनेक भागात तरुण युवक रहिवाशांना आव्हान करून गस्त घालण्यासाठी प्रोत्साहित करत आहेत.

नागरिकांमध्ये चोऱ्या आणि दरोडेखोरांबाबत निर्माण झालेली दहशत आणि शहरात अनेक भागात चौका चौकात दिवसभर चालणाऱ्या चर्चांमुळे भीती आणि दबावाखाली वावरणाऱ्या लोकांना दिलासा मिळण्यासाठी पोलीस प्रशासनाने लवकरात लवकर चोरट्यांचा बंदोबस्त करणे गरजेचे झाले आहे.

वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण समारंभ

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.१८ फेब्रुवारी -
बचपन प्ले स्कूल, उमरगा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण समारंभ न्यू बचपण प्ले स्कूल गुंजोटी रोड उमरगा येथे आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून अनुराधा मोहिते शिक्षण विस्तार अधिकारी उमरगा व प्रमुख पाहुणे म्हणून अजयकुमार गायकवाड उपप्राचार्य श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी, डॉ. संजय येळापूरे, बालाजी गुंडू केशवशेट्टी यांची प्रमुख उपस्थित होती. या कार्यक्रमाला डॉ. गणेश गुंडू केशवशेट्टी संचालक व अनुराधा संतोष जवादवार प्राचार्य बचपण प्ले स्कूल यांनी सुरुवात केली.

शाळेतील लहान मुलांनी आपल्या सुंदर नृत्यप्रदर्शनांद्वारे उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे संपूर्ण संचालन शिक्षिका चंचल सूर्यवंशी यांनी केले. समारंभाचा समारोप शाळेच्या यल केजी व युकेजीच्या विद्यार्थ्यांनी केला व त्यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेमध्ये शालेच्या शिक्षिका ऐश्या मणियार, शामबाला गुलें, शीतल स्वामी, श्वेता थोरात, पूजा केशवशेट्टी, पल्लवी कवठे, नंदनी कलके, निशा कांबळे, मैना सलके, राया घोडके यांच्या परिश्रम आहे.

या कार्यक्रमात उपस्थित सर्व पालक, विद्यार्थ्यांच्या अद्भुत कलेची प्रशंसा करतांना आनंदी होते.

पालकमंत्र्यांच्या हस्ते गुरूवारी नळदुर्गच्या उपजिल्हा रुग्णालय लोकार्पण व भूमिपूजन सोहळा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -
सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नळदुर्ग येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय व इतर आरोग्य संस्थांचा लोकार्पण व भूमिपूजन सोहळा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते २० फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता होणार आहे.

अध्यक्षस्थानी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर हे असतील.

प्रमुख पाहुणे म्हणून सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले तर प्रमुख उपस्थितीमध्ये खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. राणाजगजीतसिंह पाटील, आ.प्रा.डॉ. तानाजीराव सावंत, आ. कैलास पाटील, प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांची उपस्थिती राहणार आहे.

पोलीस दलात भरती झालेल्या तरुणांचा नागरी सत्कार

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.१८ फेब्रुवारी -
कळंब तालुक्यातील दुधाळवाडी येथील केंद्रीय व राज्य राखीव दलात भर्ती झालेल्या दोन तरुणांची डीजे लावुन मिरवणूक काढुन, गावभर पेढे वाटून ग्राम पंचायतच्या वतीने आ. कैलास पाटील यांच्या हस्ते जंगी नागरी सत्कार सोमवारी (ता.१७) संध्याकाळी करण्यात आला.

या कार्यक्रमाला माजी पं.स.सदस्य रामहरी मुंडे येरमाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन बारकुल विभाग प्रमुख राहुल पाटील, हरिचंद्र लाटे,बालाजी लाटे, आप्पा दुधाळ, प्रशांत लुंगारे, बिभीषण बांगर, रविकांत लाटे, विजय सोने, रमेश दुधाळ, अनिल दुधाळ,कैलास लुंगारे, योगेश लुंगारे, पंकज घुगे, लक्ष्मण भांगे, तानाजी खंडागळे, शिवाजी खंडागळे, मिलन शिरसाट, जयराम शिरसाट, केरबा शिरसाट, सूर्यानंद भांगे व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या नागरीसत्काराचे आयोजन भिवाजी सिरसाठ, ग्रामपंचायत सदस्य गोंविद मुंडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल लाटे यांनी केले सूत्रसंचालन डॉ. निलेश लाटे यांनी केले तर आभार गोविंद मुंडे यांनी मानले.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत उमरगा, लोहारा तालुक्यातील कामांना प्राधान्यक्रम मिळावे : बिराजदार

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.१८ फेब्रुवारी -
कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत उपसा सिंचन योजना क्र.२ या योजने अंतर्गत टप्पा क्र. ५ रामदरा साठवण तलाव पर्यंतची कामे जुन २०२५ पर्यंत पुर्ण करून रामदरा साठवण तलावात पाणी सोडण्याचे नियोजन आहे. परंतु टप्पा क्र. ६ मध्ये उमरगा व लोहारा तालुक्यातील कामांना प्राधान्यक्रम मिळणे गरजेचे आहे. त्यात रामदरा साठवण तलाव ते एकुरगा पर्यंतच्या बंदिस्तनलिकेच्या मंजुर कामांना प्राधान्यक्रम मिळावे, कामे जलदगतीने व्हावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांच्याकडे केली आहे.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत उपसा सिंचन योजना क्र.२ या योजनेस २०२२ मध्ये द्वितीय प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सद्या स्थितीत टप्पा क्र.१ ते टप्पा क्र. ५ साठी प्राधान्यक्रम प्राप्त आहे. सदरील टप्यांमधील बहुतांश कामे पुर्ण झालेली आहेत व उर्वरित कामे येत्या सहा महिन्यात

पुर्ण होतील असे जलसंपदा विभागाचा आढावा घेतले असता समजते. मंजूर प्राधान्य क्रमातील कामामुळे (उपसासिंचन योजना क्र.२ टप्पा -५ अंतर्गत रामदरा साठवण तलावपर्यंत) एकुण तीन हजार ३७८४ हेक्टर (३४.८५ टक्के) सिंचन क्षेत्र निर्मिती होणार आहे. टप्पा क्र. ६ उमरगा व लोहारा तालुक्यातील कामांना अजुन प्राधान्यक्रमामध्ये समाविष्ठ नसल्यामुळे या टप्प्यातील कामे सुरु झालेली नाहीत. सद्यास्थितीत प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण झाले सविस्तर सर्वेक्षण आणखी व्हायचे आहे. या कामांचे संकल्पन व रेखाचित्रे बनवण्यासाठी व निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. तथापि सदर प्रकल्पाअंतर्गत भौगोलिक परिस्थितीनुसार तालुक्यानिहाय समतोल साधण्याकरिता टप्पा क्र. ६ मधील रामदरा साठवण तलाव ते एकुरगा पर्यंतच्या बंदिस्तनलिकेचे काम मंजुर प्राधान्यक्रमातील कामाबरोबर हाती घेणे आवश्यक आहे. त्याद्वारे धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, लोहारा व उमरगा या तालुक्यातील सात हजार ७८ हेक्टर (६५.१८ टक्के) क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. असे एकुण उपसासिंचन योजना क्र. २ अंतर्गत एकुण ६३.४४ द.ल.घ.मी. पाणीसाठी व त्याद्वारे एकुण दहा हजार ८६२ सिंचन क्षेत्राची निर्मिती होईल. रामदरा धरणात लवकरच सोडण्यात येणार आहे. परंतु तेथुन पुढे तुळजापूर, लोहारा व उमरगा या भागातील कामे झाले नसल्याने त्या पाण्याचा सिंचनासाठी उपयोग होणार नाही. पाणी विनावापर रहाणार आहे. दुष्काळी स्थितीत असलेल्या दोन्ही तालुक्यातील शेतकरी सिंचनापासून वंचित आहेत, त्यासाठी महत्वकांशी असलेल्या कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पा अंतर्गतची कामे जलद गतीने पुर्ण होणे गरजेचे आहे. टप्पा क्र.६ उमरगा व लोहारा तालुक्याचा प्राधान्यक्रमात समावेश करावा व निविदा प्रक्रिया जलदगतीने करून सलगतेने कामे पुर्ण करण्यासाठी आदेश व्हावेत, यामुळे या तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनेचा लाभ देणे शक्य होईल.

या संदर्भाने प्रा. बिराजदार यांनी जलसंपदा विभागाचे मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा केली आहे, त्यांनी या कामासाठी सकारात्मकता दर्शवली आहे.

जाहीरनामा
उमरगा येथील श्रीमती जी.पी. बनकर सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उमरगा

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २६०/२०२४ नि.क्र. ०७
ज्योतीबा विठ्ठल चव्हाण, वय २९ वर्षे, रा. बेडगा ता. उमरगा जि. धाराशिव.
हा. मु. जुना तुळजापूर नाका, सोलापूर ता. जि. सोलापूर, मो. नं. ९६६५९०८०४५

ज्यापेक्षा मयत कै. विठ्ठल दिनानाथ चव्हाण हे मृत्यू समयी ठिकाण सोलापूर येथे दिनांक १४/०८/२०१६ रोजी मयत झाले असुन अर्जदार क. १. जालिंदर विठ्ठल चव्हाण वय २. ज्योतीबा विठ्ठल चव्हाण वय ४२ वर्षे, २९ वर्षे, ३. लक्ष्मी कडाप्पा जाधव, वय ४१ वर्षे ४. रेणूका महादेव कोष्टी वय ३८ वर्षे ५. हेमा कडाप्पा जाधव वय ३६ वर्षे सदर हे वरील मयताचे वारस असल्याच्या नात्याने त्यांचे पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यकता आहे म्हणुन वारसा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यांत येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबददल पुरावा घेवुन त्याची मयत कै. विठ्ठल दिनानाथ चव्हाण वारस असल्याबददलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदारांना देईल.

आज दिनांक २०/०१/२०२५ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख २१/०२/२०२५

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
(बी.व्ही.जाधव)
सहा.अधिक्षक

सह दिवाणी न्यायालय, क. स्तर उमरगा

'आम्ही असू अभिजात' संमेलन गीताला नांदेडचा संगीत साज !

आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केले अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे गीत

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ फेब्रुवारी

नवी दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे गीत नांदेडच्या सुप्रसिद्ध गायिका, संगीतकार आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केले आहे. दिग्गज गायकांचा सहभाग असणारे अभिजात मराठीला शब्दबद्ध करणाऱ्या दीर्घ काव्याला त्यांनी संगीताचा साज चढवला असून तमाम नांदेडकरांसाठी ही आनंदाची बाब आहे.

९८ व्या मराठी साहित्य संमेलनासाठी नांदेड मधून एकीकडे शेकडो साहित्यिक रवाना होत आहे. आता नांदेडसाठी आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केलेले 'आम्ही असू अभिजात ' हे संमेलन गीत आणखी एक आनंद वार्ता ठरले आहे.

काल राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते या गीताचा शुभारंभ सोहळा पार पडला. यावेळी नांदेडच्या संगीतकार आनंदी विकास यांचाही सत्कार करण्यात आला. पुण्याचे गीतकार डॉ. अमोल देवळेकर यांनी लिहिलेल्या 'आम्ही असू अभिजात ', या मराठी भाषेच्या गौरवगीताला संगीताचा साज चढविण्याचे काम त्यांनी केले आहे. विशेष म्हणजे या गीताचे पार्श्वगायन सुप्रसिद्ध गायक हरिहरन, शंकर महादेवन, मंगेश बोरगावकर, प्रियंका बर्वे,सागर जाधव, शमिमा अख्तार यांनी केले आहे.या गीताचे संगीत संयोजन प्रथमेश कानडे, ध्वनिमुद्रन मन्मथ मठपती, ध्वनि मिश्रण आदित्य देशमुख यांनी केले आहे. हे गीत संगीत, पार्श्वगायन, लेखन सादरीकरण या सर्वच कसोटीवर आगळे वेगळे सिद्ध होत आहे. या संपूर्ण गाण्याचे चित्रीकरण कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात आले आहे. त्यामुळे या गाण्याचा व्हिडिओ देखील लक्षवेधी ठरला आहे. मराठी भाषेच्या अभिजात दर्जा प्राप्त होण्याच्या घटना क्रमावर आधारित हे गीत असून कवी अमोल देवळेकर यांनी १० अंतऱ्याचे हे दीर्घकाव्य मराठीच्या अभिजात दर्जाचा गौरव करताना लिहिले आहे. संदर्भाचे सुनियोजित सादरीकरण या गीतातून होत आहे. दरम्यान, आयोजकांनी काल या गीताचे राज्यपालांच्या हस्ते लोकार्पण करताना संगीतकार आनंदी विकास यांना सन्मानाने या साहित्य संमेलनाला आमंत्रित केले आहे. साहित्यप्रेमी नांदेडकरांसाठी ही अतिशय आनंदाची बाब आहे.

एसजीजीएस अभियांत्रिकी महाविद्यालयच्या नऊ विद्यार्थ्यांना सीमेन्स शिष्यवृत्ती

तभा वृत्तसेवा
नवीन नांदेड,दि. १८ फेब्रुवारी

नुकत्याच जाहीर झालेल्या सिमेन्स कंपनीच्या निकालात एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड येथे शिक्षण घेत असलेल्या ९ विद्यार्थ्यांनी प्रतिष्ठेची मानली जाणारी सीमेन्स शिष्यवृत्ती मिळवून संस्थेचे नावलौकिक केले आहे.

एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र महाविद्यालय विष्णुपुरी येथील ९ विद्यार्थ्यांनी सीमेन्स शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवुन महाविद्यालयचे नावलौकिक केल्याबद्दल संस्थेचे संचालक डॉ.मनेश कोकरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.सीमेन्स शिष्यवृत्ती मिळवलेली विद्यार्थी संचिता सोनवणे, प्रथम वर्ष संगणक अभियांत्रिकी, कृष्णाई मांगलेकर, प्रथम वर्ष, माहिती तंत्रज्ञान, सपना गाडेकर, प्रथम वर्ष, माहिती तंत्रज्ञान,श्रुतिका खांडील, प्रथम वर्ष, माहिती तंत्रज्ञान,अभिषेक वाघ, प्रथम वर्ष, सानिका भोसले, प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान, मयुरी अलवार, प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान, या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

मारोती कदम आज आकाशवाणीवर

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ फेब्रुवारी

टाकळी (धनगर) केंद्राअंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव (लिखा) ता. पूर्णा येथील उपक्रमशील शिक्षक मारोती कदम यांचे नांदेड आकाशवाणीवर शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचे पर्यावरणविषयक दृष्टिकोन या विषयावर भाषण दि. १९ फेब्रुवारी रोजी बुधवारी सकाळी ठिक १०.४५ वाजता प्रसारित होणार आहे. तरी श्रोत्यांनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाधिकारी विश्वास वाघमारे, निवेदक गणेश धोबे, प्रसारण अधिकारी राहुल अत्राम यांनी केले आहे.

गेटकेन कारखान्यास ऊस देण्यापूर्वी विचार करावा : संचालक यशवंतराव देशमुख

तभा वृत्तसेवा
हदगाव,दि. १८ फेब्रुवारी

हदगाव- हिमायतनगर, उमरखेड व कळमनुरी तालुक्यातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी शिऊर सा. का. मर्या. वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी या कारखान्यास आपला ऊस द्यावा वरील सर्व तालुक्यातील ऊस १५ मार्च अखेर संपविण्याचे कारखान्याचे नियोजन असून बाहेरील कारखान्यास ऊस देऊ नये असे आव्हान संचालक यशवंतराव देशमुख यांनी केले आहे तसेच शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी गाळपास येणाऱ्या उसाकरिता ऊस पुरवठा प्रोत्साहन पर योजना १६ फेब्रुवारी २०२५ ते १६ मार्च च्या पुढे पंधरवड्यात वाढीव रक्कम २५०० ते २७०० पर्यंत भेटणार आहे.

पुढील २०२५-२६ च्या गाळप हंगामात महाराष्ट्रातील सर्व धरणे भरली असून इतर कारखाने ऊस गाळपास घेऊन जातील पण पुढच्या वर्षी हे कोणीच येणार नाहीत तरी आपण वेळीच सावध होऊन या गेट केन कारखान्याच्या आमिषाला व खोट्या प्रलोभनला बळी न पडता तसेच उसाच्या पैशासाठी या गेटकेन कारखान्यात हेलपाटे मारावे लागत असल्याचे अनुभव असून पुढील वर्षी ऊस गाळपावी उभा राहू शकतो. त्यामुळे शिऊर सा.का. मर्या. वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी या कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करावे असे आव्हान संचालक यशवंतराव देशमुख यांनी केले तरी या गेटकेन कारखान्यांनी आतापर्यंत ऊस बिलाची रक्कम अद्यापही दिली नाही अशी धक्कादायक माहिती समोर आली असून त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी वेळीच सावध होऊन आपल्या हक्काचा शिऊर सा.का. मर्या. वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसणी या कारखान्यास द्यावा.

ज्ञानेश्वर महाराव यांना नांदेड शहरात येण्यास बंदी घालावी : सकल हिंदू समाज

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ फेब्रुवारी

प्रभु श्रीराम व स्वामीं समर्था बद्दल अपशब्द वापणाऱ्या ज्ञानेश्वर महाराव यांना नांदेड शहरात येण्यास बंदी घालावी अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने जिल्हा पोलीस अधिक्षक व जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

संभाजी ब्रिगेडच्या वतीने शिवजयंती निमित्त होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख वक्ता म्हणून ज्ञानेश्वर महाराव यांना बोलविण्यात येणार आहे. यापुर्वी त्यांनी प्रभु श्रीराम व स्वामीं समर्थ यांच्या बद्दल अपशब्द वापरलेले आहेत. देवी-देवतां बद्दल अपशब्द वापरणाऱ्या अशा प्रवृत्तीचा निषेध असून अशा लोकांना नांदेड शहरात येण्यास बंदी घालावी अन्यथा ते शहरात आल्यास त्यांचा वेगळ्या स्टाईलने समाचार घेतल्याशिवाय सकल हिंदू समाज शांत बसणार नाही. असा इशारा निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. निवेदनावर कृष्णा देशमूख, शशिकांत पाटील, वैभव दरबस्तवार, अनिल लालवानी, हरीष कुडाळ, साईनाथ जाधव, आकाश कापकर, कृष्णा इंगळे, गणेश कोकूलवार, गोविंद शर्मा, ज्ञानेश्वर पवार, राजू अंभोरे, गणेश लोकम, अभिषेक मेळदे, आंनद मरेवार, अभिषेक भोपळे, राजेश पाटील, प्रविण लोकम, विकास कापकर, लप्पू उपरणे, रुद्रा हसंगपीली, राजेश देशमूख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

संक्षिप्त वृत्त

राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश संघटकपदी मिलिंद सोनकांबळे

देगलूर-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशानुसार तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांच्या समतीने राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश अध्यक्ष प्रा. सुनिल मगरे यांच्या हस्ते मिलिंद मारोती सोनकांबळे कावळगांवकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक पदी निवड करून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. या निवडी बद्दल राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष संभाजी मुकनर, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब सोनकांबळे, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग लातूर जिल्हा अध्यक्ष प्रदीप जोंधळे, राष्ट्रवादी युवक जिल्हा उपध्यक्ष संतोष पाटील थडके, देगलूर तालुका अध्यक्ष राहुल देसाई देगावकर, देवेंद्र मोतेवार, नरेश पाटील, अशोक कांबळे देगलूरकर, रंजित पाटील, मिलिंद मांजरमकर, पांडुरंग राजुरे, मलिकार्जून कडलवार, बालाजी भुतनारे, राष्ट्रवादी युवक बिलोली तालुका अध्यक्ष नीलकंठ पाटील दुडले, गणेश शिंदे, राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे शहर अध्यक्ष कुरिशी, हणमंत पांडवे, अंकुश हणमंते, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी सामाजिक, राजकीय, विविध क्षेत्रातील जनतेकडून त्यांना अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिले आहे.

भाजपाच्या सदस्य नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
हदगाव,दि. १८ फेब्रुवारी

विधानसभा निवडणुकीत अभुतपूर्व मिळालेल्या यशानंतर भाजपाने पुन्हा पक्ष संघटन व बळकटीकरणावर विशेष भर देत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्ण महाराष्ट्रात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार सदस्य नोंदणी संघटन पर्व १ अभियानास प्रारंभ झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यात माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सांसद अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वात जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सदर अभियान प्रारंभ झाला असून प्रमुख पदाधिकारी पासून ते बूथ प्रमुखापर्यंत यांचा झंजावत सुरू असल्याचे दिसून येत आहे.

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार १ जानेवारी ते १९ फेब्रुवारी पर्यंत सदस्य नोंदणीचे अभियान प्रारंभ झाला आहे. ज्यात बूथ प्रमुखाला २५० सदस्य नोंदणीचे लक्ष निर्धारित करण्यात आले. हदगाव तालुक्यात जवळपास ५० हजार सदस्य नोंदणीचे लक्ष देण्यात आले होते त्यास येणाऱ्या १९ फेब्रुवारी पर्यंत हे लक्ष साध्य करण्यात येईल असे दिसून येत आहे. भाजपा माजी शहराध्यक्ष तथा महामंत्री, सदस्य नोंदणी अभियान सह संयोजक बाळा पाटील यांनी या अभियानात निवघा, तामसा, आष्टी, पळसा, मनाठा या जिल्हा परिषद गटांसह हदगाव शहरात आता लक्ष केंद्रित केले आहे. प्रस्तुत प्रतिनिधीने या अभियानाविषयी संपर्क केला असता बाळा पाटील म्हणाले की, या सदस्य नोंदणीचा फायदा हा येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाला याचा निश्चितच फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला. प्रत्येक बुथ अध्यक्ष या अभियानात जीव ओतून सदस्य नोंदणीच्या माध्यमातून प्रत्येक मतदारा पर्यंत पोहोचण्याचा या अभियानातून साध्य होत आहे.

या कामी पक्षाचे पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभत असल्याचे दिसून येत आहे.

निवघा येथील दोन युवकांची महसुल सहाय्यक पदी निवड

तभा वृत्तसेवा
मुदखेड,दि. १८ फेब्रुवारी

मुदखेड तालुक्यातील निवघा गावातील दोन युवकांची एमपीएससी मधुन महसुल सहाय्यक पदी नियुक्ती झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

या सात्कार सोहळा कार्यक्रमा प्रसंगी भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते राजेश विठ्ठलराव पवार, व साहेबराव बालाजी कानुलकर, यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. राजेश पवार आणि साहेबराव कानुलकर यांनी आपाट कष्ट करून मनात जिद्द बाळगुन त्यांनी यशाचे शिखर गाठले आहे. त्यांचे हे यश पाहुन गावातील इतर युवकांनी मनात जिद्द बाळगून यश गाठावे आणि निवघा गावाचे व आपल्या आई वडिलांचे नाव लौकीक करावे असे मत गावातील जेष्ठ नागरिकांनी व्यक्त केले. या सत्कार कार्यक्रमा प्रसंगी गावकऱ्यांनी त्यांचा सत्कार करुन त्यांचे कौतुक केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थीत असलेले आमदार श्रीजया चव्हाण, बाळासाहेब देशमुख बारडकर उपसरपंच बारड, उद्धवराव पवार, कामाजी पवार, विश्वनाथ पवार,बालाजी कानगुलकर निवघा, प्रभाकर पवार,विठ्ठल पवार , सचिन पवार, निजाम शेख, व सर्व गावातील जेष्ठ नागरिक व युवा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

कायदा व सुव्यवस्था राखून शिवजन्मोत्सव साजरा करावा : सपोनि. जाधवर

तभा वृत्तसेवा
माहूर,दि. १८ फेब्रुवारी

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती शासनाकडून व शिवप्रेमींकडून साजरी करण्यात येणार असून, नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून शिवजन्मोत्सव शांततेत साजरा करावा असे आवाहन माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रमेश जाधवर यांनी १६ फेब्रुवारी रोजी पोलिस ठाण्यात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत शिवप्रेमींना मार्गदर्शन करताना केले.

या बैठकीस ठाणे हद्दीतील पोलिस पाटील, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य, शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी अनेकांनी शिवजन्मोत्सव शांततेत साजरा करुन पोलिस प्रशासनास सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीस बिट जमादार पठाण, गजानन कुमरे, दारासिंह चौहान, संघरत्न सोनसळे, राज ठाकरे आदी पोलिस कर्मचाऱ्यांची उपस्थिति होती.

असंख्य कार्यकर्त्यांसह २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीत प्रवेश करणार : मोहनराव हंबर्डे

तभा वृत्तसेवा
नवीन नांदेड,दि. १८ फेब्रुवारी

येत्या २८ फेब्रुवारी रोजी आपल्या असंख्य समर्थकांसह राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यातील आपल्या पुढील राजकीय वाटचालीस सुरुवात होणार आहे , अशी माहिती नांदेड दक्षिणचे माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांनी दिली.

नांदेड दक्षिणचा आमदार या नात्याने मी या मतदारसंघाचा संपूर्ण कायापालट करण्यात कुठेच कमी पडलो नाही. मतदारसंघासाठी कोट्यवधीचा विकास निधी उपलब्ध करून दिला. म्हणेल त्या व्यक्तीचे काम ताबडतोब करून दिले. जनतेनेही मला भरभरून प्रेम दिले. यापुढेही त्यांचे आशीर्वाद, प्रेम असेच कायम राहील असा विश्वास व्यक्त केला . तसेच मोहनराव हंबर्डे म्हणाले राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक वाढीसाठी मी यापुढे प्रयत्नशील राहणार आहे. यापूर्वीही मी राष्ट्रवादीमध्ये कार्यरत होतो. शिवाय पक्षाने मला २००७ मध्ये पंचायत समिती उपसभापतीपदी विराजमान केले होते. माझे असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी माझ्यासोबत असून सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्यात राष्ट्रवादीला बळकटी मिळवून देण्यासाठी अहोरात्र परिश्रम करण्याची माझी तयारी आहे.

आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व इतर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला घवघवीत यश मिळेल असा आत्मविश्वासही मोहनराव हंबर्डे यांनी व्यक्त केला. २८ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ओम गार्डन नांदेड येथे पक्षप्रवेश सोहळा होणार असून यावेळी असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी, माजी जि प सदस्य, माजी नगरसेवक, सरपंच ,उपसरपंच माझ्यासोबत राष्ट्रवादीमध्ये दाखल होणार आहेत.

छायाचित्र नरेंद्र गडप्पा

नांदेड : अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थे जि.शखा नांदेडच्यावतीने आयोजित हॉटेल ताज पाटील येथील कार्यक्रमात भव्य सत्कार सोहळ्या प्रसंगी बोलतांना राष्ट्रीय महासचिव व सत्कारमुर्ती गजानन साटोटे व्यासपीठावर विभागीय अध्यक्ष हणुमंतराव आपटे, कार्याध्यक्ष दिलीप आपटे, महिला महिला अध्यक्षा सौ. अश्विनी आपटे, कोल्हापूर येथील माजी नगरसेविका मिनाक्षी काटकर, राष्ट्रीय समन्वयक नानासाहेब लवारे, प्रदेश उपाध्यक्ष रमेश गहिरे, बालाजी निलेवाड, नारायण बदनवाड, प्रभाकर मंढरे, पी.एम.गलपवाड, डी. के. तोकलवाड, गणपत पांडलवाड, नामदेव बट्टेवाड, व्यंकट नागलवाड, ज्ञानेश्वर प्रेमलवाड, शोभाताई पामलवाड, विजयमाला लांडगे आदी.

वन्य प्राण्यांची पाण्यासाठी मानवी वस्तीकडे धाव

▶▶ जंगलातील कृत्रिम पाणवठे पडले कोरडे ठाक

तभा वृत्तसेवा
इस्लापूर,दि. १८ फेब्रुवारी

इस्लापूर परिसरातील नैसर्गिक पाण्याचे वेगाने बाष्पीभवन होत असल्याने जंगलात पाण्याची दुर्मिष्य निर्माण झाले आहे. वन्य प्राण्यांना जंगलात पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याने वन्य प्राणी मानवी वस्तीकडे धाव घेत आहेत. परिणामी वन्य प्राण्यांच्या जीवितास धोका होण्याची शक्यता वाढली आहे.

उन्हाळा आता चांगला तापायला लागला आहे. उन्हाची तीव्रता दिवसेदिवस वाढत चालल्याने नैसर्गिक पानवठ्याचे बाष्पीभवन होत चालले आहे. जंगलात आता पाणीच नाही, वन विभाग सध्या झोपेत असल्याचे दिसून येत आहे. मागील काळात आमदार भीमराव केराम यांनी कृत्रिम पाणवठे तयार करून त्यामध्ये पाणी सोडण्याची सूचना वन विभागाला केली होती. परंतु या वर्षी वन विभाग या बाबीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे सध्या जंगलातील कृत्रिमरीत्या तयार केलेले पाणवठे कोरडे ठाक पडले आहे. त्यामुळे वन्य प्राणी पाण्यासाठी वन वन भटकत आहेत परिणामी त्यांच्या जीवितास धोका होण्याची शक्यता असून वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी 'दिन जाव पगार आव' भूमिकेत दिसून येत आहेत. या बाबीकडे जिल्हा उप वन संरक्षक यांनी तात्काळ लक्ष घालून कर्तव्य तत्परता विसरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायद्याचा बडगा उगारुन वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी अशी मागणी होत आहे.

जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ फेब्रुवारी

नांदेड जिल्ह्यात २ मार्च २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २ मार्च २०२५ रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

भोकर सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंत्याच्या कार्यकाळात झालेल्या कामाची चौकशी करा

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. १८ फेब्रुवारी

गेल्या काही वर्षापासून भोकरच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये काही ठराविक मर्जितल्या गुत्तेदारांनाच कामे देण्यात येत असल्याने सदरील कामे कंत्राटदारांकडून निकृष्ट पध्दतीने होत आहेत. दहा लाखाच्या आतील अनेक कामे फक्त कागदोपत्री दाखवून प्रत्येक जागेवर काम न करता बिले मंजूर करून रक्कम उचलून शासनाच्या निधीची विल्हेवाट लावण्याची पध्दत सुरू आहे. सदर बाब शिवसेनेचे तालुका प्रमुख अमोल पवार यांच्या निदर्शनास येताच त्यांनी २०२१ ते २०२४ या कालावधीत झालेल्या सर्व कामाची चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

शिवसेनेचे अमोल पवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

भोकर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या मागील चार वर्षाच्या कार्यकाळात अनेक बोगस कामे झाली असून आपल्या मर्जीतल्या गूत्तेदारांना हाताशी धरुन, इंटरनल टेन्डर प्रक्रियेत मॅनेज करुन बोगस पध्दतीने अत्यंत हलक्या दर्जाची कामे करण्यात आली आहेत. २०२१-२०२४ या मागील चार वर्षाच्या कार्यकाळात भोकर सार्वजनिक विभागात कूठल्याही शासन नियमाचे पालन न करता सि.सि.रोड बांधकाम, ड्रेनेज बांधकाम, खड्डे बूजविणे हि कामे अंदाजपत्रकानूसार न करता थातूर मातूर पद्धतीने करण्यात आली व बिले उचलण्यात आले. दहा लाखाच्या आतील अनेक कामे कागदोपत्री दाखवून प्रत्यक्ष कोणतेही काम न करता बिले मंजूर करुन ती उचलण्यात आल्याचे नमूद करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी याकडे विशेष लक्ष घालून झालेल्या सर्व कामाची उच्चस्तरीय चौकशी करुन संबधित गूत्तेदारांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात यावे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता हे चार वर्षापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याने मर्जीतील गूत्तेदारांना हाताशी धरुन बोगस कामे करण्यात आली दरम्यानच्या कार्यकाळात सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर मध्ये किती कामे करण्यात आली व ती कामे किती रक्कमेची होती याची चौकशी व्हावी व कामाचा दर्जा तपासण्यात यावा यासह चार वर्ष एकाच ठिकाणी कार्यकारी अभियंता कसे राहू शकतात याची देखील चौकशी करण्याची मागणी शिवसेनेचे भोकर तालूका प्रमूख अमोल धनराज पवार यांनी राज्याचे मूख्यमंत्री देवेंद्र फडणविस, उपमूख्यमंत्री एकनाथ शिंदे, बांधकाम मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी, अधिक्षक अभियंता, उपविभागीय अधिकारी भोकर, तहसीलदार, अधिक्षक अभियंता आदिंना पाठविण्यात आल्या आहे.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

पायाभूत सुविधांसाठी सुधारित प्रस्ताव सादर करावेत

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
अल्पसंख्यांक बहुल शासनमान्यता प्राप्त खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपरिषद, नगरपालिका शाळा व दिव्यांक शाळांमध्ये पायाभूत पुरविण्यासाठी अनुदान योजना सन २०२४-२५ मध्ये राबविण्यात येत आहे.

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या ७ ऑक्टोबर, २०१५ शासन निर्णयानुसार राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगीक प्रशिक्षण संस्था व दिव्यांग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात राबविली जाते. या योजनेसाठी यापूर्वी प्राप्त प्रस्ताव रद्द करण्यात आले आहेत.

त्यामुळे संस्थांचालकांनी या योजनेअंर्तगत सुधारित प्रस्ताव १३ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार इन्वर्टर सुविधा उपलब्ध करून देणे व पेयजलाची व्यवस्था या दोन पायाभूत सोयी सुविधा, तसेच ७ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या एकूण १२ पायाभूत सुविधापैकी या दोन पायाभूत सोयी सुविधांच्या प्रस्तावांबरोबर इतर आवश्यक सोई-सुविधांसाठी अनुदानाचे प्रस्ताव रु. १० लाखाच्या मर्यादेत प्राथमान्ये सादर करावेत.

तसेच ११ ऑक्टोबर, २०१३, दिनांक २२ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार व शासन शुद्धीपत्रक २१ ऑगस्ट, २०२४ मधील तरतुदीनुसार अनुदानाचे नव्याने विहित नमुन्यात, परिपूर्ण सुधारित प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी या कार्यालयात २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, असे जिल्हा नियोजन अधिकारी यांनी कळविले आहे.

संक्षिप्त वृत्त...

डॉ. झाकीर हुसेन मदरसाः सुधारित प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय ७ ऑक्टोबर, २०१५ अन्वये डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यात येत आहे.

योजनेसाठी यापूर्वी पाठविण्यात आलेले प्रस्ताव रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे संस्थाचालकांनी या योजनेअंर्तगत सुधारित प्रस्ताव १३ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार इन्वर्टर सुविधा उपलब्ध करून देणे व पेयजलाची व्यवस्था या दोन पायाभूत सोयी सुविधा तसेच राज्यातील डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात प्राथम्याने सादर करावेत. तसेच ११ ऑक्टोबर, २०१३, २२ डिसेंबर, २०२३ रोजीचे शासन निर्णय व २१ ऑगस्ट, २०२४ रोजीचे शासन शुद्धीपत्रक मधील तरतुदीनुसारे अनुदानाचे नव्याने विहीत नमुन्यात, परिपूर्ण सुधारित प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय,बार्शी रोड, लातूर या कार्यालयात २२ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, असे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी कळविले आहे.

विनयभंग केल्या प्रकरणी आरोपीस दोन वर्षांची सक्तमजुरी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
विवाह समारंभानंतर घराकडे येणाऱ्या एका महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपीस दोन वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंडाची शिक्षा लातूरच्या न्यायालयाने सुनावली.

तालुक्यातील मुरुड येथील फिर्यादी महिला विवाह समारंभानंतर आपल्या घराकडे जात होती. तेव्हा आरोपी राजहंस अभिमन्यू टिळक (रा. लातूर) याने महिलेचा विनयभंग केला. महिलेने आरडा ओरड केल्यानंतर नातेवाइकांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी मुरुड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची सुनावणी येथील सातवे प्रथम न्यायदंडाधिकारी जी. जी. औटी यांच्यासमोर झाली. पीडित महिला, घटनास्थळी उपस्थित असलेले दोघे साक्षीदारांची साक्ष महत्त्वाची ठरली.

न्यायदंडाधिकारी औटी यांनी आरोपीस दोन वर्षांची सक्तमजुरी व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे ॲड. व्ही. एम. मांडे व सहायक सरकारी वकील ॲड. महेश जाधव यांनी फिर्यादीची बाजू मांडली.

जिल्हा परिषदेच्या क्रीडा स्पर्धा उत्साहात

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
जिल्हा परिषद अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धा १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडल्या. या क्रीडा स्पर्धांमध्ये महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही सहभाग नोंदवला. रविवारी दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.

यावेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेमध्ये क्रिकेट स्पर्धा, थाळीफेक, गोळाफेक, धावणे, स्वीमिंग, टेबल टेनिस, टेनिस अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचा समावेश होता. गेल्या पंधरा दिवसांपासून क्रीडा स्पर्धेचे नियोजन जिल्हा परिषदेकडून सुरू होते. स्पर्धा अत्यंत शिस्तबध्द व शांतेत पार पडल्या. या स्पर्धांमध्ये लातूर जिल्ह्यातील दहा पंचायत समित्यांचे अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश होता. प्रत्येक तालुक्याच्या पंचायत समिती अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जिंकण्यासाठी खेळण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

सलग तीन दिवस क्रीडा स्पर्धा औसा रोडवरील क्रीडा संकुल येथे पार पडल्या. क्रीडा स्पर्धांचा बक्षीस वितरण कार्यक्रमही मोठ्या उत्साहात पार पडला. दरवर्षी जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचे अधिकारी, कर्मचारी तंदुरूस्त राहावेत, म्हणून या क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ज्यांनी क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला नाही, त्यांनी स्पर्धा पाहण्याचा आनंद घेतला.

२१ फेब्रुवारी रोजी लक्षवेधी धरणे आंदोलन

विभागीय आयुक्तालयाच्या प्रश्नांवर लातूरकर होणार आक्रमक

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
गेली पंधरा वर्षांपासून मराठवाड्यात दुसरे स्वतंत्र विभागीय कार्यालय स्थापन करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन असताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नांदेड येथे आयुक्तालय स्थापनार असे मान्य केल्यामुळे लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. शरद इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत गुणवत्तेच्या आधारे लातूर येथेच मराठवाड्यातील दुसरे स्वतंत्र विभागीय महसूल आयुक्त कार्यालय स्थापन झाले पाहिजे. लातूरकरांनी गेली पंधरा वर्षांपासून आयुक्त कार्यालयासाठी संघर्ष केला आहे, मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या, लातूर, उस्मानाबाद, बीड परिसरातील नागरिकांचा तीव्र भावना विचारात घेऊन तत्कालीन तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विभागीय आयुक्त कार्यालयासाठी योग्य ठिकाण कोणते याबाबत श्री उमाकांत दांगट यांची समिती नेमली. या समितीने शासनाकडे अहवाल दिलेला असून तो अहवाल खुला करावा. या अहवालात गुणवत्तेच्या आधारावर लातूर येथे आयुक्त कार्यालयासाठी सकारात्मक शिफारस करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीची, लातूरच्या जनतेची तीव्र भावना आणि आतापर्यंतचा इतिहास याचे अवलोकन न करता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या वक्तव्याचे तीव्र पडतात बैठकीत उमटले. लातूर येथेच विभागीय महसूल आयुक्त कार्यालय स्थापन करण्यासाठी दिनांक २१/०२/२०२५ शुक्रवार रोजी जिल्हा न्यायालयाच्या समोर सकाळी ११ ते दुपारी ०१ वाजेपर्यंत लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले असून समितीच्या वतीने लवकरच मुख्यमंत्री फडणवीस आणि महसूल मंत्री बावनकुळे यांना जिल्ह्यातील आमदार, खासदार यांना सोबत घेऊन सर्वपक्षीय शिष्टमंडळ भेटून मराठवाड्याचा समतोल विकासासाठी लातूर येथेच दुसरे स्वतंत्र विभागीय महसूल आयुक्त कार्यालय स्थापन करावे यासाठी

निवेदन देण्यात येणार आहे.

दिनांक २१ फेब्रुवारी रोजी आयोजित लक्षवेधी धरणे आंदोलनात विधिज्ञांसोबत विविध पक्ष व संघटनांनी सहभागी व्हावे असेही आवाहन करण्यात आले असून या बैठकीत ॲड.अण्णाराव पाटील, ॲड. व्यंकट बेंद्रे, ॲड. बळवंत जाधव समितीचे निमंत्रक ॲड. उदय गवारे यांनी विचार मांडले. या बैठकीस प्रामुख्याने ॲड. मधुकर राजमाने, ॲड. चंद्रकांत आगरकर, ॲड. प्रदीपसिंह गंगणे, ॲड. विजय जाधव, ॲड. कमलाकर सोनवणे, ॲड. मनीषा दिवे पाटील, ॲड. तृप्ती इटकरी, ॲड. नरेश कुलकर्णी, ॲड. बी. जी. कदम, ॲड. संजय पाटील, ॲड. गणेश यादव, ॲड. परवेज पठाण, ॲड. आनंद खांडेकर, ॲड. धनराज झाडके, ॲड. भालचंद्र कवठेकर, ॲड. रमेश गायकवाड, ॲड. शेखर हविले, ॲड.बि.व्ही. सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

लातुरात नवनिर्माण प्रतिष्ठानची व्याख्यानमाला

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारी दि. २२ ते २४ फेब्रुवारी दरम्यान व्याखानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.यात महनीय व्यक्तींकडून प्रबोधन केले जाणार असून लातूरकरांना विचारांची पर्वणी मिळणार आहे.

नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. या अंतर्गत राज्यातील मान्यवरांना ऐकण्याची संधी लातुरातील नागरिकांना उपलब्ध होते. व्याख्यानमालेचे हे २६ वे वर्ष आहे. याच मालिकेत शनिवार दि. २२ रोजी लक्ष फाऊंडेशनच्या संस्थापिका श्रीमती अनुराधा प्रभुदेसाई यांचे व्याख्यान होणार आहे. तुमच्या 'उद्या'साठी आपला 'आज' देणारा सैनिक या विषयावर त्या विचार मांडणार आहेत. लातूरच्या द्रोण अकॅडमीचे संचालक सेनामेडल प्राप्त निवृत्त कर्नल गिरीधर कोले हे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. रविवार दि. २३ रोजी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी हे व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० भारतीय ज्ञान परंपरा - विकसित भारत या विषयावर ते विचार मांडणार आहेत. चार्टर्ड अकाउंटंट सुनिल कोचेटा यांची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

सोमवार दि.२४ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम क्षेत्राचे क्षेत्रीय सह संपर्कप्रमुख विजय देवांगण यांचे व्याख्यान होणार आहे. त्रिजन्मशताब्दी राजमाता अहिल्या देवींची - शताब्दी संघाची या विषयावर ते बोलणार आहेत. स्त्रीरोग तज्ञ डॉ. सौ.ज्योतीताई सुळ यांची या दिवशी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता श्री केशवराज शाळेजवळील भारतरत्न डॉ. ए.पी. जे.अब्दुल कलाम सभागृहात ही व्याख्याने होणार आहेत.

माता रमाईचा त्याग महान आहे - भिक्खु पय्यानंद थेरो

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन महान कार्यांनी परिपूर्ण आहे, पण त्यांच्या या प्रवासात त्यांच्या पत्नी माता रमाबाई आंबेडकर यांचा अतिशय महत्त्वाचा वाटा होता. रमाईंच्या त्यागाशिवाय बाबासाहेबांचा संघर्ष आणि यश अपूर्ण राहिले असते. माता रमाई बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाच्या आधारस्तंभ होत. म्हणूनच त्यांना त्यागमूर्ती म्हटले जाते.माता रमाई या त्याग, प्रेम आणि समर्पणाचा सर्वोच्च आदर्श होत्या. बाबासाहेबांचे जीवन, शिक्षण, चळवळ आणि संपूर्ण कार्य रमाईशिवाय अपूर्ण आहे. म्हणूनच माता रमाईचा त्याग महान असल्याचे प्रतिपादन भिक्खु

पय्यानंद थेरो यांनी या वेळी केले.

हिप्पळगाव ता. शिरूर अनंतपाळ, जि लातूर येथे माता रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त हिप्पळगाव येथील सर्व महिला मंडळ च्या वतीने भिक्खु संघाच्या धम्म देशनेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रम प्रारंभी महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी त्रिसरण पंचशील पु. भिक्खु बोधिराज यांनी दिले. त्रिरत्न वंदने नंतर पु. भिक्खु संघाची धम्मदेसना झाली. कार्यक्रमाचे प्रास्तविक उदय सोनवणे यांनी केले सूत्रसंचालन रमेश सोनवणे केले .

कृषिमंत्र्यांनी माफी मागावी अन्यथा कार्यक्रम उधळू

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्याशी करून शेतकऱ्यांचा अवमान केला आहे. शेतकऱ्यांसाठीच संविधानिक मंत्रिपद असताना असे बेताल वक्तव्य करणे अशोभनीय आहे. कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांची जाहीर माफी मागावी अन्यथा कृषिमंत्र्यांचे नियोजीत कार्यक्रम उधळून लावू, असा इशारा भारतीय किसान युनियनचे प्रवक्ते राजकुमार सस्तापुरे यांनी दिला आहे.

कृषिमंत्री कोकाटे यांनी राज्य सरकार शेतकऱ्यांना एक रुपयात पीकविमा देत आहे. एक रुपया तर भिकारीही भीक घेत नाही. पण शेतकरी पीकविमा घेत आहे, असा भिकाऱ्यांचा संदर्भ देऊन शेतकऱ्यांबद्दल बेताल वक्तव्य केले. एक रुपयात पीकविमा द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी कधीच केली नाही तर आम्ही भरलेला विमा आम्हाला योग्यरित्या मिळावा एवढीच मागणी शेतकरी करत आला आहे. एक रुपयात पीकविमा योजना सुरू झाली तेव्हापासून बीडसह राज्यात हजारो कोटींचा विमा घोटाळ्याची प्रकरणे समोर येत असताना कृषिमंत्र्यांचे असे वक्तव्य म्हणजे चोराच्या उलट्या बोंबाच म्हणावे लागेल. कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी, अन्यथा त्यांचे नियोजीत कार्यक्रम उधळून लावू, असा इशारा सस्तापुरे यांनी दिला आहे.

तुरीला साधारण दर ७ हजार ५००

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
बाजार समितीत सोयाबीनची आवक घटली आहे. सध्या तुरीची आवक होत असून ७ हजार ५०० रुपयांपर्यंत सर्वसाधारण भाव मिळत आहे. आगामी काळात दर वाढतील, अशी शेतकऱ्यांना आशा आहे. गत खरिपात सोयाबीनपाठोपाठ तुरीचा पेरा झाला होता. दरम्यान, बाजारपेठेत तुरीचा भाव १२ हजार ५०० रुपये प्रति क्विंटलपेक्षा अधिक पोहोचला होता. त्यामुळे भविष्यात असाच भाव राहील, अशी शेतकऱ्यांना आशा होती. मात्र, तुरीच्या राशींना सुरुवात होऊन बाजारपेठेत आवक होऊ लागल्यानंतर दरात घसरण झाली असून तुरीला ७,५५० रुपये भाव आहे.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयात बीसीए विभागात डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स विषयावर सेमिनार संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या बीसीए विभागातर्फे प्रथम वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण अध्यक्षस्थानी होते. प्रमुख वक्ते म्हणून दयानंद विज्ञान महाविद्यालय लातूर इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ. टी.एच. मुजावर तसेच बीसीए विभागप्रमुख प्रा. शशिकांत स्वामी उपस्थित होते.

या कार्यक्रमात डिजिटल इलेक्ट्रॉनिक्सच्या विविध संकल्पना

व तंत्रज्ञान यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच, विविध प्रयोग व प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव घेता आला. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन बीसीए विभागाने केले असून, महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत असल्याची माहिती अध्यक्षीय समारोपात डॉ. बी.टी. चव्हाण यांनी दिली.

फेरीवाल्यांचे महापालिकेत ठिय्या आंदोलन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
वाहतुकीस अडथळा होत असल्याचे कारण सांगत महापालिका प्रशासनाने फेरीवाल्यांना गंजगोलाई व दयानंद गेट परिसरातून हटवत शहराच्या विविध भागात आठवडी बाजाराचे नियोजन केले आहे. मात्र, आठवडी बाजारात ग्राहक येत नसल्याने आठवडी बाजार ग्राहक व विक्रेत्यांसाठी गैरसोयीचा आहे, असे सांगत आम्हाला पूर्वीच्याच ठिकाणी व्यवसाय करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करीत फळ व भाजीपाला विक्रेत्यांनी सोमवारी महापालिकेत ठिय्या आंदोलन केले.

पथविक्रेता समितीच्या झालेल्या पहिल्या बैठकीत मस्जिद रोड हा 'हॉकर्स झोन' निश्चित करण्यात आला असतानाही तिथे करण्यात येणारी कारवाई अन्यायकारक आहे. ती थांबवावी, तसेच दयानंद गेट भागातील व्यावसायिकांना पर्यायी जागा उपलब्ध करून देत नाही तोपर्यंत रोडच्या एका बाजूने व्यवसाय करू द्यावा असे ठरलेले असतानाही त्या ठिकाणीही एकतर्फी कारवाई करण्यात आली. हे सर्व प्रकार थांबवावेत अशी मागणी फेरीवाले आणि नगर पथविक्रेता समितीने आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्याकडे केली.

यावेळी स्वाभिमानी मुस्लीम विकास परिषदेचे अध्यक्ष, मोहसीन खान, पथविक्रेता समितीचे गौस गोलंदाज, त्रिंबक स्वामी, मनोज शिंदे, माजिद बागवान, उषा धावारे, वैशाली पडवळ, दीपमाला तुपकर यांच्यासह फळ व भाजीपाला विक्रेत्यांची उपस्थिती होती.

भाजीपाला ताजा राहणार का?

महापालिका प्रशासनाने शहरातील विविध भागात आठवडी बाजाराचे नियोजन केले आहे. मात्र, सर्वसामान्य, गोरगरीब नागरिकांकडे आठवड्याचा भाजीपाला खरेदी करण्यासाठी पैसे नसतात. विशेष म्हणजे श्रीमंतांकडे भाजीपाला ठेवण्यासाठी फ्रीज व अन्य साधने असतात. पण गरिबांनी आठवड्याचा भाजीपाला जरी खरेदी केला तरी तो ताजा कसा ठेवणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शिवजयंतीनिमित्त शहरात आज 'जय शिवाजी-जय भारत' पदयात्रा

नागरिकांनी सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी ठाकूर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.१८ फेब्रुवारी -
छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बुधवार, १९ फेब्रुवारी रोजी शहरात 'जय शिवाजी - जय भारत पदयात्रा' आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी सोमवारी केले.

पदयात्रा पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा क्रीडा अधिकारी

जगन्नाथ लकडे, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिवजयंतीनिमित्त जिल्हा क्रीडा संकुल येथून बुधवारी सकाळी ९ वाजता 'जय शिवाजी-जय भारत पदयात्रा' सुरू होणार आहे. त्यानंतर यावेळी पोवाडा सादरीकरणासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आल्यानंतर या पदयात्रेचा समारोप होणार आहे. यामध्ये पारंपारिक वेशभूषेत विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार असून नागरिकांनीही उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.